
१० सप्टें' ७७ · सव्वा रुपया

# माणूस

## रायबरेली विशेषांक!



## अर्थ-अनर्थ?

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक पंधरावा

१० सप्टेंबर १९७७

मूल्य १·२५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# शंभर फुले उमलू द्यात !

**श्री. ग. मा.**

शहर मुळात शांत आणि समृद्ध. रुंद रस्ते, प्रशस्त बंगले, बागबगीचे, झोपाळे, तुरळक रहदारी यामुळे आणखीनच शांतसमृद्ध वाटणाऱ्या भागातील एका बंगल्यासमोर आम्ही पोचलो वेळही संध्याकाळची, शांत-निवांत. खासदार पी. जी. मावळणकर यांच्या ' लास्की इन्स्टिटयूट 'चे कार्यालय सध्या या बंगल्यात आहे पूर्वी अहमदाबादच्या गजबजलेल्या मध्यभागात हे कार्यालय होते. नवीन व्यवस्था व्हायच्या अगोदरच ही मध्यवस्तीतील जागा सोडावी लागली. सध्या मावळणकरबंधूंच्या एका बंगल्यातच ही तात्पुरती सोय म्हणून करण्यात आली. कधी बाहेरच्या हिरवळीवर, कधी आतल्या लहानशा, उभे राहिले तर डोके छताला टेकावे अशी 'उंची' असलेल्या खोलीत कार्यक्रम होत असतात. बहुधा व्याख्यानाचे. स्थानिक किंवा परठिकाणच्या आमंत्रिताचे त्या दिवशी सकाळी वृत्तपत्रामध्ये ' स्थानिक ' सदरात कार्यक्रम पाहिला. विषय ओळखीचा होता. मावळणकरानाही भेटायचे होते. त्याना घरी फोन केला तेव्हा नव्हते. म्हणून एकदमच सभास्थानी पोचलो. ते आलेले नव्हते. श्रोतेही कुठे दिसेनात. म्हणून पधरावीस मिनिटानी चक्कर मारून पुन्हा ' लास्की 'जवळ आलो. दरम्यान सभा वरच्या खोलीत सुरू झालेली होती.

लहानसा जिना चढून वर गेलो तेव्हा दारातच ' For members only ' अशी खडूने लिहिलेली पाटी होती तिच्याकडे पाहिले न पाहिलेसे करून सरळ आत घुसलो माझ्यासोबत चंद्रशेखर मराठेही होते. मावळणकराचे भाषण नुकतेच सुरू झालेले होते. श्रोते असतील वीसबावीस

विषय होता Some books on Emergency– आणीबाणीवरील काही पुस्तके. ज्या पुस्तकावर मावळणकर बोलणार होते ती ५-६ पुस्तकेही त्यानी मागवून घेतलेली होती.

एकेक पुस्तक हातात घेऊन वक्ते पुस्तकाचे नाव, लेखकाची ओळख वगैरे थोडक्यात करून देत होते श्रोत्यामधून या विषयावर प्रसिद्ध झालेल्या आणखी २१३ पुस्तकाची नावे सांगितली गेली. पाहता पाहता पुस्तकाची संख्या डझनावर गेली. गेल्या तीन महिन्यात केवळ इग्रजी भाषेत आणीबाणी या विषयावर दहा–पधरा तरी पुस्तके बाहेर पडली किंवा 'पाडण्यात आली' असा हिशोब निघाला. देशी भाषातून निघालेल्या पुस्तकाचा हिशोब ठेवणे तर अशक्यच होते.

समोर असलेल्या सहाही पुस्तकाची अशी थोडी चाळवाचाळव करून झाल्यावर वक्त्यानी सांगितले–बहुतेक पुस्तकातील फार थोडाच. भाग नवीन आहे. जो नवीन आहे त्यातही चटकदार मालमसाला पुरविण्याची दृष्टीच मुख्य आहे. आणीबाणीमुळे इथे जो लोकशाही मूल्याचा विध्वस झाला, स्वातंत्र्यभावना दडपली–चिरडली गेली त्याबद्दलचा ' विषाद ' या सर्व पुस्तकात कुठेही जाणवत नाही. शिवाय चटकदार मालमसाला म्हणून पुरविली गेलेली माहितीही कितपत खरी, याची शकाच आहे कारण सबधित बहुतेक व्यक्ती हयात आहेत. या व्यक्तीची सत्तेच्या राजकारणात पुन्हा घुसण्याची धडपड जोरात सुरू आहे. नुकत्याच इदिरा गाधी बेलछीला जाऊन आल्या त्याच्या कारकीर्दीत हरिजनावर अत्याचार काय कमी झाले ? पण एकदाही कुठे त्या अशा गेलेल्या नव्हत्या. तेव्हा अशा व्यक्तीबद्दल लेखकाना मिळालेली माहिती अनेक स्वार्थी हितसबधाच्या परिपूर्तीसाठीही पुरविली गेली असण्याची शक्यता आहे. तेव्हा चांगल्या, वस्तुनिष्ठ भूमिकेतून लिहिल्या गेलेल्या पुस्तकासाठी आपल्याला अजून

काही काळ वाट पाहावी लागेल त्यातल्या त्यात विकत घेऊन वाचायचे असेलच तर 'An eye to India, The unmasking of a Tyranny' हे डेव्हिड सेलबर्न याचे पुस्तक निवडा. ते निदान अभ्यासपूर्वक तरी लिहिले गेलेले आहे लेखक परदेशी असूनही त्याने माहिती, सदर्भ जमवण्यासाठी खूपच कष्ट घेतलेले दिसतात आपल्या लेखकानी लिहिलेल्या पुस्तकात असा अभ्यास दिसत नाही...

आणखी एक गमत पाहा या सहा पुस्तकापैकी चार पुस्तकाच्या लेखकानी तरी त्या वेळी आणीबाणीचे समर्थनच केलेले होते. आता काळ बदलला तशी यांची मतेही फिरली, लेखण्याची टोकेही वळली. हा प्रकार तर सर्वात चीड आणणारा आहे याच्यात आणि ब्लिट्झ-करटवाल्यासारख्या पत्रकारांत फरक तो काय ? खास नमुना पाहायचा असेल तर उमा वासुदेव यांचे 'Two faces of Indira Gandhi हे पुस्तक पाहावे. याच बाईंनी इदिरा गाधी सत्तेवर असताना 'Indira Gandhi–Revolution in Restraint' या नावाचे इदिराजीची भयकर स्तुती करणारे पुस्तक लिहून त्या वेळीही चागला बाजार कमावलाच होता...

उमा वासुदेव यांनी चागला बाजार कमावला असो नसो; पण इदिरा गांधीच्या बाबतीत भलेभलेही चकले आणि चुकले आहेत हेही विसरून चालणार नाही. जनतापक्षाचे अनेक नेते इंदिराजीना 'नयी रोशनी' समजून सुरुवातीला त्यांच्या कर्तृत्वाने दिपलेले होते, हे नाकारून चालेल काय ? बागला देश-युद्धातील विजयामुळे सघ-जनसघ वर्तुळातही त्याना एकदम मान्यता लाभली. जनसामान्यावरची त्यांची मोहिनी तर आणीबाणी पुकारल्यावरही कायम होती सगळे सस्थाचालक, कारखानदार, शिस्तप्रिय नागरिक, नोकरशाहीतील मंडळी, मोर्चे निदर्शने सपली, मन मानेल तसा कारभार करायला मोकळीक मिळाली, म्हणून मनातून इदिरा गांधीवर खूषच होती. कुणालाच आणीबाणीचे सत्यस्वरूप, ती पुकारण्यामागील इदिराजीचे अतस्थ हेतू यांची नीटशी कल्पना येऊ शकलेली नव्हती. त्यामुळे कुणी त्याच्या गौरवपर पूर्वी लिहिले असले आणि नतरच्या अनुभवावरून आपले मत त्याने बदलले असले तर एकदम अशा व्यक्तीवर धदेवाईक दृष्टीचा आरोप सरसकटरीत्या करणे काहीसे अन्यायाचे ठरते 'माणूस जनविराट अंक (२)' मधील डॉ श्रीराम लागू यांची मुलाखत या दृष्टीने फार प्रातिनिधिक आहे, प्रामाणिक मतपरिवर्तनाची त्यात स्पष्ट कबुली आहे 'अँटिगनी' सारखे प्रतिकाराची प्रेरणा जागविणारे नाटक ऐन आणीबाणी काळात (माणूस दिवाळी अक १९७५) सादर करूनदेखील डॉ. लागूंची मन स्थिती या काळात द्विधाच होती. देशाला अराजकाचा धोका होता आणि आणीबाणी पुकारून इदिरा गाधीनी हा धोका टाळला, असे त्यांना सजय गाधीच्या उदयापर्यंत मन पूर्वकतेने वाटत होते नंतर मात्र त्यांचा पूर्ण भ्रमनिरास झाला असे फार लोकाच्या, चागले चागले विचारवंत म्हणविणाऱ्याच्या बाबतीत झालेले आपल्याला दिसून येईल. पुण्यात तर एक साहित्यिक विचारवत असेही होते, की आणीबाणीमागील 'मास्टरमाइड' सजय होता हे एका मोठ्या परदेशी वृत्तपत्रात छापून आल्यावर 'सजयही तसा कर्तबगारच दिसतो' असे म्हणायलाही त्यानी कमी केले नव्हते.

प्रश्न असा आहे, की बाई पुन्हा एकदा सगळ्यांना चकवणार काय? पुढचा प्रश्न असाही आहे : या चकवाचकवीच्या खेळात सगळ्यानी भाग घेतलाच पाहिजे का ?

¤

उमा वासुदेव यांच्या पुस्तकाचा शेवट असा आहे-

Indira Gandhi did not resign for two days. On 22 March a sleek Toyota car was seen being packed with tins, presumably containing money. Part of the election money had been distributed to the contestants for the election from 2 Kushak Road, where a solid tence had assured privacy & security.' Here everyday, one tin would be braught from 1 Safdarjung Road, opened and the cash distributed by P. G. Sethi for two hours to the politically needy. The little Toyata was making sure that the money would survive to fight another battle one day. Indira Gandhi was not the person to give up.

(रायबरेलीत आपला व उत्तरेत सर्वत्र कांग्रेसचा धुव्वा उडाला हे समजल्यावरही) इदिरा गाधीनी दोन दिवस राजीनामा दिलेला नव्हता. २२ मार्चला '१ सफदरजग' आवारात एका चकचकीत टोयोटो गाडीत डबे भरले जात असलेले दिसत होते. डब्यात बहुधा नोटा असाव्यात कारण निवडणुका चालू असताना असेच डबे या आवारातून '२ कुशक' मार्गावरील, कुपण घालून सुरक्षित व बदिस्त केलेल्या एका जागेत, रोज एक याप्रमाणे नेले जात असत व पी. सी. सेठीकडून गरजूना पैशाचे वाटप तेथून चाले.

टोयोटोतून (नव्या) सुरक्षित जागी हलवले जात असलेले धन पुढच्या एखाद्या लढाईसाठी उपयुक्त ठरणार होते....

लढाई सोडून देणे हे इदिरा गाधीच्या स्वभावातच नाही....

¤

चकवाचकवीला उपयुक्त ठरतील अशी ३-४ आयुधे तर आजही इदिरा गाधीजवळ शिल्लक आहेत पहिले आयुध आहे त्याची पुरोगामी लढाऊ प्रतिमा. त्या शकराचार्यांना भेटायला जावोत किंवा टाटा-बिर्लांना सवलती जाहीर करोत. गरिबांच्या, मागासवर्गाच्या बाजूने बेदरकारपणे लढणारी व्यक्ती अशी त्याची बँक राष्ट्रीयीकरणानंतर निर्माण झालेली प्रतिमा अद्याप काही पुसली गेलेली नाही या आपल्या प्रतिमेला उजाळा देण्यासाठी त्या प्रतिकूल वातावरण असतानादेखील बेलछीला धडकून आल्या. त्यानी हत्तीवरून केलेल्या प्रवचनाची सुशिक्षितवर्गाने कितीही टवाळी केली व दातओठ खाऊन त्यावर टीका केली तरी यामागील इदिरा गाधीचा हेतू साध्य होऊन जायचा तो जातोच. 'गरिबी हटावो' ही त्यानी दिलेली क्रांतिकारक घोषणा खेड्यापाड्यांपर्यंत पोचलेली आहे. 'गरिबी हटविण्यासाठी आणीबाणी आणली-आणावी लागली' हे पालुपद तर यशवतराव चव्हाणदेखील कालपरवापर्यंत आळवीत होते, पण यासाठी यशवतराव किंवा अन्य कुणी नेता प्रतिपक्षाशी-प्रस्थापिताशी लढायला तयार आहे अशी प्रतिमा काही निर्माण होऊ शकली नव्हती-अजूनही नाही ! ! करिष्मा' (Charisma) हा नेहमी

लढाऊ व्यक्तिमत्त्वाचा तयार होत असतो. हिंदुस्थानसारख्या मागास-लेल्या, दरिद्री देशात गरिबाच्या बाजूने लढणाऱ्यालाच तो मुख्यत लाभणार हेही उघड आहे. कारण आपले शतकानुशतकाचे दारिद्र्य हटावे ही इथल्या तळागाळातल्या जनतेची अगदी मनोमनीची इच्छा आहे. ही एक नैसर्गिक भूक आहे आणि ही भूक पूर्ण करणाऱ्या एखाद्या देखाव्यावरसुद्धा ही जनता लुब्ध व्हायला तयार आहे—असते. इंदिरा गांधीची गरिबी हटाव ही घोषणा किंवा नंतरचा वीस कलमी कार्यक्रम, यातील बराचसा भाग देखाव्याचाच होता हे खरे असले तरी जनता त्याच्यावर लुब्ध झाली, इंदिरा गांधी 'नवी रोशनी' ठरल्या हे नाकारून कसे चालेल ?

इंदिरा गांधीच्या या अनन्य स्थानामुळेच त्यांची काँग्रेसपक्षालाही अजून आवश्यकता भासत आहे. त्या सोडल्या तर एकही काँग्रेसनेता असा नाही की, ज्याला आपल्या प्रांताबाहेर अखिल भारतीय अशी काही मान्यता आहे. आज पेचप्रसंग असा आहे की, त्यांची मदत न घेतली तर काँग्रेस पुन्हा उभी राहू शकत नाही आणि त्यांची मदत घेतली तर त्या इतरांना कुणाला उभेसुद्धा राहू देणार नाहीत. कुठलाही निर्णय घेतला जावो, काँग्रेसचे—निदान तिच्या अखिल भारतीय लोकशाही स्वरूपाचे मरण आज असे अटळ ठरत आहे 'तुझे माझे जमेना, तुझ्यावाचून चालेना' असा हा अस्तित्वाचा पेच-प्रसंग काँग्रेससमोर इंदिरा गांधीच्या करिष्म्याने उभा केलेला आहे आणि आयुध म्हणून याचा पुरेपूर उपयोग करून न घेतील तर त्या इंदिरा गांधी कसल्या ?

याच्या जोडीला प्रांतोप्रांती असंतुष्ट असलेले काँग्रेसगट इंदिरा गांधींना मिळतील हेही गृहीत धरून चालायला हवे. उदाहरणार्थ महाराष्ट्रात यशवंतराव मोहिते आजही आपली इंदिरानिष्ठा व्यक्त करायला कचरत नाही आहेत. वेळ आलीच तर ते व त्यांचा गट कुठे असेल याचा तर्क यावरून सहज बांधता येतो इतरही प्रांतात अशी स्थिती असणार, नसल्यास ती निर्माण करता येऊ शकते. मदतीला '१ सफ्दरजंग'मधून २२ मार्चला एका चकचकीत टोयोटोमधून सुरक्षित जागी हलविले गेलेले ते डबे असतीलच !

आणखी एक भाग, जो आपल्या सांस्कृतिक मनोरचनेशी निगडित आहे, तोही विचारात घ्यायला हवा. संकटात सापडलेल्या व्यक्ती-विषयी आपण एकदम हळवे होतो ती व्यक्ती दोषी आहे हे माहीत असूनही जनसामान्यांची सहानुभूती अशा संकटात सापडलेल्या, चहुबाजूंनी कोंडीत पकडल्या गेलेल्या व्यक्तीला लाभते व नकळत क्षमाभावनाही जागृत होते. जनमानस फार उदार व विसराळूही असते हा नेहमीचा अनुभव आहे. त्याचे संतापणे, क्षुब्ध होणे, प्रेमात पडणे सर्व क्षणिक असते. इंदिरा गांधींच्या बाबतीत क्षुब्ध होण्याचा, संतापण्याचा क्षण उलटला आहे आणि जसजशी त्यांच्याभोवतीची कोंडी आवळली जाईल तसतशी त्यांच्याविषयीची जनसामान्यांची सहानुभूतीची भावना वाढीस लागेल, हाही धोका ओळखूनच त्यांच्याविरुद्ध उपाययोजनेची पावले टाकणे राज्यकर्त्यांच्या हिताचे आहे. त्यातून इंदिरा गांधी या एक स्त्री आहेत. जनमानस कसे पलटी खाईल, काय सांगावे ? काँग्रेस नको म्हणणाऱ्यांनाही रायबरेलीतील इंदिरा गांधीचा पराभव हा विषादपूर्ण वाटला, ही वस्तुस्थिती आहे. इंदिरा गांधींविरुद्ध द्वेषाग्नी फुलवणाऱ्यांनी याही 'प्रातिनिधिक' लोकभावनेचा अवश्य विचार करायला हवा. नाही तर परिणाम उलटाच व्हायचा. यशवंतराव मोहिते तर आजही छातीठोकपणे म्हणतच आहेत : 'त्या महान पात्रतेच्या आणि निष्ठावान नेत्या आहेत असा सामान्यजनांना भरवसा आहे. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे कोणतेही आरोप केले जावोत, लोक त्यावर गंभीरपणे विश्वास ठेवीत नाहीत ..' 'ऐकीव प्रचाराने वाहवून जाणाऱ्या बुद्धिवाद्यां-सारखे सामान्य लोक नाहीत.' बहुजनसमाजातील व्यक्तीवर आणि गोष्टीवर त्यांची स्वत:ची अशी श्रद्धा असते; तर स्वत:ला स्वीकारार्ह अशा प्रचाराने बुद्धिवादी वाहवतात'... (गतिमान साप्ताहिक, १३ ऑगस्ट १९७७ अंकातील मुलाखत) यशवंतराव चव्हाणांच्या बालेकिल्ल्यात ही इंदिरानिष्ठा आज व्यक्त होत आहे तर इतर ठिकाणी, विशेषत: जसजसे दक्षिणेकडे जावे तसतसे, वारे अधिकच इंदिरानुकूल असण्याची शक्यता कशी नाकारून चालेल ?

□

Let hundred flowers bloom—'शंभर फुले उमलू द्यात' ही घोषणा जरी हुकुमशाही देशातून आलेली असली तरी लोकशाही जीवनपद्धतीचे ते मुख्य लक्षण मानण्यात येते. स्वतंत्रभाव जपणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचे जाळे ज्या देशात खोलवर रुजलेले असते तेथे लोकशाही अस्तित्वात असते. कुठल्याही शासनसंस्थेची प्रवृत्ती नेहमीच केंद्रीकरणाकडे धावत असते. विकेंद्रीकरणाच्या प्रवृत्तीही दुसऱ्या बाजूने जोमदार असतील तर समाजात एक परस्परविरोधी ताण तयार होतो व तो कायम राहणे समतोलाच्या दृष्टीने आव-श्यक असते. इंग्रजी राज्याच्या आगमनाबरोबर आपल्याकडील स्वयंपूर्ण खेड्यांच्या रूपाने असलेली विकेंद्रीकरणाची बाजू पूर्णपणे उध्वस्त झाली. राजकीय व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण वाढून लोक-शाहीला आवश्यक असलेला समतोल ढासळला. स्वातंत्र्यानंतरही या परिस्थितीत बदल झाला नाही व इंदिरा गांधींचे शासनही याच विकासक्रमाची अंतिम अवस्था ठरले. आता इंदिरा गांधी नाहीत. पुन्हा येतील किंवा न येतील; परंतु केंद्रीकरणाची प्रवृत्ती मात्र मुळीच रोखली गेलेली नाही. नागरिक स्वातंत्र्ये नव्या जनतापक्षाने पुन्हा प्रस्थापित केलेली आहेत, हे खरे; पण ती किती तकलादू असतात याचा आपला अनुभव ताजाच आहे पुन्हा इंदिरा गांधी किंवा तत्सम दुसरा कुणी, ती हिरावून घेणार नाही याची शाश्वती काय ? लोकशाही स्वातंत्र्याची शाश्वती एकच असते. ती म्हणजे स्वायत्त व स्वयंस्फूर्त लोकसंघटनांचे देशभर विखुरलेले, खेडोपाडी रुजलेले जाळे. असे जाळे निर्माण करणे हाच इंदिरा गांधींच्या पुनरागमनाच्या धोक्याविरुद्ध योजावयाचा खरा एकमेव व टिकाऊ उपाय आहे. इंदिरा गांधींनी सर्वंकष शासनसत्तावाद आणला म्हणून जनतेने त्यांना दूर केले जनतापक्षातही अशा सर्वंकष शासन-सत्तावादाचे काही पुरस्कर्ते नसतीलच असे नाही. सर्वंकष सत्तावादात रा. स्व. संघासारख्या स्वतंत्र व स्वायत्त संघटना बसत नव्हत्या म्हणून इंदिरा गांधींना त्या नकोशा होत्या. नव्या जनता राजवटीतही अशा संघ-टना नकोशा झाल्या, त्यांचे महत्त्व नाकारण्यात आले, त्यांचे स्वतंत्र अस्तित्व डोळ्यात खुपू लागले, तर लोकशाहीला असलेला धोका संपला असे म्हणता येणार नाही. रा. स्व. संघाला उत्तर, राष्ट्र सेवा दल किंवा

पृष्ठ ३२ वर

# मुक्ताफळे

ग्यानबा

## □ जैन पुराण

भाकडकथानी भरलेली पुराणे हा जगातल्या सर्व धर्मांचा सांस्कृतिक ठेवा असतो. निदान असे म्हणण्याची पद्धत आहे. पुराणातल्या कथा आपल्या लहानपणी आपली आजी जिवत असेल तर ती बाळाला झोप यावी म्हणून सागते. म्हणजे पूर्वी सागत असत. हल्लीच्या मुलांना अशी आजी फक्त गोष्टीत आढळते. हल्ली आजीलाच इतकी झोप घसरते की विचारू नका! कारण एक तर ती दिवसभर ऑफिसात काम करून आलेली असते किंवा बंगल्यात राहणारी असेल तर सकाळी बॅडमिंग्टन खेळून आलेली असते. तर या कथा भाकड असल्या तरी त्यांचे आराखडे जे एकदा डोक्यात बसतात त्यात पुढे कसलाही फरक होत नाही. जेव्हा आपण त्या ऐकतो, तेव्हा त्या मुळी भाकड नसतातच. काळ जातो तसतशा त्या भाकड होत्या हे लक्षात येते.

आम्ही व आमची आजी 'जैन' नसल्याने जैन-पुराणातल्या भाकडकथांना आम्ही आंचवलो'जैनांचीपुराणे आहेत हे देखील महाराष्ट्रातील स्थानवद्ध विदुषी दुर्गा भागवत याच्या लेखनावरून आम्हाला समजले.तर 'जैन पुराण' आम्हाला माहीत नव्हते; पण हे दु:ख आता उरले नाही. ठाकुरद्वारची सुप्रसिद्ध आजी 'टाइम्स ऑफ इंडिया' ही अलीकडे जनतापक्षाला बदनाम करणाऱ्या असंख्य भाकडकथा खुबीदारपणे प्रसिद्ध करीत असते. आधी सोयीची बातमी प्रसिद्ध करायची आणि मग त्यावर पुरावे रचायचे. त्याच्याकडे असलेल्या आणि पाळलेल्या लेखकात गिरिलाल जैन नावाचे पुराणिक आहेत. त्यांचे 'जैन-पुराण' वाचनीय असते.

नुकतेच त्यानी एक पुराण लिहिले आहे. विषय आहे 'दि फ्यूचर ऑफ दि आर. एस. एस.' म्हणजे रा. स्व. सघाचे भवितव्य' या पुराणातले सुरुवातीचे वाक्य पाहा–

'–इंदिरा गाधीच्या राजकीय भवितव्याबाबत जे वादंग राजकारणात उठले आहेत, त्या खालोखाल सघाच्या भवितव्याबाबत देशाच्या राजकारणात चर्चा सुरू आहे यात शंका नाही.'

इंदिरा गांधीच्या उज्ज्वल राजकीय भवितव्याबाबत आणीबाणीचे एकोणीस महिने ज्या 'टाइम्स'ला कसलीही शका नव्हती, त्यांना याबद्दल आता वादंग उठलेले पाहून मूर्च्छा यावी यात नवल नाही बाईंनी संत पाहिला नाही, चोर पाहिला नाही, सरसकट सर्वांना बेडघा ठोकल्या. भल्याभल्यांना राजकारणात बदनाम केले. म. गाधी, पडित नेहरू, शास्त्री यांची पुण्याई दीड वर्षात धुळीला मिळविली. आज काँग्रेसच्या कलेवरार्भोवती, मोठमोठ्यानें हेल काढून रडणाऱ्या श्री. यशवंतराव चव्हाण, ब्रह्मानंद रेड्डी याच्यावरोबर इंदिराजीही अहमहमिकेने पुढे आल्या हा त्याच्या धैर्याचा भाग आहे! महात्मा गाधी गेले, पंडित नेहरू आले आणि गेले, इंदिराजी आल्या आणि गेल्या, रा. स्व. संघाचे काम आहे तसेच चालू आहे. त्याच्या भवितव्याची चिंता आतापर्यंत कुणी फारशी केली होती का?

> वठोनि गेल्या तरुलागि पाणी
> घालावया जात न कोणि रानी
> वसंती ते पालवतात सारे
> हे सृष्टिचे कौतुक जाण बा रे!

भवितव्याची चिंता केली तरच सर्व काही जिवंत राहते असे नाही! संघावर दोनदा गडातर आलेच. आणीबाणीत संघाच्या कार्यालयात बंदुका आणि तलवारी सापडल्याची खोटी चित्रे या 'टाइम्स'ने प्रसिद्ध करून पाहिली! नाही मेला सघ! 'वठला हो वठला!' 'मेला हो मेला'!!' असा सर्वांनी आरडाओरडा केला तरी मेला नाही; पण गिरिलाल जैनांचे दु:ख आम्ही जाणू शकतो. हा वृक्ष पालवला तर महाराष्ट्रातला सध्याचा 'वसंत' ऋतू सपुष्टात येईल असे तर्कट 'टाइम्स'चे परात्पर दैवत यशवंतराव चव्हाण यांनी रचलेले आहे. जनतापक्षाचा सर्वत्र विजय होतो न होतो तोच यशवतराव चव्हाणानी महाराष्ट्रात एक तर्कट सोडले–

> 'जनतापक्ष म्हणजे जनसंघ,
> जनसंघ म्हणजे रा. स्व. सघ,
> रा. स्व. संघ म्हणजे ब्राह्मण!'

असे आम्ही म्हणत नाही! राजारामबापू पाटील म्हणतात. यशवतराव चव्हाण यांनी हे म्हणावे याचे राजारामबापूंना आश्चर्य वाटते. याचा अर्थ यशवतराव धूर्त आहेत. राजकारण त्याना उत्तम कळते हेच अजून राजारामबापूना कळलेले नाही! बापूराव, रा. स्व. सघाविषयी चिंता वाटावी अशी महाराष्ट्रात मुळीच परिस्थिती नाही हे यशवतरावांना ठाऊक आहे. त्यांना चिंता आहे ती मुसलमानाच्या मताची! जनतापक्षाच्या यशाचे रहस्य हे मुसलमानाची हुकमी मते जी आतापर्यंत काँग्रेसला पडत होती ती आपल्याकडे वळविण्यात आहे हे चतुर यशवंतरावानी ओळखले आहे आणि मुसलमानांना आपल्याकडे राखण्याची जी एकमेव युक्ती पडित नेहरूंनी भारताच्या राजकारणात निर्माण केली ती म्हणजे रा. स्व. सघाला येता-जाता शिव्या देणे! पडितजीनी हा उद्योग आयुष्यभर नेटाने केला, इंदिराजीनी केला, आता चव्हाणाकडे हा वारसा आला आहे.

जैन–पुराणातली भाकडकथा नीट समजायला हवी तर हे सगळे माहीत हवे हो! हा, तर मुसलमनाची हुकुमी मते रा. स्व. संघामुळेच जनतापक्षाकडे कशी काय वळली? औरंगाबादचे काँग्रेसवाले आणि माजी काँग्रेसी मत्री झकेरिया आपल्या 'हॅज् द आर्. एस्. एस्. चेन्जड्' या लेखात सागतात–

'आम्ही आतापर्यंत मुसलमान मतदाराना भेडसावीत होतो – 'काँग्रेसला मते द्या! नाही तर जनसघ सत्तेवर येईल. जनसघ म्हणजे रा. स्व. सघ. सघ हा मुसलमानाच्य किती विरोधी आहे हे तुम्हाला नेहरूनी सागितलेच आहे. लक्षात ठेवा–' मते काँग्रेसला द्या नाही तर पोराबाळांना मुकाल बरे!' परंतु आणीबाणीने घोटाळा केला! 'जमाते–ए – इस्लामी' आणि 'रा. स्व. सघातले' लोक याना आपण एकत्र तुरुगात ठेवले. त्याची परस्पराची ओळख होऊ दिली. दोघाच्या हे लक्षात आले की, आपण परस्पराचे शत्रू नसून, आपल्या दोघाचा शत्रू आहे–निधर्मीवाद आणि कम्युनिझम! जे फक्रुद्दिन अली अहमद याना राष्ट्रपति असून करता आले नाही, ते तुर्कमन

गेट निर्वासितांबाबत आज जनसंघाचे वर्चस्व असलेले दिल्लीचे राज्ययंत्र करीत आहे! पाकिस्तानातील आपल्या नातेवाइकांना भेटण्यासाठी मुसलमान नागरिकांना अत्यंत सुलभतेने आज पासपोर्ट मिळत आहेत!

तोबा! तोबा!! म्हणजे जे सत्तेवर आले तर मुसल्मानांना या देशात जगणे कठीण होणार होते त्यांना आज निर्भयतेचा आणि अधिक सुरक्षिततेचा अनुभव येतो आहे, असे कॉंग्रेसवालेच सांगतात! आणि असे असताना १५ ऑगस्टला दिल्लीला जी अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची सभा झाली त्यात यशवंतरावांनी राजकीय ठराव काय केला–? वाचा!

'कमिटीला काळजी वाटते की रा. स्व. संघ आपल्या हुकुमशाही पद्धतीने गावोगावी कॉंग्रेसवर चढाई करीत आहे आणि लवकरच रा. स्व. संघाची यंत्रणा ही अल्पसंख्यांकांना आणि सर्व राजकीय पक्षांना–ज्यांची राजकीय मते त्यांच्याशी जुळत नाहीत–अशा सर्वांना खाऊन टाकील! हा आता केवळ काही काळाचा प्रश्न आहे.'

म्हणजे काळजी आहे ती अल्पसंख्यांकांची! मुसल्मानांची – ख्रिश्चनांची! त्यांची मते पुनः कॉंग्रेसला कशी मिळतील याची! याला उपाय काय? एकीकडे रा. स्व. संघ जनतापक्षात विलीन करावा म्हणणारे श्रेष्ठ प्रागतिक समाजवादी आहेत, असा पुकारा करायचा आणि दुसरीकडे नेहरूंची टवके उडालेली जुनी 'रेकॉर्ड' मुसलमानांपुढे सारखी वाजवायची!

जैन – पुराण यासाठीच लिहिलेले आहे. इंदिरा कॉंग्रेसच्या ठरावातला आम्ही दिलेला भाग या पुराणात नेमका उद्धृत केला आहे. जनतापक्षाचे चिटणीस श्री. मधु लिमये यांनी कलकत्त्याच्या 'संडे' या साप्ताहिकाला एक मुलाखत दिली. ती यात विस्तृत दिली आहे. कारण ही मुलाखत समाजवादी नेहमी जो गोंधळ करतात तसा गोंधळ वाढविणारी आहे. गोंधळ वाढविणारी आहे ना, मग ती जैन–पुराणात समग्र हवीच! यावर संघाचे सरकार्यवाह श्री. माधवराव मुळे यांनी उत्तर दिले आहे. मुळे–लिमये वाद वाढून जनतापक्षात फाटाफूट व्हावी असाच सर्व पुराणाचा सूर आहे.

या पुराणिकांना भरपूर खाद्य पुरविण्याचा उद्योग श्री. मधु लिमये व डॉ. बाबा आढावांसारखे लोक करीत आहेत हे एक प्रकारे चांगले आहे. नाही तर जैन–पुराणे लिहिली जाणार कशी? एखाद्या फांदीवर चढून बूड स्थिरावते न स्थिरावते तोच ती फांदी कापायला सुरुवात करायची, हा दुर्दैवाने समाजवादी म्हणविणाऱ्या देशभक्तांचा जुना खेळ आहे. कारण त्यांच्या डोक्यात इतका गोंधळ असतो, की आपण नेमके कुठे बसलो आहोत याचाच त्यांना सारखा संभ्रम असतो. पुरावा? समाजवादी पक्षाचे अध्यक्ष नानासाहेब गोरे यांनी श्री. बा. न. राजहंस यांच्या जयप्रकाशांच्या चरित्रग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. पुष्कळ वेळा पुस्तकात नसते ते प्रस्तावनेत सापडते. श्री. ना. ग. गोरे प्रस्तावनेत लिहितात–

'१९३४ साली कॉंग्रेस समाजवादी पक्ष स्थापन झाल्यापासून १९३९ पर्यंतच्या काळात कम्युनिस्टांशी जवळीक करण्याचा जो प्रयत्न जयप्रकाशांनी एकांगीपणाने व जवळपास आपला एकट्याचा हट्ट म्हणून केला त्यामुळे समाजवादी चळवळीची दुसऱ्या महायुद्धाच्या ऐन मोक्याच्या वेळी शकले उडाली. त्यामुळे कॉंग्रेस समाजवादी पक्षाला आंध्र, तामिळनाडू व केरळातील स्वतःच्या शाखा जवळजवळ शंभर टक्के गमवाव्या लागल्या.'

पुढे श्री. गोरे लिहितात–

'१९४८ साली कॉंग्रेस समाजवादी पक्ष, कॉंग्रेसची उपाधी टाळून निखळ समाजवादी पक्ष म्हणून राजकारणात स्वतंत्रपणे काम करू लागला. पण आपण एवढी मोठी जबाबदारी अंगावर घेत आहोत तर कॉंग्रेसला पर्यायी म्हणून उभे राहण्याकरिता कशा प्रकारचे एकजीव नेतृत्व निर्माण करायला हवे, आपणाला परिस्थितीशी किती काळ झुंजावे लागेल, केवढी व्यापक संघटना बांधावी लागेल याचा विचार जयप्रकाश नारायण, लोहिया, अच्युत पटवर्धन, अरुणा असफअली हे त्या वेळी जे समाजवादी पक्षाचे नेतृत्व होते त्यांनी केला होता काय?'

तेव्हा ऐन मोक्याच्या वेळी पक्षाची शकले उडविणे, संघटना न बांधणे, किती काळ वनवासात राहिल्यानंतर सिंहासन दिसते याचा अंदाज नसणे, ही समाजवादी चळवळीची कायमची दुखणी आहेत. समाजवाद्यांबरोबर जनतापक्षात या दुखण्याने किरकोळ ताप व सर्दी-पडसे संभवते. आज मधु लिमये, बाबा आढाव यांना शिंका येऊ लागल्या आहेत. या उद्योगाला हिकमतीने खतपाणी घालण्याचे काम 'जैन पुराणे' करतात.

आता पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी ठणकावून सांगितले आहे–

'संघ ही सांस्कृतिक संघटना असून ती तशीच रहावी. संघ जनतापक्षात विलीन होण्याचा प्रश्नच येत नाही. संघ जनतापक्षावर हुकमत गाजवतो की काय करतो, याची काळजी आमची आम्ही करू!'

पण गिरिलालजींनी इकडे लक्ष देऊ नये. त्यांना बरे इंग्रजी लिहिता येते. त्यांनी मधु लिमये काय म्हणतात यावर पुन्हा पुराण लिहावे, आम्ही ते वाचू. कारण पुराणात भाकडकथा असतात आणि त्या भाकड आहेत हे 'मठ्ठ' जनांच्या कधीही ध्यानात येत नाही! □


**विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा**

# । मॅक्झिम गॉर्की ।

## । सुमती देवस्थळे ।

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०**



# रा. स्व. संघ व ग्रामीण प्रदेशातील सामाजिक समता

गीता साने

गेले काही महिने, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल वृत्तपत्रांत बरीच चर्चा चालू आहे; संघाचे कार्य व त्याची बदललेली विचारधारा ह्या चर्चेत पिंजली जात आहेत. तथापि 'ग्रामीण भागात संघाची उद्याची भूमिका काय असेल' ह्या गोष्टीकडे अजून कोणी फारसे लक्ष पुरविलेले दिसत नाही.

संघस्थापनेला जवळजवळ अर्धे शतक झाले असले तरी वरील प्रश्नाला आजच महत्त्व येण्याची कारणे खेड्यापाड्यांतून त्याच्या कार्याचा अलीकडे वाढलेला विस्तार, आणीबाणीच्या कालखंडात त्याने केलेल्या कार्यातून निर्माण झालेली त्याची नवी प्रतिमा, जनसंघाशी त्याचे असलेले घनिष्ट संबंध, तसेच ग्रामीण प्रदेशात, दलित–शोषित गटात नव्याने येत असलेली जागृती व वर उठण्यासाठी त्याने आरंभिलेले उत्सुक प्रयत्न ही मुख्यत्वे आहेत.

आजचा भारत खेड्यांचा आहे व तो तसाच काही तपे तरी रहाणार आहे. तेव्हा भारतीय समाजाच्या मागासपणाची, दुःखदारिद्र्याची उत्तरे खेडूत–विभागातच शोधावी लागणार आहेत, ही गोष्ट आपण बराच काळ दृष्टिआड केलेली आहे. ब्रिटिशसत्ता आल्यानंतरच्या एक-दीड शतकात सामाजिक बदल काही आपोआप तर काही आपल्या प्रयत्नांमधून झाले. आपले प्रयत्न शहरांच्या सीमेपार मात्र सहसा गेले नाहीत. खेड्यांकडे आपले लक्ष वेधले ते स्वतंत्र झाल्यावर. तीस वर्षांनंतर आता ग्रामीण प्रदेशात काम करणारे तीन गट १. कम्युनिस्ट मार्क्सिस्टस् (सी. पी. एम्.) २. सर्वोदयी व ३. संघस्वयंसेवक मुख्यत्वे दिसू लागले आहेत. ह्या तीनही गटांचे कार्यकर्ते एकत्र मोजले तरी गरजेच्या मानाने त्यांची संख्या अजूनही क्षुल्लक आहे. खेडूत–जीवनात, खरेखुरे मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यासाठी ही संख्या पुष्कळच वाढणे आवश्यक आहे.

संख्येच्या अपुरेपणामुळे वरील तीन गट परस्परांच्या संपर्कात आजवर क्वचितच आले; पण उद्या ही परिस्थिती बदलताना, ह्या गटांचा आपसात सुसंवाद रहाणे जरूर आहे व त्या दृष्टीने संघाची भूमिका स्पष्ट होणे जरूर आहे. आजवर संघ चातुर्वर्ण्यप्रामाण्यवादी व म्हणून परिवर्तनविरोधी होता. समतेचे तत्त्व मान्य केल्यावर, संघाची भूमिका किती बदलणार आहे? तिची नवी दिशा व स्वरूप काय रहाणार आहे? ह्या प्रश्नाच्या उत्तरावरून संघाच्या कार्यकर्त्यांचे संपूर्ण क्रान्तीशी नाते काय राहील हे कळणार आहे.

ग्रामीण विभागात काम करणाऱ्या गटांपैकी कम्युनिस्ट-मार्क्सिस्टांचा गट खऱ्या अर्थाने तळा-गाळात समरसलेला आहे. त्यांच्यातच रहाणारा, त्यांच्या सुखदुःखांत वाटेकरी होणारा, त्यांच्यामधून कार्यकर्ते निर्माण करणारा–करू शकणारा, हिंसात्मक संघर्षावर विश्वास ठेवणारा हा गट मागच्या दहा-पंधरा वर्षांत ठेचून काढताना भारतीय शासकांनी कुठलेही बरे-वाईट उपाय बाकी ठेवलेले नाहीत. ह्या गटाचे उद्दिष्ट सामाजिक क्रान्तीचे असून हा गट अहिंसेचा विचार आज तात्पुरता तरी मान्य करीत आहे. १९३०–४० च्या कालखंडात, जुन्या क्रान्तिकारक गटानेही गांधीजींच्या अहिंसेचा स्वीकार केलेला होता. तीच घटना ह्या गटाबाबत पुन्हा घडत आहे.

## मार्गदर्शन व मदत हवी

ह्या गटाचे कामही आज एका नव्या वळणावर आलेले आहे. १९७७ मधल्या निवडणुकांमुळे दलित-शोषित गटांना आपल्या सामर्थ्याचा नवा प्रत्यय आलेला आहे. आजवर त्यांनी समतेची भाषा ऐकली होती. ह्या वेळी खोलवर रुजलेले सत्ताधारी त्यांनी उलथून टाकले आहेत व जुन्या राजवटीत पोसलेल्या गुंडांचा नक्षा उतरविला आहे. ह्या अनुभवातून त्यांच्या महत्त्वाकांक्षा व अपेक्षा जागल्या आहेत. आजवर मोठ्या प्रमाणात कागदावर राहिलेले कर्जमुक्ती, जमिनीवरचे सीलिंग व तिचे पुनर्वाटप, अस्पृश्यता-निवारण, शेतीचा किमान वेतन कायदा इत्यादी कायदे व्यवहारात आणावेत अशी त्यांची मागणी आहे व नवीन सरकारने त्या मागणीकडे लक्ष पुरविणेही अपरिहार्य आहे. ह्या परिस्थितीत दलितांच्या लढाया कार्यकर्त्यांनी लढावयाचे कारण उरलेले नाही. आता त्यांना मार्गदर्शन व मदत मात्र पाहिजे आहे. त्यामुळे त्यांच्यात काम करणे पुष्कळ सुलभ झाले आहे.

ग्रामीण विभागामधला दुसरा गट सर्वोदयसंघाचा आहे. ह्या गटाचा संपर्क खेड्यामधील सर्व थरात आहे; पण स्वतंत्र भारताच्या सरकारशी संघर्ष टाळण्याच्या त्याच्या धोरणामुळे त्याची भाषा

क्रान्तिकारी असली तरी त्याच्या कार्यामुळे दलितांना दिलासा किंवा सहाय्य आजवर मिळाले नाही; भूदान-ग्रामदानासारख्या अभिनव कल्पना प्रत्यक्षात उतरविताना समता साकार झाली नाही त्याच्या कार्यामुळे दलितांचे स्वत्व जागले नाही. जमिनीचे काही तुकडे त्याच्या पदरात पडले; पण ते वरिष्ठ वर्गाची 'दया' म्हणून. त्याची बंधने काही प्रमाणात सैल झाली; पण ती बंधने किती सैल करावीत हे शोषकानीच ठरविले. ही परिस्थिती दलिताना नवीन नव्हती. प्राचीन काळापासून, अनेक कनवाळू राजे-महाराजे, जमीनदार-सावकार त्याच्यावर उपकार करीत आले आहेत ह्या दयेमधून, दलितांना बंधने तोडण्याची शक्ती यावी, अशी कोणाची अपेक्षा नसे व दान घेण्यासाठी लाचार पदर पसरण्याऐवजी त्यानी तो अधिकार मानल्यास, त्याना जबर शासनही होत असे. आजही सर्वोदयाचे सर्वेसर्वा आचार्य विनोबा भावे हे ऋषी झाले व दलित-शोषित त्याचे दुरून दर्शन घेऊन धन्य झाले समता मात्र पुराणाच्या पोथीतच राहिली.

जयप्रकाशजीच्या नेतृत्वाखाली सर्वोदयात एक नवा विचार बळावला आहे. संपूर्ण क्रान्तीच्या योजनाना 'सत्ता सहाय्य करील तर सहकार, विरोध करील तर प्रतिकार' ही नवी भूमिका जेपींनी घेतली आहे व सर्वोदय-कार्यकर्त्यांचा एक मोठा गट त्यांच्यासमवेत गेलेला आहे सर्वोदयी गटाचे मार्ग अहिंसेचे असले तरी, नव्या धोरणामुळे कार्यक्रमाला आता महत्त्व आलेले आहे. त्याची भूमिका समतेचीच रहाणार आहे.

ग्रामीण प्रदेशात काम करणारा तिसरा संघाचा गट, संख्येने मोठा, प्रामाणिक, शिस्तीचा व जिद्दीचा आहे. ह्या गुणामध्ये त्याचे पहिल्या गटाशी साम्य आहे. संघाने अलीकडे बदलेल्या धोरणाचा पुरावा म्हणून त्याने आणीबाणीत केलेले कार्य व मुसलमानाना प्रवेश देण्याचा चालू असलेला विचार ह्या गोष्टी पुढे केल्या जात आहेत तथापि वरील गोष्टीवरून संघ ग्रामीण प्रदेशात, समताप्रस्थापनेबद्दल काय भूमिका घेणार ह्याचा अदाज येत नाही.

आणीबाणीला संघाने संघटित विरोध केला हे खरे; पण तसा विरोध संघाला नवा नव्हता. स्वतंत्र भारताच्या सत्ताधाऱ्याना संघाच्या सेनासदृश संघटनेबद्दल कधीच विश्वास वाटला नाही व त्यामुळे संघ शासनाच्या विरोधाच्या छायेतच वाढत राहिला. आणीबाणीत, जुलमाच्या वरवंट्याखाली सर्वच विरोधक भरडले गेले, त्यामुळे संघाला इतर विचाराचे साथी व संगत मिळाली येवढेच. मुसलमानाच्या सदस्यत्वाच्या संदर्भात तर आपल्या इतिहासाचे पायडे आपल्यापुढे आहेतच. 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' म्हणून मुसलमान शहेनशहाला कुर्निसात करणाऱ्या हिंदु संस्कृतीच्या मक्तेदारानी शिवाजीला राज्याभिषेक करताना मात्र अतोनात खळखळ केली. आजही खेड्यापाड्यामधून मुसलमान अस्पृश्य नाहीत व त्याना वरिष्ठ हिंदु जातीचा सासुरवासही फारसा होत नाही.

समतेचे तत्त्व मान्य केल्यावर चातुर्वर्ण्य सोडावे लागते, हे संघाला मान्य आहे तथापी तळा-गाळात जाऊन काम करण्याची त्याची अजून मनीषा नाही. त्याला राजकारणनिरपेक्ष सामाजिक कार्य करावयाचे आहे व संघर्ष टाळावयाचा आहे. व्यवहारात हा गट आता सर्वोदयी गटासारखा दिसेल. नाही ? असे कार्य खेड्यात तरी उपलब्ध नाही. नुसते विद्यादान करावयाचे व त्यासाठी शाळा उघडावयाची तरी त्यात राजकारण व संघर्ष उभी रहातात हा 'फावल्या' वेळात कार्य करणाऱ्या, संघर्ष टाळणाऱ्या आम्हा कार्यकर्त्यांचा अनुभव आहे.

## संघर्ष सारखा टाळता येत नाही !

खेड्याच्या दलित वेटोळयात वा जागेत शाळा उघडण्यास वरिष्ठ वर्गाचा विरोध असतो. त्यांची मुले शाळेत घेण्यास विरोध होतो. शाळेत मिळणारे दुपारचे अन्न व कपडे वरिष्ठ वर्गाच्या मुलापलीकडे पोचविण्याची संधी नसते आणि हा सारा विरोध प्रच्छन्न व साळसूद असतो. शाळेला फुकट जागा जमीनदार-सावकार हेच देऊ शकतात व देतात. दलित गटातील मुलाना शाळा दोनशे पावलावर असली तरी 'दूर' पडते त्याना शाळा आवडत नाही, म्हणून ती येत नाहीत, एखाद्या कार्यकर्त्याने दलित मुले त्यांच्या घरी जाऊन आणली व शाळेत दाखल केली तरी, त्याची पाठ वळताच, ती मुले परत आपल्या वस्तीत जातात. त्याना शाळेत सवर्णांबरोबर बसता येत नाही. अन्नवाटपात त्याचा क्रम अखेर लागतो व तोवर अन्न बहुशः संपून जाते. काही दिवसानतर त्याची शाळा कायमची सुटते कार्यकर्त्याने पुन. प्रयत्न केल्यास 'वरचे' व 'खालचे' म्हणतात, 'गरिबाची दुर्बुद्ध मुलें ती. त्याना शाळा आवडत नाही नि परवडतही नाही बाई ! ' एकान्तात प्रश्नोत्तरे झाली तर सवर्ण कधी परपराचा तर कधी वडील माणसाचा हवाला देतात. 'खालचे' म्हणतात, 'तुमचे म्हणणे खरे बाई, पण सावकाराच्या मनाविरुद्ध मुले कशी पाठवावी ? बाबाच्या तोंडी कशी द्यावी ? '

दुसऱ्या बाजूने, त्या प्राथमिक वर्गामधूनही इग्रजी मध्यम सुरू करावे, असा आग्रह. सरकारी ( सोशल वेल्फेअर बोर्डाची शाळा ) परवानगी, हिंदी शाळा उघडण्याची आहे असे सागताच, एक खमक्या बाई म्हणाल्या, 'तुमची पोरे इग्रजी शाळेत जातील, मिनिस्टर होतील; आमची पोरे हिंदी शिकतील. चपराशी होतील; असेच ना बाई ? '

ही परिस्थिती उभी राहिली, तेव्हा आमच्यापैकी काहीनी माघार घेतली व आम्ही घरी आलो, कारण 'आम्हाला संघर्ष वर्ज्य होता !' खरे तर सत्यासाठी- न्यायासाठी परिस्थितीला तोंड देण्याचा कणखरपणा आमच्यामध्ये नव्हताच. आम्ही घरी आलो व समतेचे लोण पुढे पोचविण्यात आमचा पराभव झाला. सर्वोदयवाल्यांनाही हा अनुभव आलेला आहे त्यानी सतत संघर्ष टाळला; पण सामाजिक कार्यातून समतेकडे जाणारे मार्गही त्याना सापडले नाहीत. मंदिरात सर्वोदयी सर्व जाती व धर्मांच्या सहकाऱ्याना घेऊनच जात व त्यामुळे पंडयाचे निमंत्रण मिळाले व सर्वांना प्रवेश देण्याची अट पंडयांनी मान्य केली तरच जात. जेथे अट मोडून, पंडयांनी 'हिंसा' केली तेथे ती सर्वोदयी कार्यकर्त्यांनी स्थितप्रज्ञतेने सोसून घेतली. अशाच एका घटनेत, वैद्यनाथ धामच्या ज्योतिर्लिंगाच्या शिवमंदिरात विनोबाजीवर घातक हल्ला झाला व त्याचा कान मार लागून कायमचा बधिर झाला. आजही हे मंदिर अस्पृश्याना मोकळे झालेले नाही. ऋषितुल्य आचार्यांच्या आत्मक्लेशाच्या मार्गाने पंडयाचे हृदयपरिवर्तन झाले नाही- समतेचा मार्ग सापडला नाही.

'शुद्ध' समाजसेवा ही आज शुद्ध राहिलेली नसून त्या सेवेचा परिणाम वरच्या व खालच्या थरामधली दरी वाढविण्यात मात्र होतो, त्यातून समता साधत नाही. जागून उठलेला दलित–शोषित पूर्वी म्हटल्याप्रमाणे मान खाली घालून, वरिष्ठवर्गाची वाढती मिरासदारी ह्यापुढे सोसून घेण्यास तयार नाही त्यामुळे सर्वत्र वातावरणात एक तणाव जाणवत आहे. त्यातून संघर्षाची ठिणगी केव्हा व कुठे पडेल ह्याची कल्पना येत नाही अशाच एका तणावातून एके दिवशी सध्या प्रकाश-झोतात तळपणारी बेलछी उभी राहते. सवर्णांचे पाच-पन्नास तरुण, बायका, पोरे, म्हातारे अशी सरमिसळ अकरा दलित माणसे अंगावर रॉकेल ओतून जिवंत जाळीत असताना इतर सवर्णीय त्यांना कुठलाही प्रतिकार करीत नाहीत. पोलिसही खोटे रिपोर्ट देतात कारण हे कृत्य मुळातच अमानुष, अनुचित आहे असे सवर्णांना वाटतेच असे नाही. चवळ खोऱ्यामधल्या अनुभवावरून त्यांना असेच वाटत असण्याचा संभव आहे की, 'आम्ही रामाचे वंशज, अधर्माने वागणाऱ्या उद्दाम शूद्रातिशूद्राचा निःपात करणे हेच आमचे कर्तव्य ! ते कर्तव्य आम्ही केले, उचितच केले !' मग कायद्याच्या कचाटयातून सुटण्यासाठी अभियुक्त काहीही म्हणोत.

बेलछीची घटना भारतात अपवादात्मक नाही वा ती बिहारचे वैशिष्टयही नाही. अशा घटना सर्वदूर वारंवार घडत आहेत. बेलछी काही एक दिवसात घडत नाही घटना–प्रदेशात वातावरण कित्येक महिने खदखदत असते. 'बेलछी' वीराचा गट तेथे वर्ष-दीडवर्ष धुमाकूळ घालीत होता हे पोलिसांनाही मान्य आहे. दलित जुने पायंडे मोडून, जुनी मिरासदारी कुरतडू लागतात. कुठे उष्टे अन्न नाकारतात, कुठे सवर्णांची मेलेली जनावरे ओढायला नकार देतात, कुठे पूर्ण मजुरी मागतात वा वेठबिगार नाकारतात. कामे अडली म्हणजे वरच्या थरांचा संताप होतो. क्षुब्ध वातावरणात घाबरलेले दलितही कंबर कसून भाडायची तयारी करीत असतात. लहानसहान घटना घडू लागतात वा पूर्वीही घडत असलेल्या गोष्टींना, दलिताचा विरोध सुरू होतो व ह्या सर्वांचा शेवट एखाद्या बेलछीने होतो.

## स्वयंसेवकाची भूमिका

सांस्कृतिक कार्यात रममाण झालेला व संघर्षाचे वावडे असणारा संघाचा स्वयंसेवक ह्या परिस्थितीत व बेलछीसारखी घटना घडत असताना काय करील ? वरिष्ठ जातींना त्याच्या कृत्यापासून परावृत्त करण्यामध्ये अपयश येऊ लागले तर निदान –'आपल्या माथी पाप नको' म्हणून तेथून निघून जाईल. खेडयात घडणाऱ्या दुष्ट घटनामध्ये हरिजन–गिरिजन तर सापडतातच; पण अलीकडे पोटासाठी तेथे जाणाऱ्या व कल्याण-कार्यासाठी तेथे पाठविलेल्या शेकडो निराधार स्त्रियांचा गटही अशा घटनांना बळी पडत आहे. आपल्या कृत्याच्या समर्थनार्थ, विशिष्ट स्त्री वाईट चालीची असल्याचा प्रचारही सतत सुरू झालेला असतो. संघ-स्वयंसेवक ह्या स्त्रियांचीही उपेक्षा करणार का ? त्यांना संरक्षण द्यावयाचे तर खेडयामधल्या गुंडाच्या झुंडीशी गाठ असते ही निरगाठ स्वयंसेवक कशी सोडवील ? ह्या परिस्थितीत, संघाचे धोरण काय राहील ? संघाचा संपर्क सवर्ण थराशी असेल आपले पोलिस ह्याच वर्गाचे असल्याने, त्यांचा पाठिंबा स्वतःच्या थराला असतोच. समाजाचे हे संघटित शस्त्र दलितांना पायदळी तुडवायला उभे राहिल्यावर 'चकमकी' घडतात. त्यात दलित व त्यांच्यामधले कार्यकर्ते मोठया प्रमाणात मारले जातात. ते सर्व 'निर्दय' सीपीएमचे असल्याचा दावा पोलीस करतात पुराव्यासाठी घटनास्थळी हुकमी हत्यारे पोलिसांना 'सापडतात' ह्या सर्व गोष्टींवर आपला विश्वास बसतो. दलिताशी प्रत्यक्ष संपर्क नसलेला स्वयंसेवक ह्याला अपवाद ठरेल का ? समतेच्या भूमिकेतून दिसणारे, सामाजिक अन्याय त्याला बोचतील का ? बोचल्यास तो अन्यायाविरुद्ध उभा ठाकेल का ? व उभा राहिल्यास संघ-भूमिकेचे काय होईल ?

बेलछीसारख्या घटनाबाबतच्या प्रतिक्रियांचा विचार करताना आतापर्यंत केवळ व्यक्तिगत स्वयंसेवक विचारात घेतलेला आहे; पण संघ ही शिस्तबद्ध संघटना आहे. संघाचे समतेचे धोरण सरसंघचालकांनी ठरविलेले आहे तेव्हा या नव्या व कठीण धोरणाबद्दल स्वयंसेवकांमध्ये भरपूर जागृती करणे संघाला आवश्यक आहे. आपले जीवन, आपली संस्कृती विषमतेच्या पायावर उभारलेली असल्याने विषमतेचा व्यवहार माणसाच्या स्वभावात, वागण्या-बोलण्यात बाल्यावस्थेमध्येच रुजू लागतो. एका दिवसात, एका आज्ञेने हे पुढे फोफावत जाणारे रान जळून जात नाही. विचार करून कृती केली तर माणूस आपल्या तत्त्वाशी प्रामाणिक राहतो; पण आकस्मिक प्रसंग उभा राहिला तर तो चटकन् जुन्याकडे वळतो. संघस्वयंसेवकही माणसेच आहेत. त्यांच्या प्रतिक्रिया जुन्या वळणावर जाऊ नयेत म्हणून आवश्यक असणारी जागृती संघ थोडया वेळात कशी साधतो, हे हृदयपरिवर्तन कसे घडते, हे पाहणे इतरांनाही उद्बोधक होईल.

समतेच्या भूमिकेवरून संघाचो परिवर्तनाबाबतची भूमिका आणखी एका पैलूने महत्त्वाची आहे. आता जागलेला दलित–शोषित ह्यापुढे आपल्या अधिकारासाठी उभा राहणार आहे. शोषकवर्गही त्याच्यावर हिंसेचे हत्यार उगारताना मागे–पुढे पाहणार नाही. अशा संघर्षात कार्यकर्त्या गटाची भूमिका शोषिताना पाठिंबा देण्याची असल्यास ते अहिंसक असले व त्यानी शोषिताचा लढा अहिंसक मार्गाने लढविला असला तरी त्यांच्याविरुद्ध हिंसेचा प्रयोग होतो, ह्याचा अनुभव ह्यापूर्वी आलेला आहे. विनोबाजींची लक्ष्मणरेषा ओलांडून सर्वोदयी कार्यकर्ते तामिळनाडूच्या तंजावर जिल्ह्यात व तेलंगणात शोषिताच्या बाजूने अहिंसक लढयात उतरले तेव्हा त्यांचे खून पडले व त्या एकाकी कार्यकर्त्यांच्या हत्येनंतर समतेचा–न्यायाचा लढा निमाला, हा ताजा इतिहास आहे.

## दलित जागा झालेला आहे....

ग्रामीण प्रदेशात निकट भविष्यात निर्माण होणारे संघर्ष तीव्रतर होण्यास संघाचे 'अपक्ष' स्वयंसेवक अजाणता कारण होणार का ? साधेपणा, सच्चेपणा, त्याग, तळमळ ह्या अनेक गुणांनी वरच्या थराना प्रमाण वाटणारा हा स्वयंसेवक 'अपक्ष' राहिल्याने मिरासदारवर्गाला नैतिक पाठबळ अबोल राहूनही देत राहील, तर चातुर्वर्ण्यप्रणीत जुनी सोपानांची समाजरचना बदलण्याचे कार्य बिकटतर व रक्तरंजित होईल. दडपशाहीने दलित दबतीलच ह्याची ग्वाही आता कोणी देऊ शकत नाही. त्यांनी महापुरातही जगणाऱ्या लव्हाळयाची भूमिका सोडली आहे व त्यांना आपले हितचिंतक ओळखता येत आहेत. जमीनदारीने ग्रासलेल्या उत्तर भारतात सी. पी. एम. चे कार्य पुन्हा सुरू होत आहे.

मागच्या सरकारने केलेला अनर्गल प्रचार व दडपशाही, चकमकी, दंडा-बेडी, मारहाण, क्रूर छळ हे सर्व सोसून हा गट पुन्हा उभा राहत आहे. बंगालमध्ये त्याला सत्ताही मिळाली आहे. त्याला कारण दलिताना ह्या गटाबद्दल वाटणारी आपुलकी व स्वतःबद्दल नव्याने निर्माण झालेला आत्मविश्वास हे आहे. औद्योगिक समाजाच्या गरजा व दलिताचा दृढनिश्चय ह्याच्यापुढे भारताची जुनी जन्मानुवर्ती समाजसंघटना तुटणे अपरिहार्य आहे. नवी गुणानुवर्ती संरचना निर्माण करावी लागणार आहे. कारण तिला पर्याय बेबंदशाही/हुकुमशाहीचा आहे.

ग्रामीण प्रदेशामधल्या कार्यकर्त्यांमध्ये दोन तट न पडतील तर 'संपूर्ण क्रांती' शांततामय मार्गांनी साधण्याचा आपला मनोदय काही अंशी तरी सफल होईल. संघाच्या जुन्या निष्ठा व आचार किंवा आजही स्वयंसेवक व्यक्तिशः करीत असलेली व्रतवैकल्ये ह्यांचा विचार आज महत्त्वाचा नाही, तर उद्या संघाच्या कार्यात कोणते परिवर्तन होणार आहे व संघ ते कसे साधणार आहे, हेच प्रश्न महत्त्वाचे आहेत. हे प्रश्न विचारण्याचा अधिकार प्रत्येक जाणत्या नागरिकाला आहे ना ? □

# चक्रम्चक्री ( २३ )

# परिणामशून्य पुनरागमन

दीर्घस्मृति विश्वनाथ

आपल्या माजी पतप्रधान इंदिराबाई या एक बलदंड आणि वादळी व्यक्ती आहेत. बलदंड अशासाठी की, त्यांचे व्याख्यान आणि मौन, त्यांचा जनवास आणि वनवास, त्यांची हालचाल आणि त्यांचे स्वस्थ बसणे, त्यांचा राग आणि लोभ या परस्पर विरोधी गोष्टी सारख्याच प्रमाणात चर्चेचा विषय होतात. तुम्हाला त्या चतुर गुराख्याची गोष्ट माहीत असेलच.

माहीत असेल; पण आता आठवत नाही. काय गोष्ट आहे ?

एका राजाने त्या गुराख्याला दरबारात बोलाविले आणि गुराख्याची परीक्षा पाहण्यासाठी राजा साधा पोषाख करून दरबारी माणसातच बसला. गुराखी दरबारात आला. त्याने जरा इकडे तिकडे न्याहाळले आणि नेमका राजापुढे जाऊन मुजरा केला. राजाने विचारले की, 'तू मला कसं ओळखलंस ?' गुराखी म्हणाला, 'सारी माणस डोळयाच्या कोपऱ्यातून तुमच्याकडेच पाहात होती.' त्या राजाची जी स्थिती होती तीच इंदिराबाईची आहे. आज बाई अधिकारावर नाहीत; कॉंग्रेसपक्षाच्या एकमेव नेत्याही नाहीत तरी राजकारणाचा सारा गोल कसा त्यांच्या आसाभोवती फिरतो आहे.

पण हीच आश्चर्याची गोष्ट नाही का ? बाई काही स्वेच्छेने, कृतार्थ झाल्याने आणि सुखा-समाधानाने राजकारणातून बाहेर गेल्या नव्हत्या. त्यांना जनतालाटेने बाहेर फेकून दिले होते. त्यांच्या पक्षाचे लोकसभेतील बहुमत गेले होते. एवढयानेच भागले नाही, तर त्यांचा स्वत चाही घसघशीत पचावन्नहजार मतांनी पराभव झाला ! त्यानंतर त्यांच्या कारकीर्दीतील नाना काळी प्रकरणे सतत बाहेर येत आहेत. त्यांच्या आश्रितांनी सत्तेची धुंदी चढल्यावर घातलेल्या बेबंद नग्या नाचाच्या फिल्म्स लोकापुढे सतत प्रदर्शित होत आहेत. बाईंच्या उर्मट चिरंजिवानी वरिष्ठ मन्त्र्यानाही चपराश्यासारखे वागविले याचे चुटके वारवार चघळले जात आहेत बाईंनी गोळा केलेल्या टोळभैरवाच्या चाळयाना बाईंचा उघड किंवा आतून पाठिंबा होता, कमीत कमी या गोष्टी त्याना नापसत तरी नव्हत्या हेही सगळयाना कळून चुकले आहे. बरे, या फार जुन्या हकीकती आहेत, असेही नाही. अशा बदनाम व्यक्तीने राजकारणावर इतके प्रभुत्व गाजवावे; त्यांच्या हेतूचा मागोवा घेत यशवतरावासारख्या मुरब्बी आणि तुलनेने स्वच्छ नेत्याला पावले टाकावी लागावीत; जनतापक्षासारख्या आणीबाणीच्या वणव्यातून तावूनसुलाखून बाहेर पडलेल्या, लोकसभेत प्रचड बहुमत असलेल्या आणि सात राज्यात सत्तेवर असणाऱ्या पक्षाला त्यांच्या कारस्थानाची धास्ती वाटावी, ही नवलाची गोष्ट नाही का ? बाईंची अशी काय मोहिनी आहे ?

## बाईंची मोहिनी

बाईंच्या राजकारणावरील प्रभुत्वाचे निम्मे रहस्य त्यांच्या वादळी व्यक्तिमत्त्वात आहे. वादळी व्यक्तिमत्त्वाचे वादळीपण दोन गोष्टीत साठलेले असते. पहिले म्हणजे अनपेक्षितता. बाई केव्हा काय करतील याचा अदाज राजकारणात आयुष्यभर मुरलेल्या नेत्यांनाही करता आला नाही १९६९ साली त्या मोरारजींचे अर्थखाते काढून घेतील असे कुणाला वाटले होते ? तातडीने बँकांचे राष्ट्रीयीकरण होईल असे कोणास स्वप्न पडले होते ? सजीव रेड्डींच्या उमेदवारीचा फॉर्म भरून नतर त्यांचा विश्वासघात पतप्रधानपदावरील व्यक्ती करतील असे भविष्य कुणाला करता आले असते ? संस्थानिकाना दिलेली आणि घटनेच्या गाभाऱ्यात बसविलेली आश्वासने मध्यरात्री काढलेल्या वटहुकुमाने हातोहात निकालात काढली जातील असे कोण सागू शकला असता ? आणि शेवटी, आपण घेतलेल्या पवित्र शपथेला हरताळ फासून या माजी पतप्रधान लोकशाहीचाच गळा आवळतील इतकी घातकी कल्पना कोणता जबाबदार नागरिक करू शकला असता ? अर्थात वरील बहुतेक उदाहरणातील अनपेक्षितता राजकीय खेळाचे नियम धुडकाविल्यामुळे निर्माण झाली आहे, पण सामान्य माणसाला अवचिताचे आकर्षण अधिक असते. अचानक घटा वाजू लागली की, लहान मूल आनंदाने टाळया वाजविते. मग ती घंटा आगीच्या बंबाची असो की देवळातल्या आरतीची असो.

पण गुरुजी, बाईंची लोकप्रियता केवळ त्यांच्या राजकारणातल्या अनपेक्षिततेतून आली आहे, हे म्हणणं फारच एकांगी आहे. मोरारजीना मन्त्रिमडळातून हाकलणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थानिकांचे तनखे बद करणे या गोष्टी केवळ अनपेक्षित होत्या म्हणून लोकप्रिय झाल्या अस कस म्हणता येईल ? लोकाना त्यात आपल्या जगण्याला थोडी झिलई मिळेल अशी आशा वाटली म्हणूनच या करामती लोकप्रिय झाल्या आणि ७१ च्या निवडणुकीत बाई विरोधकाना गारद करू शकल्या.

अहो बाबुराव, मी अस मुळीच म्हणत नाही की, बाईंची राजकारणावरची पकड केवळ त्यांच्या अनपेक्षित हालचालीमुळे त्याना मिळाली आहे. तुम्ही आता सागितलेला मुद्दा त्यांच्या वादळीपणाचा दुसरा भाग आहे. वादळाने काय होते ? जुनी घरे, जुनाट झाडे मोडून पडतात, हवा थड होते, क्वचित पूर येऊन वस्त्या वाहून जातात. असे बरेच काही तरी घडते की जे एरवी मुद्दाम कुणी केले नसते. हे अगदी खरे आहे की, कॉंग्रेसचे जुने पुढारी मोडीत काढणे, संस्थानिकांचा दिमाख उतरविणे किंवा बँका सरकारी करणे या गोष्टी नेहरूंच्या किंवा शास्त्रींच्या कारकीर्दीत घडल्या नाहीत, घडल्या नसत्याही. कारण फुकटची कुणावर झडप घालून काही

बलदंड व्यक्तीना अगर वर्गांना वगविल्याचे रिकामे समाधान बुभुक्षित जमावाला मिळवून द्यावे अशी त्यांची वृत्ती नव्हती तुम्ही पहा, या सगळ्या गोष्टी बाईंनी केल्या; पण त्यापासून कोणाचा किती फायदा झाला? ७२ साली प्रत्येकाला उपलब्ध असणारे अन्न ६६साली उपलब्ध असणाऱ्या अन्नापेक्षाही कमी होते; ७३ साली असलेली बेकारांची संख्या ६६ सालच्या बेकाराच्या संख्येहून जास्त होती; ७५ साली उपलब्ध असणारा एकूण कपडा ६६ सालच्या कपड्याच्या फक्त तीन-चतुर्थांश होता. तेव्हा बाईंनी बलदडाना नमविले याचे गोरगरिबांना झालेले समाधान बालिश होते, अज्ञानातून निर्माण झालेले होते किंवा काही तरी अकित घडते आहे या हर्षातून निर्माण झाले होते असे म्हणणे भाग आहे. अर्थात बाईंच्या प्रचारकांनी असा भास मात्र निर्माण केला की, यातून गरिबाचे कल्याण होत आहे पण तो बाईंच्या फिरस्त्यांच्या विक्रयचातुर्याचा भाग होता.

म्हणजे बाईंनी आणि त्याच्या टाळकुटचानी लोकांची फसवणूक केली असेच की नाही?

लोक जर फसायला तयार असतील, तर नेत्यांनी त्याना का फसवू नये? आता मी असे म्हणत नाही की, बाईंनी लोकाना हेतुतः फसविले. कॉंग्रेसमध्ये बराच मोठा गट असा होता की, काही सैद्धान्तिक भूमिकेतून त्याना कॉंग्रेसच्या जुन्या नेत्यांना हाकलणे, बँका सरकारने घेणे किंवा संस्थानिकाना निकालात काढणे या गोष्टी व्हाव्या असे वाटत होते. त्यांना खुष करणे हा बाईंचा मूळ हेतु होता. गरिबाना त्यात आशेचा किरण दिसला हा एक बायप्रॉडक्ट; पण त्यातून एक फार मोठी गोष्ट साधली गेली. बाईंचे आजचे राजकारणातील स्थान, ही जी गोष्ट बाईंनी साधली त्यावर आधारलेले आहे.

## राजकारणावरील पकड

अशी ही कोणती गोष्ट?

यासाठी सध्याच्या पुढारीवर्गाचे स्वरूप लक्षात घेतले पाहिजे इंग्रजी अंमलात ज्यांनी इंग्रजी शिक्षणाचा आणि ब्रिटिश उदारमतवादी राजकारणाचा स्वीकार केला त्याच्यातून सध्याचा पुढारीवर्ग निर्माण झाला आहे. इंग्रजी राजवटीपूर्वी हे लोक जमीन-महसूल खात्यात कारकुनी करीत असत. म्हणजे पूर्वीपासून पांढरपेशा असलेल्या समाजात इग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला तेच लोक इग्रजी राज्याविरुद्ध चळवळ करू लागले आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर या लोकाच्या राजकारणी तत्त्वांनाच भारतीय घटनेत स्थान मिळाले. थोडक्यात, गेली अनेक शतके कारकुनी, शिक्षकी किंवा तत्सम उद्योग करणाऱ्या जातीनी आणि वर्गांनी राजकारणाला सध्याचा घाट दिलेला आहे आणि हा घाट जर चालू ठेवायचा असेल तर त्याची जिम्मेदारी मुख्यत्वे याच लोकांवर आहे.

पण महाराष्ट्राकडे किंवा गुजरायकडे पाहिले तर तेथील नेता-मडळ काही सर्वस्वी पाढरपेशा दिसत नाही

सकृत् दर्शनी तसे वाटत नाही. कारण महाराष्ट्र आणि गुजराथ येथील परिस्थिति थोडी निराळी आहे. कर्नाटकातही तशीच काहीशी परिस्थिती आहे; पण मी बोलतोय् ते मुख्यत उत्तर हिंदुस्थानाविषयी आणि त्यातही हिंदी भाषेसंबंधी. काही अपवाद सोडले तर या भागातील पुढारी ब्राह्मण, कायस्थ अशा जातीतील असून ते लोक पूर्वीपासून म्हणजे मोगलकाळापासून, सरकारी नोकरीत आहेत आणि सर्व राजकारणावर या बाबूमडळीची गडद छाया आहे.

बर, पण त्यात वाईट काय आहे?

मी कुठे त्यात काही चागले-वाईट आहे, असे म्हणतोय्? आपली वस्तुस्थिति सांगितली. तर, या बाबूमडळीच्या राजकारणापासून फटकून राहणारे साधारण स्थूलमानाने तीन गट पूर्वीपासून आहेत. पहिला गट म्हणजे जमीनदार – वतनदार – मठाधिपती आणि धर्माचे वर्चस्व असणाऱ्या लोकाचा; दुसरा गट मुसलमानाचा आणि तिसरा गट अस्पृश्य, आदिवासी अशाचा. या तीन गटाखेरीज अर्थात असाही एक फार मोठा समूह आहे की जो दैनंदिन जीवनकलहातून डोकेच वर काढू शकत नसल्याने राजकारणापासून दूर आहे हे तीन गट जोपर्यंत या बाबू राजकारणाशी समरस होत नाहीत तोपर्यंत राजकारणाचा हा ढाचा काही स्थिरावणार नाही.

पण हे गट राजकारणात आणणार कसे? आणि ते आलेच पाहिजेत हा हट्ट तरी का?

हे गट राजकारणात आलेच पाहिजेत, कारण त्यांना मते आहेत आणि त्या मतांची सख्याही मोठी आहे. हे गट राजकारणाशी समरस होवोत अगर न होवोत ते राजकारणावर प्रभाव तर पाडू शकतात. आता याना राजकारणात आणायचे म्हणजे तीन उपाय आहेत. पहिला म्हणजे सध्याच्या राजकारणी वर्गाने ज्या क्रमाने ब्रिटिश चेहऱ्या-मोहऱ्याच्या राजकारणाचा स्वीकार केला, त्याच क्रमाने हे गटही राजकारणाचा स्वीकार करतील अशी अपेक्षा बाळगायची. हा उपाय लाब पल्ल्याचा आहे आणि सरसकट सगळ्यांना मतदानाचा अधिकार दिल्यानंतर हे राजकारणाच्या बाहेर असणारे गट दम धरतील असा संभव दिसत नाही. दुसरा उपाय म्हणजे या गटाना स्वतंत्रपणे संघटित होऊ द्यायचे आणि मग त्या संघटनाशी काही देवाणघेवाण करून एक युतीचे किंवा 'कोॲलिशन'चे राजकारण खेळायचे. हा उपाय फारच धोक्याचा आहे आणि तो धोका पत्करणारे नेतृत्व सध्याच्या राजकारणी वर्गातून निर्माण होईल असे वाटत नाही तेव्हा उरला तिसरा उपाय. तो म्हणजे हे राजकारणाच्या बाहेर असलेले गट अशाच असंघटित स्वरूपात ठेवायचे. त्याच्यातील जरा पुढारलेल्या मंडळीना अधिकारस्थाने देऊन जवळ करायचे, गोंजारायचे आणि त्यांचा थोडाफार विश्वास संपादून हे राजकारणाच्या मूलस्रोतापासून फटकून राहिलेले गट विरुद्ध जाणार नाहीत अशी खबरदारी घ्यायची. या तिसऱ्या उपायाचा अवलब बाबूमडळीच्या पुढाऱ्यानी सतत केला आहे. हे ज्यांना जमले त्यानी राजकारणावर प्रभुत्व गाजविले. नेहरूच्या अधिराज्याचे रहस्य हेच होतें, बाईंना ७१ साली मिळालेल्या विजयाचे कारणही हेच होते

नेहरूंना आणि बाईंना हे का जमले आणि इतरांना का जमले नाही?

नेहरू बाबूमंडळीच्या बाहेर जाऊन या राजकारणापासून फटकून राहणाऱ्या गटातही लोकप्रिय झाले. कारण गांधीजीचा वारसा त्याच्याजवळ होता. 'बाबू-राजकारणा'पासून आपण अलिप्त आहोत हे भासविण्याची करामत ते करू शकत होते आणि तिसरे म्हणजे मध्ययुगीन राजेलोकात 'प्रजेत इमानदारीची भावना निर्माण करण्याची जी कुवत असे ती त्यांच्याजवळ होती.

इंदिराबाईजवळ, नेहरूंजवळ असलेली पहिली आणि तिसरी गोष्ट आहे; पण दुसरी मात्र नाही !

म्हणजे काय ? जरा खुलासेवार बोला की !

म्हणजे असे की, बाईंजवळ नेहरूंचा वारसा आहे. त्यांच्याजवळ मध्ययुगीन जमीनदारांजवळ जो करारीपणा, कर्कशपणा, सामान्य माणसाला खेळविण्याचे, खूप ठेवण्याचे कसब असे, ते आहे. त्यामुळे त्यांच्याविषयी एक इमानदारी लोकांना वाटत असावी; परंतु 'बाबू–राजकारणा'पासून अलिप्त असल्याचा जो भास नेहरू निर्माण करू शकत होते, आपले या राजकारणात कोणतेही हितसंबंध गुंतलेले नाहीत असा विश्वास ते या राजकारणबाह्य गटांना देऊ शकत होते तसा भास बाई निर्माण करू शकत नाहीत; तसा विश्वास देऊ शकत नाहीत.

असे का व्हावे ?

कारण प्रस्थापित राजकारणात नेहरूंचे स्थान जसे 'अकुतोभय'होते तसे बाईंचे नाही. बाई नेहमी आपल्या मानाविषयी, स्थानाविषयी सजग असत. पंतप्रधानपद टिकविण्यासाठी सामान्य जनतेतील आपल्या लोकप्रियतेची तलवार नेहरूंना कधी खणखणावी लागली नाही; पण बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावर आणि ७५ साली निवडणूक रद्द ठरल्यावर भाडोत्री माणसांची गर्दी जमवून आपल्या लोकप्रियतेचे प्रदर्शन बाईंना करावे लागले. बाईंचे एक वैशिष्टच मान्य केले पाहिजे की ७१ सालच्या निवडणुकीत, एकदाच का होईना, प्रस्थापित राजकारणात आकंठ बुडलेल्या असतानासुद्धा त्यांनी राजकारणबाह्य लोकांची मते मिळविली आणि ६७ सालच्या निवडणुकीनंतर एकूण प्रस्थापित राजकारणच उखडले जाऊन अराजक माजते की काय अशी जी भीती निर्माण झाली होती, ती नष्ट केली. आज बाईंचा जो दरारा आहे, तो त्यांच्या या करामतीच्या आठवणीमुळे आहे. ही करामत त्या करू शकल्या, कारण मी मघा म्हटल्याप्रमाणे त्यांच्या वादळी राजकारणाकडे त्यांनी सामान्यांना आकृष्ट करून घेतले. त्यात थोडी फसवणूक होती; पण तसली नाटके राजकारणात चालतातच.

## अपमानकारक पुनरागमन

पण माझ्या अजून हे लक्षात येत नाही की, बाईंच्या वादळी राजकारणाचा आणि राजकारणापासून फटकून वागणाऱ्या गटांना त्यांच्याविषयी आकर्षण वाटण्याचा काय संबंध आहे ?

मी मघाशी सांगितले की मुसलमान, अस्पृश्य व आदिवासी आणि मध्ययुगीन वातावरणातून अजून बाहेर न पडलेले सरंजामदारीवर्ग हे राजकीय संरचनेशी फटकून वागतात आणि या गटांनी राजकारणाचा सध्याचा ढाचा मोडून पाडू नये, असा प्रस्थापित राजकारणावर वर्चस्व गाजविणाऱ्या बाबूमंडळींचा प्रयत्न असतो. या तीन गटांपकी सरंजामदारी गटाचा नाद काँग्रेसने पूर्वीपासूनच सोडला होता. मुसलमान व दलित यांनी राजकीयदृष्टचा संघटित होऊ नये असा काँग्रेसचा प्रयत्न होता. आता मुसलमान काय किंवा दलित काय हे राजकीय अर्थाने संघटित नसले तरी परंपरागत अर्थाने संघटित आहेत आणि त्यांचे पुढारीही आहेत. अशा पुढाऱ्यांना सत्तेचे तुकडे चघळण्यासाठी देऊन आपल्या कच्छपी ठेवायचे असे धोरण प्रस्थापित राजकारणाच्या पुढाऱ्यांचे असते. याचा व्यत्यास असा की, प्रस्थापित राजकारणात विजयी ठरणाऱ्या पुढाऱ्यांच्या कच्छपी मुसलमान आणि दलित यांचे तथाकथित पुढारी नेहमी राहतात. बाईंच्या वादळी राजकारणाने प्रस्थापित राजकारणावर त्यांची पकड दृढ झाली. त्यामुळे मुसलमान व दलित या गटांच्या दादांना बाईंचा आश्रय घेणे सोयीचे वाटू लागले. इतकेच नव्हे तर प्रस्थापित वर्गाच्या हितसंबंधांना थोडीफार भूल घालून राजकारणबाह्य गटांना काही देण्याचे सामर्थ्य बाईंत आहे असा विश्वास वाटू लागला. याखेरीज नेहरूंचा वारसा आणि सरंजामदारांच्या ठायी असलेले मागासवर्गात इमानदारीची भावना जागृत करण्याचे सामर्थ्य, या दोन गोष्टी बाईजवळ होत्याच.





आपल्या लहानग्याला डेन-टॉनिक वेळीच दिल्याने दात येते वेळी होणाऱ्या त्रासापासून त्याला आराम मिळेल व दात सुलमतेने येतील. मुलांना आनंदी ठेवा. खेळकर बनवा. डेन-टॉनिक द्या.

होमिओचे
डेन-टॉनिक

होमिओ लॅबोरेटरीज्
राममोहन हायस्कूल शेजारी, गिरगांव, मुंबई-४

म्हणजे ६७ सालच्या निवडणुकात काँग्रेसच्या विरोधात गेलेल्या मुसलमान आणि दलित या गटाना काँग्रेसच्या पखाखाली आणून ७१ च्या निवडणुकात बाईंनी केवळ काँग्रेसची राजवट दृढ केली इतकेच नव्हे तर प्रस्थापित राजकारणाला अराजकापासून वाचविले मग असा कर्तृत्ववान नेता राजकारणातून बाहेर फेकला जावा ही दुर्दैवाची गोष्ट नाही का ? त्यानी पुन. राजकारणात प्रवेश केला तर त्याचे स्वागतच करावयाला हवे !

प्रस्थापित राजकारणाला संजीवनी देऊन बाई थावल्या असत्या तर त्याना राजकारणातून बाहेरही जावे लागले नसते; पण जनमानसावर आपली पकड बसविताना बाईंच्या लक्षात एक गोष्ट आली ती ही की, संघटित जनतेपेक्षा असंघटित जमाव हाताळणे सोपे असते. संघटित जनतेचे हितसंबंध असतात, उद्दिष्टे असतात, अपेक्षा आणि मागण्या असतात. संघटित जनतेला झुलविणे, फसविणे किंवा आपल्या हेतूच्या सिद्धतेसाठी वापरणे सोपे नसते. संघटित समाजाला गोष्टी समजावून सागाव्या लागतात, परस्पर विरोधी उद्दिष्टाचा मेळ बसवावा लागतो, त्याला त्यागाचे आवाहन करावयाचे असेल तर नेतृत्वाचा दर्जा निराळ्या कोटीचा असावा लागतो. या सर्व गोष्टीचे बाईंच्या वादळी राजकारणाला वावडे होते. त्यामुळे आपण असघटित अशा दलिताच्या, मुसलमानाच्या, शेतमजुरांच्या नेत्या आहोत असा आव आणून त्यानी साऱ्या सघटित समाजाकडे दुर्लक्ष करावयास सुरुवात केली. इतकेच नव्हे तर हे वर्गही असघटित आहेत असेच समजून त्या वागू लागल्या.

म्हणजे कसं काय ?

उदाहरणानीच बघा. १९७० साली गोदीकामगारानी संपाची धमकी दिली. त्याचे पुढारी वाटाघाटीसाठी दिल्लीला गेले. त्या वेळी त्या पुढाऱ्याना बाजूला ठेवून बाईंनी गोदी–कामगाराना सपावर न जाण्याचे आवाहन केले. नंतर ७१ साली त्यांनी वर्तमानपत्रावर शस्त्र धरले. वर्तमानपत्रे ही मूठभर भाडवलवाल्याची प्रचारक आहेत, समाजमनाचा कानोसा घेण्याचा प्रयत्न ती करीत नाहीत असा ओरडा चालू झाला. त्यानतर न्यायालयांची पाळी आली. काँग्रेसचे तेव्हाचे अध्यक्ष शंकरदयाळ शर्मा यानी दलिताना सागूनच टाकले की तुम्ही न्यायालयाना वेढा घालून बसत जा, म्हणजे कोर्ट तुमच्याविरुद्ध कसा निकाल देतात ते बघता येईल. विरोधी पक्ष, ससद आणि अखेर स्वत चा काँग्रेसपक्ष याचा काडीचाही मुलाहिजा त्या ठेवीनात. जनता म्हणजे एक चर्याहीन, मतशून्य आणि सघटनाविरहित जमाव आहे आणि त्या जमावाला झुलविणाऱ्या, फसविणाऱ्या आणि खुशीत ठेवणाऱ्या जादूगार आपण आहोत असा देखावा तयार झाला. सघटित जनतेचा विश्वास ही सत्त्वशील सत्ताधीशाने अर्थपूर्ण राजकारणासाठी वापरायची ठेव असते. बाईंच्या दृष्टीने जनता म्हणजे असंघटित जमाव होता आणि वारांगनेसारख्या दौलतजादासाठी खुर्दासारखा तो उधळणे एवढाच त्याचा उपयोग होता. समाजात अस्तित्वात असणाऱ्या वर्तमानपत्रे, पक्ष, न्यायालये, वकिलाचे सघ, कामगारसंघटना या सर्वांविषयीची त्यांची अपेक्षा शेवटी अशा थराला पोचली की, शासन ही एकमेव लेख देण्यायोग्य सघटना देशात उरली आणि अखेर शासनसस्था म्हणजे कोण ? तर स्वत: पतप्रधानच ! असे झाले की, पतप्रधान म्हणजे शासनसस्था आणि शासनसंस्था म्हणजेच जनता ऊर्फ माणसांचा समूह!

हे तुम्ही जरा अतिरजित बोलता आहात!

मुळीच नाही. केशवानद भारतीचा सुप्रीम कोर्टासमोर खटला चालू होता. नानी पालखीवाला सरकारविरोधी बाजू मांडीत होते. त्या वेळी सरकारी वकील निरेन डे यानी त्यांना सुनावले, 'आय् रिप्रेझेंट द पीपल्, यू रिप्रेझेंट द मनीबॅग्ज' वास्तविक निरेन डे कोण, तर सरकारी नोकर आणि सरकार कोण, तर खटल्यातील एक प्रतिवादी; पण आपण म्हणजेच जनता हा दिमाख पहा! पुढे आणीबाणीत तर शासन आणि शासनाधिपती इंदिराबाई यांचा अहंकार कळसाला पोचला. मुदत संपलेल्या आणि दहशतीच्या वरवंट्याखाली चिरडलेल्या लोकसभेकडून त्यानी घटनेचे 'प्रिॲम्बल' म्हणजे प्रस्तावना बदलून घेतली. 'प्रिॲम्बल'ची सुरुवात होते 'वुई द पीपल् ऑफ इडिया' या शब्दानी. बाईंच्या भाटानी भरलेल्या, मुदत संपलेल्या लोकसभेचा हा अहंकार की आपण म्हणजेच 'पीपल्' आहोत ! बाईंनी आपल्या उद्दामपणाने तुमचा, आमचा, देशातील जनतेचा हा जो घोर अपमान केला, तो आपल्या मनात सतत डाचत राहिला पाहिजे आणि बाईंच्या राजकारणाला आपण मुळीच थारा देता कामा नये.

पण तसे तर काही होताना दिसत नाही. बाईंच्या स्वागताला हजारो लोक जमताहेत, त्यांच्या विजयाच्या घोषणा देतायत. परवाच चंद्रजित यादवानी 'इदिरा गाधी झिंदाबाद' ही घोषणा दिली नाही, म्हणून जमावाने त्यांना मारहाण केली. वसतरावदादांनी बाईंना महाराष्ट्राच्या दौऱ्याचे आमंत्रणही दिले आहे

या गोष्टी उत्स्फूर्तपणे आणि बाईंवरच्या खऱ्या निष्ठेने होत असतील तर एवढेच म्हणावे लागेल :–

**लेकिन ऐसे देशमें पैदा किया तुमने**
**जिस देशमे बंदे हैं गुलामी पे रजामंद.**
(इक्बाल)

–अशा देशात देवा, तू आम्हाला जन्माला घातलेस की जेथील लोक गुलामीतच आनंदी राहू शकतात.

पण मला विश्वास आहे की बाईंचे राजकारणातील पुनरागमन परिणामशून्यच ठरेल! □


**पूर्णिया**
**अनिल अवचट**
**किमत : सहा रुपये**
**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**



# करिष्मा

**त्यांचे पुनरागमन पुढेमागे देशाला पुन्हा एकदा उद्रेकाच्या भोवऱ्यात नेऊन सोडील !**


# करिष्मा


**चंद्रशेखर**

वीस मार्च एकोणिसशे सत्याहत्तरची रात्र. पहाटे तीन वाजेपर्यंत, तासातासाने प्रसारित होणाऱ्या बातम्या ऐकल्या. जनतापक्षाचे यश निश्चित होत चालले आहे या जाणिवेत, मनावर अस्वस्थ झोपेचा अंमल बसला. मधली दोन वार्तापत्रे हुकली. ट्रान्झिस्टर चालूच असावा. सहाच्या वार्तापत्रात इतर निकालांच्यामध्ये, झटकन सांगून टाकलेले एक वाक्य कानी पडले.

'प्रधानमंत्री रायबरेलीसे चुनाव हार गयी है'

धडपडून उठलो. कानांवर विश्वास बसेना. छातीत एकदम कसला तरी कोंडलेपणा दाटून आला. आदल्याच दिवशी, काही अपघातात पायाला लागल्याने, चालता येत नव्हते तरी, झपाट्याने घराबाहेर पडलो. लंगडत लंगडत जिना उतरीत आसपासच्या एकदोघा शेजाऱ्यांना विचारलं. त्यांनी दातांवर ब्रश घाशीत विजयी सुरात सांगितले, 'आम्ही रात्री दीड–दोनलाच ऐकलें !' उत्तेजित स्वरात काही आणखी बोलणे झाले. परत घरात येऊन, तोपर्यंत आलेले वर्तमानपत्र डोळ्यांसमोर धरले. अक्षरांचा बोध होत नव्हता. डोळे यांत्रिकपणे मजकुरावरून फिरत होते. अखेरीस वाचण्याचा नाद सोडून दिला.

नंतर एकदोन दिवस काही सुचत नव्हते. हे कसे झाले ? खरेच हे घडले काय ? नकळत विजेचा जोरदार झटका बसावा, अंगात थरथर आणि बधिरपणा यांचा एकदम उद्भव व्हावा तसे झाले होते. वाईट वाटले नाही, खूप आनंद झाला नाही. खरे म्हणजे भावनात्मक पातळीवरची अशी कोणतीही प्रतिक्रिया निर्माणच झाली नाही. केवळ एक जबर धक्का–फिजिकल ब्लोच्याजवळपास असणारा !

मग हळूहळू नित्याच्या कामात, क्रमाने गुंतून गेलो. स्वतःची व्यक्तिगत व्यवधाने पुन्हा जाणिवेचा कबजा घेऊ लागली.

कधीकधी बातम्या येत—इंदिरा गांधींनी १, सफदरजंग सोडले, त्या हरिद्वारला गेल्या, काँग्रेसपक्षाच्या बैठकीला गेल्या, नातवाच्या शाळेत कार्यक्रमाला गेल्या, कोठल्याशा वकिलातीत स्वागतसमारंभाला गेल्या इत्यादी. मध्यंतरी चौधरी चरणसिंगांच्या एका वादग्रस्त विधानाबद्दल श्रीमती गांधींनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. मग त्या पवनारला गेल्या, बेलची येथील हरिजनाची विचारपूस करण्यासाठी गेल्या. कोठल्या तरी काँग्रेसी प्रीतिभोजनात गेल्या.

या बातम्यांत काही मन गुतावे असे नव्हते आसमंत व्यापून राहणाऱ्या सूर्यप्रकाशासारखी ज्याची तेजस्विता, त्यांच्याबाबतीत या वार्ता व घडामोडी म्हणजे काजव्याच्या लुकलुकीइतक्याही नाहीत, असे वाटे.

इंदिरा गांधी संपल्या हेच खरे असे वाटत होते ! काळाचा महिमा वगैरे विचार अशा बातम्या वाचून मनात येत—पण ते तेवढेच. त्याहून जास्त तीव्र भावना जाणवल्याच नाहीत.

□

असे चालले होते. एकवीस ऑगस्टला सकाळी नित्यकर्म करीत होतो. त्यात एक भर पडली होती म्हणजे तळमजल्यावरून पाणी आणण्याची. चोवीस तास पाणी वगैरे बिरुदे मिरवणाऱ्या जागेत रहात असून देखील पंप मोडल्यामुळे पाण्याच्या बादल्या वाहाव्या लागत होत्या या उद्वेगात, जरा दम खाण्यासाठी खुर्चीवर बसलो होतो. जिन्याच्या चौकटीतून पत्नीने कोणाचे तरी 'या या' म्हणून हसत स्वागत केले. .

म्हटले कोण ?

संपादक माजगावकर आले होते. आश्चर्य आनंद, विचारपूस वगैरे संपल्यावर ते म्हणाले,' तुमच्यासाठी एक कामगिरी आणली आहे.'

'बोला !'

'इंदिरा गांधीबद्दल एक पीस लिहा ! '

'इंदिरा गांधी ?' मी कोबट स्वरात विचारले. 'त्यांचे काय उरले आहे आता ? '

माजगावकर चकित मुद्रेने पहातच राहिले हाच का तो इसम की ज्याने १९६९ सालच्या जुलैत, नव्या इंदिरायुगाचे हार्दिक स्वागत केले होते ? सर्व महाराष्ट्रात त्या वेळी इंदिरा गांधीविरोधी हवा असताना ज्याने त्यांचा हिरीरीने पाठपुरावा केला होता ? त्यानंतरची सात आठ वर्षे इंदिरा गांधीच्या प्रत्येक हालचालीचा अनुकूल अन्वय लावण्याची पराकाष्ठा केली होती ? —त्याहूनही व्यक्तिगत पातळीवर स्वतःच्या एका समारंभात, स्टेजवर, इंदिरा गांधी यांचा फोटो भाविकतेने लावला होता ? हाच का तो की ज्याच्या विचाराचे, लेखनाचे प्रमुख व्यवधान इंदिरा गांधी हे होते ?

माजगावकर हे सगळे त्या वेळी बोलले नाहीत. नंतर चारपाच दिवसाच्या प्रदीर्घ चर्चेत बोलले. मग त्यांच्याशी हे सारे बोलल्यावर, मला व्यक्तिगत पातळीवर प्रथमच जाणवले की इंदिरा गांधीच्या अस्ताबद्दलची माझी प्रतिक्रिया माझ्या आजवरच्या भूमिकेशी विसंगत होती.

लेखासंबंधी जरूर त्या सूचना देऊन माजगावकर निघून गेले.

मी एकटा राहिलो सारखे वाटू लागले की, माझी इतकी भावनाशून्य प्रतिक्रिया होण्याचे कारण काय ? इंदिरा गांधींच्या दर्शनाने मी रोमांचित होत होतो त्यांचे एकदा व्यक्तिगत पत्र माझ्या नावे आले तेव्हा आनंदाने, अभिमानाने बेभान झालो होतो. त्यांनी जेव्हा, जेव्हा काही धाडसी, बेधडक पावले टाकली तेव्हा मी विजयाच्या टाळ्या पिटल्या—त्यांच्या राजकारणाचे सातत्याने समर्थन केले.

मग त्यांच्या पतनाने मला काही का वाटू नये ?

## शोध

कळू लागल्याच्या वयापासून मला कोणत्याही राजकारणी नेत्याबद्दल खास असे आकर्षण वाटले नाही. नेहरूंबद्दल आदर वाटे; पण. त्यांच्या समन्वयी कारभाराबद्दल काहीसा अनादरच होता ज्या नेत्याच्या निर्णयात, कारभारात, भवितव्यात मी मनाने गुंतलो होतो, मला काही व्यक्तिगत स्टेक वाटत होता, ज्या नेत्याशी व्यक्तिगत नाते जुळल्यासारखे वाटत होते त्या म्हणजे इंदिरा गांधी होत. १९७१ च्या इंदिरा—लाटेच्या वेळी, निवडणूक-निकालाच्या दिवशी मी रात्रभर सोबत्याबरोबर जल्लोश करीत फिरत होतो. मित्राशी, नातेवाइकाशी, संपादकाशी इंदिरा गांधींच्या समर्थनासाठी आवेशाने वाद घालीत होतो.

मला वाटते—प्रथम मी एकटाच होतो. तरी नंतर—विशेषतः १९७१ नंतर—अशा लोकांची संख्या अफाट होती. सतत वाढत होती. बोलकी होती.

मग मला व या असंख्यांना एखादे मोठे झाड पडल्यावर जे वाटेल तितकेच, इंदिरा—पतनाबद्दल का वाटले ? वाटावे ?

या थंड प्रतिक्रियेत खुद्द इंदिरा गांधी याचा वाटा किती ?

परिस्थितीचा वाटा किती ?

आमचा वाटा किती ?

या प्रश्नाची उत्तरे शोधण्याची प्रक्रिया फार क्लेशकारक आहे, चकित करणारी आहे. मनाला तळापासून गदगदा हलविणारी आहे पण आवश्यक आहे !

एका अंतर्धान पावलेल्या करिष्म्याचा हा शोध अर्थातच केवळ तर्काला, बुद्धीला कौल लावून पार पडणार नाही. करिष्मा (Charisma) हा तर्कसंगत नसतोच. त्याचे विवेचन करता येत नाही—समर्थन करता येत नाही.

करिष्मा केवळ असतो किंवा नसतो !

हा जो असण्या—नसण्यातला फरक त्याचा चेहरामोहरा काही स्पष्ट करता येईल का ? इंदिरा गांधींचा करिष्मा आपल्या डोळ्यादेखत निर्माण झाला व आपल्यासमोरच नष्ट झाला. हा सारा केवळ आठ वर्षांचा खेळ—१९६९ ते १९७७ इतक्या थोड्या काळात एखाद्या झगझगीत बाणासारखे अस्मानात सरसरत गेलेले आणि नंतर विझलेल्या राखेसारखे जमिनीवर येऊन पडलेले हे राजकीय नेतृत्व आहे या उदयाला आणि अस्ताला जगाच्या इतिहासात क्वचित तोड मिळेल.

इंदिरा गांधींच्या उदयाबद्दल व त्याच्या प्रक्रियेत जेवढा गदारोळ झाला तेवढा त्याच्या अस्ताबद्दल झाला नाही. माझी प्रतिक्रिया धक्कादायक वाटली तरी ती एका अर्थाने प्रातिनिधिक आहे. या

अस्ताबद्दल बोटावर मोजण्याइतक्या लोकांनीही दोन अश्रू ढाळले नाहीत इंदिरा गांधी वेट टोटली अनसग ! इतकी विषादपूर्ण राजकीय अखेर व्हावी असे त्यांचे राजकीय चारित्र्य होते काय? त्यांच्या यशाबद्दल, कामगिऱ्यांबद्दल आजही कुणाचे दुमत नाही. बांगला देश, परराष्ट्रीय धोरण, आर्थिक उपाययोजना या त्यांच्या यशस्वी धोरणाबाबत अजून विवादाचा सूर नाही.

मग त्यांना इतके अवमानित, इतके दुराव्याने इतिहासाच्या ढिगाऱ्यात का जावे लागले ?

एका युरोपीय देशातील राष्ट्रप्रमुख दुसऱ्यांदा अध्यक्षपद लढवीत होता. त्याने केवळ दोन ओळींची विनंती केली–

'बहात्तर वर्षांचा, पण सर्व दृष्टींनी कार्यक्षम असा सज्जन म्हातारा पुन्हा अध्यक्षपदावर काम करू इच्छितो. परवानगी मिळावी.'

त्याला परवानगी मिळाली.

पण इंदिरा गांधींनी याहून किती तरी प्रभावी मार्गांनी, किती तरी जोरदार शब्दांत 'पुन्हा काम करण्याची' परवानगी मागितली होती. (किंवा खरे म्हणजे त्यांनी जनतेला असेच केवळ सांगण्याची 'परवानगी' दिली होती.) परंतु भारतीय जनतेने त्यांना कामावरून काढून टाकले–एखाद्या मोलकरणीला 'उद्यापासून येऊ नकोस !' असे जसे सांगावे त्याप्रमाणे.

हे शब्द वाईट वाटतात; पण त्यातून व्यक्त होणारा अर्थ खरा आहे.

हे कसे झाले ? केवढा अट्टाहास मांडला होता–केवढा निर्घृण सत्तायज्ञ इंदिरा गांधींनी आरंभला होता ! विरोधकांची, स्वतःच्या पक्षाची, वृत्तपत्रांची, न्यायालयांची, सर्वांची आहुती या नव्या यज्ञात पडली. देशाची सारी यंत्रणा–सरकारी व बिनसरकारी–त्यांनी सत्तेवर राहावे म्हणून रात्रंदिवस राबली.

अखेर त्या साऱ्या खटाटोपातून निघाले काय ?

'घरी बसा !' हे दोन शब्द !

प्रयत्न आणि परिणाम यांचे काही गणित–काही हिशेब ?

याच इंदिरा गांधी, १९६९ साली, पक्षसंघटना विरुद्ध असताना, विरोधक हल्ले करीत असताना, सरकारवर पकडही नसताना एकाकी, आपले स्थान टिकवू शकल्या, कधी नव्हे एवढे बळकट करू शकल्या.

तेव्हा त्यांच्याजवळ काय होते की जे या वेळी कमी पडले ?

### जबर किंमत

कारण या उत्तरात इंदिरा गांधी या व्यक्तीचे सारे चरित्र आणि चारित्र्य सामावले आहे. मनाची जडणघडण विचारपद्धतीत गुंतलेली आहे. या संदर्भात पहिली गोष्ट जाणवते ती ही की वयाच्या ४२ व्या वर्षापर्यंत इंदिरा गांधी देशातील सर्वोच्च राजकीय सत्तेच्या अतिनिकट होत्या, सत्तेचे सर्व विभ्रम व सोपस्कार त्यांना परिचित होते; पण अशी सत्ता खुद्द स्वतःस मिळेल अशी त्यांना सुतराम कल्पना नव्हती. नेहरूंची कन्या म्हणूनच त्यांचे दुय्यम अस्तित्व होते. स्वतंत्र असे राजकीय स्थान काही नव्हते. ४२ व्या वर्षी (१९५५) त्यांना नेहरूंनी काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य केले १९५९ साली काँग्रेसचे अध्यक्ष केले. या दुय्यम, केवळ प्रतिबिंबात्मक अशा अवस्थेत टिकून रहावे, सत्तेच्या सावलीत रहाता यावे म्हणून इंदिरा गांधींनी फार मोठी किंमत मोजली. आपले पती फिरोज गांधी यांच्यापासून विभक्त होणे ही ती किंमत ! कोणतीही भारतीय स्त्री कोणत्याही आकर्षणासाठी आपल्या पतीपासून अशा प्रकारे विभक्त होणार नाही !

केवळ दुय्यम–तिय्यम स्थानासाठी ज्या स्त्रीने एवढी जबर किंमत दिली तिला प्रत्यक्ष सत्ता हाती आल्यावर, ती गमावणे किती कठीण वाटत असेल ?

नेहरूंच्या कारकीर्दीत इंदिरा गांधी प्रथमपासून दुर्लक्षितच होत्या. त्यांचे शिक्षण पुरे झालेच नाही. कुटुंबातील इतर मंडळी इंदिरा गांधींपासून फटकून वागत. आपल्याला स्वतंत्र असे महत्त्व काही नाही ही बाब त्यांना सतत बोचत असे. यातूनच एक चमत्कारिक न्यूनगंड निर्माण झाला. त्या न्यूनगंडाने सर्वस्वी निराळेच वळण घेतले. अत्यंत महत्त्वाच्या कुटुंबाच्या सदस्य असल्याने इंदिरा गांधींच्या न्यूनगंडाने असे स्वरूप धारण केले, की ज्या गोष्टी त्यांच्याजवळ नव्हत्या त्या स्वतःजवळ आहेतच असे त्या मानू लागल्या व ज्या त्यांच्याजवळ आहेत त्या नाहीतच असेही मानू लागल्या. वस्तुस्थितीचे निवडक आकलन (सिलेक्टिव्ह काँप्रिहेन्शन) असे नाव त्यास देता येईल. (शास्त्रीय नांव–कॉग्निटिव्ह डीसोनन्स) अजून देखील त्यांचा हा आभास वारंवार दिसून येतो. पवनार येथे त्यांना वार्ताहराने विचारले, 'तुम्ही परत राजकारणात येणार काय ?'

त्यावर त्यांनी उत्तर दिले 'मी राजकारण कधी सोडलेच नव्हते !' हे अगदी ताजे उदाहरण आहे. मार्च ७७ पासून ऑगस्ट ७७ पर्यंतच्या काळात त्यांनी ही प्रवृत्ती वारंवार प्रकट केली जे सर्वांना दिसते तेसुद्धा जोरदारपणे नाकारायचे हे त्यांनी अनेक वार केले आहे. १९६९–७१ या काळात त्यांनी कम्युनिस्टांचा पाठिंबा घेतला होता; पण त्या नेहमी म्हणत की, आम्ही कोणाचा पाठिंबा मागितलेला नाही.

वस्तुस्थिती नाकारीत रहायचे हा त्यांचा स्वभावच बनला. सत्तेशी पूर्ण परिचय; पण ती स्वतःला न मिळण्याची खात्री अशा मनस्थितीत त्यांनी आयुष्याचा बराच काळ काढला. या जाणिवेचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला आहे. त्या रूढ अर्थाने राजकारणी नेत्या नाहीत. कोणत्याही राजकीय तत्त्वज्ञानावर त्यांची श्रद्धा नाही, कोणत्याही सामाजिक क्षेत्रात त्यांनी संघटनात्मक कार्य केलेले नाही, लोकसंग्रह केलेला नाही. राजकारणाचा खडतर प्रवास त्यांनी केलाच नाही. इतर राजकीय नेते जे सर्व सोपस्कार करीत करीत नेतृत्व प्रस्थापित करतात ते इंदिरा गांधी यांनी केलेले नाही.

त्यामुळे सत्तेबद्दलची आकांक्षा पण ती मिळण्याची असंभाव्यता या त्यांच्या मनात घट्टपणे ठाण मांडून बसलेल्या बाबी होत.

अशा तऱ्हेच्या काहीशा निष्फळ अशा (फ्रस्ट्रेटेड) मनःस्थितीत सदैव राहणाऱ्या स्त्रीला १९६६ च्या जानेवारीत काँग्रेसच्या

## तेव्हा त्यांच्याजवळ काय होते की जे या वेळी कमी पडले ?

तत्कालीन नेतृत्वाने पंतप्रधानपदी बसविले. येथून पुढच्या सर्व झंझावाताची बीजे परिस्थितीत रोवली गेली.

जे कधी घडणार नाही असे इंदिरा गांधींना वाटत होते ते घडले ज्या महत्त्वाकांक्षेसाठी जगभरचे राजकारणी जन्मभर राजकारण खेळतात ती महत्त्वाकांक्षा इंदिरा गांधींच्या बाबतीत काही न करता पूर्ण झाली.

१९६६ ते १९६९ या कालखंडात त्यांची कारकीर्द दिशाहीन कळाहीन अशी राहिली. आर्थिक क्षेत्राबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ असल्याने श्रीमती गांधींनी रुपयाच्या अवमूलनाचा चमत्कारिक निर्णय घेतला. त्यांची या काळात पक्षावर पकड नव्हती की सरकारवर १९६७ मध्ये जनतेने काँग्रेसचा मोठा पराभव करून त्यांच्या निष्प्रभ व भोंगळ कारभाराविषयी असंतोष व्यक्त केला; पण पक्षामध्ये त्यांना जोराचा असा विरोध झाला नाही. पक्षाचे धुरीण त्या नेहरूकन्या आहेत, या गोष्टीचा जेवढा उपयोग करून घेता येईल तेवढा घेत होते.

आपल्या हातात अद्याप खरी सत्ता नाही, आपला उपयोग करून घेण्यात येत आहे, त्याचबरोबर आपल्याला अवमानित करण्यात येत आहे याची व्यथा या काळात इंदिरा गांधींना होती.

पण त्यांना आणखीही काही गोष्टी कळत होत्या. श्रेष्ठ अशा काँग्रेसपक्षात विशेष दम नसून बहुतेक नेते व कार्यकर्ते सत्ता-प्रतिष्ठा-संपत्ती याच्या बाहेर काही पाहण्यास तयार नाहीत, पक्ष ताब्यात घेणे विशेष कठीण नाही, सत्तेवर राहण्यास तत्त्वनिष्ठा, समाज-हिताची कळकळ वगैरेंची विशेष गरज नाही, भारतीय जनता सहज फसवली जाऊ शकते अशा खूप गोष्टी त्यांना नव्याने जाणवल्या.

येथपर्यंत त्यांची प्रतिक्रिया थंड पण किंचित दुखावलेली अशी होती. त्यांची पावले कोणत्या दिशेला पडतील याची अनिवार्य अशी काही दिशा ठरली नव्हती. १९६७ च्या हादऱ्याने ही दिशा हळूहळू स्पष्ट होत गेली. पक्षश्रेष्ठी जैसे थे वादी होते. काँग्रेसच्या अपयशाचे खापर सरकारच्या माथी फोडून ते गप्प बसत व आपल्या राज-कारणी कारवायात मश्गुल राहात. पक्षाच्या व्यासपीठावर सर्व नव्या उपाययोजनांना शाब्दिक प्रतिष्ठा मिळे; पण प्रत्यक्षात काही होत नसे

या साऱ्याची जुन्या काँग्रेसनेत्यांना सवय होती. फार झाले तर सारे अपश्रेय इंदिरा गांधींच्या डोक्यांवर मारून त्यांनी नवा नेता निवडला असता व आपले पूर्वीचेच राजकारण चालू ठेवले असते.

जुने नेते, इंदिरा गांधींच्या कारभारावर सारखी टीका करीत. विशेष काहीच केले नसताना या स्त्रीने पंतप्रधानपद अडवावे याचा त्यांना राग येई.

## असह्य कोंडमारा

१९६८ सालात ही सगळी दुटप्पी परिस्थिती इंदिरा गांधींना असह्य झाली असावी. वयाची ५० वर्षे त्यांनी प्रथम नेहरूंच्या व नंतर पक्षनेत्यांच्या हो ला हो करण्यात घालविली होती त्या भूमि-केची चीड त्यांच्या मस्तकात दाटली होती. एवढ्या मोठ्या पदावर राहूनही मागचाच कोंडमारा सहन करायचा? किती दिवस? कशासाठी?

त्यांनी हा सारा जाच झुगारून देण्याचे ठरविले. पक्षाचे वरिष्ठ-नेते जैसे थे वादी असल्याने, त्यांच्याविरुद्ध उभे राहायचे तर परि-वर्तनवादी; डावी भूमिका घेणे क्रमप्राप्त होते पक्षाचा एक मोठा भाग ही गरज वारंवार बोलून दाखवीत होता १९६७ च्या पराभवा-वर मात करायची तर डावी लाइन स्वीकारणे आवश्यक होते.

अशा प्रकारे इंदिरा गांधींची व्यक्तिगत मानसिक गरज व बाह्य वस्तुस्थिती यांचा ताळमेळ जमला

सबंध १९६९ साल त्यांनी पक्षाच्या जुन्या नेतृत्वास आव्हान देऊन पक्षावर प्रभुत्व मिळविण्यात खर्च केले.

राष्ट्रपतिनिवडणूक, बँकराष्ट्रीयीकरण या सोप्या घडामोडीत झपाट्याने पावले टाकताना काही प्रमाणात तरी इंदिरा गांधींनी आपले पंतप्रधानपद पणाला लावले होते यात शंका नाही.

या धाडसी जुगारामुळेच त्या पक्षांतर्गत लढ्यात यशस्वी झाल्या यातही शंका नाही

पंतप्रधानपद इंदिरा गांधींकडे चालून आले होते, त्यांनी त्याच्या-साठी विशेष खटपट केली नव्हती म्हणूनच त्या हे पद पणाला लावू शकल्या. मानसिकदृष्ट्या त्यांना ते सोपे गेले. याचे परिणाम फार त्वरित व विस्तृत झाले. आजवरच्या काँग्रेसी राजकारणाला कंटा-ळलेला असा पक्षात जो वर्ग होता तो एकदम प्रभावित झाला. काही तरी कृतीचे, परिणामाचे राजकारण सुरू झाले याचे त्याने स्वागत केले

संपूर्ण डावी चळवळ इंदिरा गांधींच्या मागे उभी राहिली.

काँग्रेसचे बोलघेवडे, सत्ताबाज, भ्रष्ट राजकारण उद्वेगाने पहात असणारा सामान्य माणूस कमालीचा प्रभावित झाला. सत्तेसाठी चालणारी धडपड पाहण्यात ज्यांचा जन्म गेला त्या माणसांना सत्ता सोडण्याची तयारी करून केलेले हे राजकारण नवे वाटले, स्फूर्ति-दायक वाटले.

या टप्प्यावर इंदिरा गांधी, त्यांच्या स्वतंत्र बळावर राष्ट्रनेत्या बनल्या. कोठलीही गोष्ट झुगारून देणे वाटते तेवढे अवघड नाही, उलट तसे केल्यास फायदाच होतो हे त्यांना स्पष्टपणे कळून चुकले. मागील ५० वर्षांची कुचंबणा, कोंडमारा, अनिश्चय या साऱ्या गोष्टी धुऊन गेल्या. इंदिराकरिष्मा अवतीर्ण झाला.

इंदिरा गांधी मुक्त झाल्या. त्यांच्या राजकारणाने जनतेलाही फार दिवसांनी मुक्तीचा आनंद लाभला. एक जुनाट डबके फोडले गेले व राजकारणाचा प्रवाह नव्या आवेशाने पुढे धावू लागला.

साधारण असे होते की माणसाला पहिले जे मोठे यश मिळते, त्या वेळी केलेल्या उपाययोजनांचा, वर्तनाचा माणसावर फार मोठा परिणाम होतो. त्या मार्गांवर विश्वास बसतो. तो एक साचा ठरून जातो.

इंदिरा गांधी याला अपवाद ठरल्या नाहीत. १९७१ सालच्या बांगला देशपर्वास देखील त्यांनी नव्याने सापडलेले मार्गच चोखाळले.

बड्या राष्ट्रांचे दडपण झुगारून दिले, बांगला देशाला सर्व ती मदत केली. अखेरीस प्रत्यक्ष युद्ध करून बांगला देश मुक्त केला. कोणतेही वादविवाद केले नाहीत, आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या गोंधळात सापडल्या नाहीत रशियाशी एक मैत्रीकरार झपाट्याने करून टाकून हे प्रकरण लष्करीदृष्ट्या अंगाशी येणार नाही एवढी तरतूद केल्यावर इंदिरा गांधी यांनी कसलाही कचखाऊ विचार



**डेव्हिड फ्रॉस्टला मुलाखत देताना आजही त्या म्हणतात की,**
**' त्या वेळी आणीबाणीशिवाय आमच्यासमोर पर्याय नव्हता.'**

केला नाही. नेहरू जर त्या वेळी पंतप्रधान असते तर त्यांनी इतक्या व्यावहारिकपणे हे प्रकरण हाताळले असते की नाही याची शंकाच आहे.

' बांगला देश ' विजयाने इंदिरा गांधी यांच्याजवळ नेहरूंपेक्षा जास्त काही राजकीय हुषारी आहे असा सर्वांचा रास्त समज झाला.

कृतनिश्चयी, कृतिशूर आणि व्यावहारिक बाण्याचे हे नेतृत्व उदयास आल्यावर भारतीय जनतेला सनाथ झाल्यासारखे वाटले.

जवळजवळ २५ वर्षे भारतीय राजकारण अनिश्चय, चालढकल, मुर्दाडपणा, पोचटपणा यांच्या गोंधळात सापडले होते. १९६९ ते १९७१ अखेर या काळातील इंदिरा गांधींच्या कर्तृत्वाने देशाला प्रथमच असा विश्वास वाटला की आपले सरकार कोणत्याही पेच-प्रसंगास तोंड देण्याइतके हुषार, कणखर आणि कार्यक्षम आहे.

त्यानंतर मार्च १९७२ मध्ये राज्यातदेखील सर्वत्र कॉंग्रेसचे राज्य आले. मार्च १९७१ मध्ये लोकसभेत अभूतपूर्व असे बहुमत कॉंग्रेसला मिळाले होतेच. या दोन्ही वेळच्या विजयात इंदिरा गांधी यांचा वाटा फार मोठा होता.

१९६९, १९७१, १९७२ हे अंतर्गत राजकीय विजय व डिसेंबर १९७१ मधील बांगलादेश विजय असे चार वेळा विलक्षण यश इंदिरा गांधींना लाभले. संपूर्ण आयुष्यात कोणत्याही यशावर स्वतंत्रपणे अधिकार सांगू न शकणाऱ्या इंदिरा गांधींनी केवळ साडेतीन वर्षांच्या काळात खणखणीत यश मिळविले.

आर्थिक आघाडीवरील प्रश्न या काळातदेखील कायमच होते. त्यांची तीव्रता वाढलीच होती. त्या प्रश्नांच्याबाबतीत इंदिरा गांधींना दुर्दैवाने काही करता येत नव्हते. कारण ते प्रश्न सोडविण्यासाठी व्यक्तिगत निर्णय, डावपेच, शहप्रतिशह यापेक्षा अधिक काही तरी आवश्यक होते. ते इंदिरा गांधींजवळ नव्हते.

## बिनधास्त यश

पण मिळालेले यशही काही कमी नव्हते. देशाचे प्रश्न सोडविण्याचे, सर्वोच्च सत्तेवर राहण्याचे सर्वाधिकार देशाने त्यांच्याकडे दिलेले होते. यासाठी कोणतीही मुदत नव्हती. पक्षाबाहेरील विरोधक विभक्त, दुर्बळ, एकांतिक होते. कोणाचीही धास्ती बाळगण्याचे कारण नव्हते. ध्रुवाप्रमाणे अढळपद प्राप्त करून घेण्यात इंदिरा गांधींना दोन शस्त्रांचा उपयोग झाला.

एक म्हणजे जे आपल्या आड येईल त्याच्याविरुद्ध एकदम डिफायन्सची भूमिका घ्यायची.

दुसरे म्हणजे अमूर्त, निराकार अशा लोकांच्या इच्छेला कौल लावायचा.

त्यांनी पक्षाला झुगारले, विरोधकांना झुगारले, जागतिक 'दडपणाला झुगारले. परिणाम अपेक्षित झाला.

कोणत्याही पातळीवर मतभेदाचा प्रसंग आला की त्यांनी एकदम लोकांकडे कौल मागितला. कोणतीही संघटना, व्यासपीठ, रचना, घटना यांचे बंधन त्यांनी कधीही मानले नाही–सहन केले नाही.

त्यामुळे त्यांनी सत्तेवर राहणे हे लोकांना नदीनाले, दऱ्याखोरी याप्रमाणेच निसर्गनिर्मित वाटू लागले.

त्यांच्या उदयाच्या पर्वात दिल्लीमध्ये उत्साही इंदिराभक्त एक घोषणा म्हणत,

' जबतक बहे जमनाका पानी.
तबतक रहे इंदिरा रानी. '

ही घोषणा खरी झाली असे वाटू लागले. लोकांना वाटू लागले–त्यांच्या अनुयायांना वाटू लागले–फार काय इंदिरा गांधींनाही वाटू लागले. त्या सहजपणे सत्तेवर आल्या होत्या. सहजपणे यशस्वी झाल्या होत्या. होणार होत्या.

जमना बिचारी वाहातच होती.

☐

अलाहाबाद हायकोर्टाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरविली तेव्हा त्या परत आपल्या जुन्या दोन शस्त्रांवर विसंबल्या. डिफायन्स आणि पॉप्युलिझम. कोर्टाच्या निर्णयाला धुडकावून लावणे आणि सर्व पक्षांकडून, सामान्य लोकांकडून आपल्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून घेणे.

या दोन मात्रा लागू पडत नाहीत हे पाहिल्यावर त्यांच्याजवळ तिसरे शस्त्र उपलब्ध नव्हते. सुप्रीम कोर्टाचे व्हेकेशनजज्ज जस्टिस कृष्ण अय्यर यांनीदेखील अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय लागू मानून त्यांचे संसदसदस्यत्व रद्द ठरविले; पण त्या पंतप्रधान राहू शकतात असे स्पष्ट केले. हायकोर्टाच्या निर्णयाचा संपूर्ण फेरविचार सुप्रीम कोर्टाचे डिव्हिजन बेंच उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर जुलै ७५ मध्ये करणार होते. तोपर्यंत पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन दूर होण्याखेरीज इंदिरा गांधींना पर्यायच नव्हता.

जून १९६९ मध्ये पक्षातर्गत वर्चस्वासाठी स्वत चे पंतप्रधानपद इरेला घालणाऱ्या इंदिरा गाधी, जून १९७५ मध्ये आपले पतप्रधान-पद एखाद्या अडाणी म्हाताऱ्या बाईने बोचके घट्ट पकडून धरावे तशा घट्ट धरून बसल्या.

सहा वर्षांत एवढा फरक पडला. कोठे गेले त्याचे धाडस? कोठे गेली त्यांची सुप्रसिद्ध राजकीय कुशलता? त्याच्या झंझावाती निर्णय-शक्तीने याच वेळी का कच खाल्ली?

हायकोर्टाचा निकाल ही कायदेशीर बाब असली तरी त्यामुळे निर्माण झालेला पेचप्रसग मूलतः राजकीय होता. त्यावर राजकीय तोडगा काढणे जरूर होते. विरोधी पक्ष त्याच्या राजिनाम्याची मागणी करीत होते—काँग्रेसपक्ष अस्वस्थ झाला होता. हायकोर्टाचा निकाल एवढा डॅमेजिंग आहे असे मनोमन कोणीच मानीत नव्हते. एका राजकीय वादळाची निर्मिती त्या निकालाने झाली होती एवढेच, पण या वादळास पूर्वीच्या धडाडीने इंदिरा गाधी तोंड देऊ शकल्या नाहीत.

पक्षातील कोणाकडेही त्या तात्पुरते पंतप्रधानपद सोपवू शकत नव्हत्या, यावरून त्यांचे एकमुखी राजकीय नेतृत्व आतून पोखरले होते. संधी मिळताच पक्षात त्यांच्याविरुद्ध उभी राहणारी माणसे वाढली होती असा निष्कर्ष निघू शकतो. त्यामुळे पर्यायी व्यवस्था करून कायदेशीर बाबींना कायदेशीरपणे त्या तोंड देऊ शकल्या नाहीत.

विरोधी पक्षांना हाताळू शकल्या नाहीत. त्यांची राजिनाम्याची मागणी ही राजकीय खेळी आहे हे जाणूनदेखील इंदिरा गाधी विरोधी पक्षास चुचकारू शकल्या नाहीत, त्यांच्यात फूट पाडू शकल्या नाहीत, थोडे कालहरणही करू शकल्या नाहीत. राजकीय डावपेचाच्या दृष्टीने त्या अगदी दिवाळखोर ठरल्या!

या पेचप्रसगात लोकाचा पाठिंबा हे सूत्र प्रभावी ठरू शकत नव्हते. कारण वरवर तरी सामना न्यायसंस्थेशी होता. पक्षाच्या कार्यकारिणीला धाब्यावर बसविणे निराळे आणि हायकोर्टाचा निर्णय गुडाळून ठेवणे निराळे.

खेळ हरत आलेला खेळाडू एकदम चिडून, वैतागाने खेळ उधळून देतो तशी प्रतिक्रिया अखेरीस इंदिरा गाधींची झाली.

सगळे झुगारून देण्याची एकमात्र प्रवृत्ती प्रबळ ठरली. मात्र घटनेचा आधार घेऊन या डिफायन्सवर डिसिप्लिनचा मुलामा चढविला गेला. अंतर्गत आणीबाणी पुकारण्यात आली. त्या क्षणा-पासून इंदिरा गांधी या राजकारणी नेत्या राहिल्या नाहीत, तर कर्कश, कठोर, कांगावखोर अशा हुकूमशहा बनल्या!

डिफायन्सवर पोसलेली राजसत्ता डिसिप्लिनच्या नावावर चालू राहिली.

□

## प्रोजेक्शन : मानसिक प्रक्रिया

इंदिरा गाधींच्या कारकीर्दीचा विचार करताना या विशिष्ट टप्प्यावर खूप अडखळायला होते. जर एक राजकारणी पवित्रा म्हणून आणीबाणीचे कारण 'देशाला अराजकापासून वाचविणे' हे त्यांनी दिले असते तर ते समजण्यासारखे आहे; पण त्या वेळची त्यांची भाषणे, सरकारी प्रचारसाहित्य यावरून असे वाटते की, आणीबाणी पुकारून आपण देशाला वाचवीत आहोत असे इंदिरा गाधी मानीत होत्या.

जुलै १९७७ मध्ये त्यानी डेव्हिड फ्रॉस्ट या पत्रकाराला मुलाखत देतानाही हीच भूमिका घेतली

फ्रॉस्ट विचारतात, 'जर तुम्हाला परत त्या काळात जाता येईल असे मानले, तर तुम्ही परत पूर्वीच्याच क्षणी आणीबाणी लागू कराल काय?'

श्रीमती इंदिरा गांधी उत्तर देतात, 'मला वाटते, त्या क्षणी आमच्यापुढे पर्यायच नव्हता!'

म्हणजे जून ७५ ते जुलै ७७ या दोन वर्षांच्या काळात 'आपण देशाला अराजकापासून वाचविले' या इंदिरा गाधींच्या समजुतीत काहीही फरक पडलेला नाही. दरम्यानच्या काळात काँग्रेसचा पराभव झालेला आहे, आणीबाणीची काळी बाजू बरीचशी स्पष्ट झालेली आहे, इंदिरा गाधी सत्तेवरून दूर झाल्या तरी देशात अराजक आलेले नाही हेही स्पष्ट झालेले आहे. तरी इंदिरा गाधी या मूळ भूमिकेतून बाहेर पडण्यास तयार नाहीत.

यावरून जून ७५ मध्ये त्यांची ही भूमिका किती प्रखर, किती ठाम असेल याची कल्पना करता येते.

'आपणच पंतप्रधानपदावर राहिले पाहिजे' हे गृहीतकृत्य धरून इंदिरा गांधींनी विचार केला म्हणून त्याचे उत्तर 'आणीबाणीशिवाय पर्याय नाही' हे आले.

वरील गृहीतकृत्य हे त्यांच्या मनात इटर्नलाईझ झाले होते. आपण सत्ता सोडली तर देशाचे वाटोळे होईल या शकेने त्या ग्रासल्या होत्या.

पण १९६९ साली त्यांची मन:स्थिती व देशातील परिस्थिती याची जशी सागड जुळली तशी या वेळी जुळली नाही.

इंदिरा गाधींसमोर किती तरी पर्याय होते.

पंतप्रधानपद चव्हाण व जगजीवनराम याच्याकडे सोपविणे व सुप्रीम कोर्टाच्या अंतिम निकालाची वाट पाहणे.

दरम्यान एक राजकीय हत्यार म्हणून काँग्रेसचे अध्यक्षपद स्वतः-कडे घेणे.

राष्ट्राध्यक्षाना सरकारचा राजिनामा सादर करून, लोकसभेच्या निवडणुका घेणे.

या साऱ्या राजकीय घडामोडी ठरल्या असत्या की ज्या लोक-शाहीस समत आहेत.

पण स्वतःच्या अपरिहार्यतेची जाणीव त्यांच्या मनात इतकी पक्की बसली होती की, त्यांनी पर्यायच शोधले नाहीत.

देशापुढे तर याहून विस्तृत पर्याय होते.

विरोधक केवळ इंदिरा गांधींच्या राजिनाम्याची मागणी करीत होते, काँग्रेससरकारच्या नव्हे. चव्हाण–जगजीवनराम यांच्या सर-कारचा राजीनामा ते मागू शकत नव्हते. एक हायकोर्टाचा निकाल सोडला तर राजकीय स्थितीमध्ये काही फरक पडला नव्हता. काँग्रेसचे बळ कायम होते. विरोधक अल्पमतात होते.

काँग्रेस लोकांना नकोशी झाली असेल तर निवडणुकीत तिला

पराभूत करण्याचा पर्याय देशासमोर होता. लोकशाही चळवळीचा जोर वाढत होता; पण अराजकाचे चिन्ह कोठेही नव्हते.

इंदिरा गांधी यांनी पर्यायाचा विचार करण्याचेच नाकारल्याने त्यांनी देशासमोरचे पर्यायही आकुंचित करून टाकले.

'प्रोजेक्शन' (आरोपन) या मानसिक प्रक्रियेचे उत्तम उदाहरण म्हणून इंदिरा गांधींचा हा निर्णय मानण्यास हरकत नाही.

त्यांच्यासमोर पर्याय नव्हते तेव्हा त्यांच्या मनाने अशी समजूत करून घेतली की, देशासमोर पर्याय नाही.

त्यांच्या मनात कोर्टाचा निर्णय न मानण्याचा, डिफायन्सचा विचार ठाण मांडून बसला होता म्हणून त्यांनी अशी समजूत करून घेतली की, सारा देश डिफायन्सची, अराजकाची तयारी करीत आहे.

नेहमीच नाही, पण 'प्रोजेक्शन' ही मानसिक प्रक्रिया स्वतःच्या अपराधाची जाणीव बोथट करण्यासाठी बहुधा निर्माण होते. इंदिरा गांधींच्या अंतर्मनात त्यांना अशी बोच असावी की, लोकशाहीच्या सन्मान्य संकेताचा आपल्याकडून भंग झाला आहे हे न्यायालयाचे म्हणणे खरे आहे.

त्यासाठी न्यायालयाने शक्यतेच्या कोटीतील शिक्षा सांगितली असती (दंड वगैरे) तर त्या ती भोगून मोकळ्या झाल्या असत्या; पण सहा वर्षे कोठलेही निर्वाचित अधिकारपद आपल्यासाठी बंद होणार ही शिक्षा त्यांना असह्य झाली.

अपराध आणि शिक्षा यांच्या संदर्भात या साऱ्या प्रकरणाचा विचार करताना आणखीही जाणवते ते असे की इंदिरा गांधी यांच्या सर्व बेदरकारीमागे, ब्रिंकमनशिपमागे, शिक्षेची अपेक्षा कोठे तरी खोलवर दडून असावी. आजवर त्यांनी अनेक संकेत, सिद्धान्त, तत्त्वे यांचे बिनदिक्कत उल्लंघन केले होते; पण त्यांना काहीच त्रास न होता त्यांचे पाऊल पुढेच पडत राहिले होते.

मनाच्या कोणत्या तरी अतर्क्य अशा आत्मघातकी कुतूहलाने, कोणत्या मर्यादेपर्यंत गेले असता शिक्षा वा प्रतिरोध होईल हे पाहण्याची इंदिरा गांधी यांची सुप्त इच्छा असावी.

त्यांचे सारे कोड पुरविणाऱ्या या देशाने त्यांची हीही इच्छा आणीबाणीनंतर पुरी केली!

¤

पण 'आणीबाणीचा आपला निर्णय बरोबर आहे' याची खातरजमा होण्याजोगीच प्रतिक्रिया देशाने आरंभीच्या काळात इंदिरा गांधींना दिली. देशाचे सन्मान्य पुढारी अटकेत पडले तरी म्हणावा तितका प्रतिकार झाला नाही सर्वत्र बाह्यत: तरी शिस्तीचे, कार्यक्षमतेचे वातावरण निर्माण झाले. रोजच्या व्यवहारातील अनेक उपऱ्या कटकटी कमी झाल्या.

वृत्तपत्रे, निश्चित विचारप्रणाली असलेले राजकीय गट यांनी काही प्रतिकार केला; पण त्यांचा प्रभाव मर्यादित होता व त्यांच्या वार्ताही न आल्याने वातावरण बदलून टाकण्यास तो असमर्थ ठरला. वीस कलमी कार्यक्रमाद्वारे (हा कार्यक्रम जागतिक बँकेचे अध्यक्ष रॉबर्ट मॅक्नामारा यांच्या एका टिपणावर आधारित होता.) गरीबगुरिबांना काही आर्थिक फायदे दिल्याने तो वर्ग विशेष अस्वस्थ झाला नाही. गोंधळ, वादविवाद यांचे स्वाभाविक वावडे असलेला मध्यमवर्ग शांतपणे आपल्या ऐहिक प्रगतीच्या कार्यात गढून गेला मालक –कारखानदारवर्ग कामगारांची कटकट संपल्याने बेहद्द खूष झाला.

हे सारे चित्र पाहून इंदिरा गांधी निश्चिंत झाल्या की आपला हाही निर्णय काळाने बरोबर ठरविला

'आपण पंतप्रधान आहोत व देशात सारे आलबेल आहे'

¤

येथपर्यंत आणीबाणीमुळे देशात झालेले परिवर्तन 'नरम सरकार' कडून 'कडक सरकार' कडे प्रवास एवढेच होते हा प्रवास मूलतः शासकीय होता. कडक सरकारला एक बाजू उपकारकर्त्यांचीही होती. बारीकसारीक फायदे बहाल होत होते.

देशातील राजकीय – आर्थिक – सामाजिक परिस्थितीत काहीच फरक पडला नव्हता की ज्यायोगे आपले मूळ प्रश्न सुटावेत दारिद्र्य, बेरोजगारी, अज्ञान, विषमता हे प्रश्न कायमच होते.

केवळ 'कडक शासन' हे रूपान्तर केल्याने झटपट इतके फायदे दिसतात तर हेच धोरण अधिक तीव्र केल्यास देशाचे अधिक कल्याण होईल, आपली पंतप्रधानपदाची कारकीर्द यशस्वी होईल या हव्यासाने इंदिरा गांधी यांनी देशाच्या काही लांब मुदतीच्या प्रश्नांवर झटपट उपाय योजण्याचा प्रयत्न केला.

आणीबाणीनंतर राजकीय नेतृत्व हा घटक सार्वजनिक व्यवहारातून अदृश्यच झाला. काँग्रेससकट सर्व राजकीय नेते निष्प्रभ झाले. त्यामुळे इंदिरा गांधींच्या नव्या मोहिमांमध्ये त्यांच्या विश्वासातील मोजके लोक व सनदी नोकरशाही यांचे प्राबल्य वाढले. लोकसंख्या-नियंत्रण, शहरसुधारणा, आर्थिक प्रगती अशा अनेक नाजूक प्रश्नांवर धुसमुसळे, अल्प मुदतीचे उपाय सुरू झाले. यात अनेक प्रकारचा जुलूम, भ्रष्टाचार यांचे पेवच फुटले. जनतेचा मोठा वर्ग या दुष्कृत्यांमध्ये भरडून निघू लागला हे सारे चांगले की वाईट हे ठरवून सुधारणा करण्यास काही वाव राहिला नाही कारण चांगले–वाईट हे ठरविणाऱ्या एकमेव निर्णयशक्ती इंदिरा गांधी याच उरल्या होत्या.

याचा निर्णय सतत करीत राहणे हे इंदिरा गांधी या एका व्यक्तीला सर्वस्वी अशक्य होते. त्यांनी मग एक शॉर्टकट काढला.

तो असा की 'काय, कसे' यापेक्षा 'कोण' हा प्रश्न त्या विचारू लागल्या. आपल्या विश्वासातील व्यक्तीने अमुक अमुक केले आहे म्हटल्यावर पुढे विचार करण्याची गरजच त्यांना भासेनाशी झाली. त्यांच्या विश्वासातील व्यक्तींचे एकमेव बलस्थान इंदिरा गांधींवरील निष्ठा हेच होते.

'एखाद्या व्यक्तीवरील निष्ठा' ही गोष्ट परिस्थितीच्या वास्तव आकलनाला पुरेशी सहाय्यक ठरत नाही कारण व्यक्तीवरील निष्ठा आणि परिस्थिती यांचा काहीच संबंध नाही.

### जनतेची मन:स्थिती

इंदिरा गांधी आपली कारकीर्द अधिक प्रभावी, अधिक गतिशील करण्याच्या प्रयत्नात असता, हा प्रयत्न यशस्वी होत आहे असा

**...म्हणून त्यांच्या मनाने अशी समजूत करून घेतली की देशासमोर पर्याय नाहीत.**

समाधानात असता जनतेच्या मन.स्थितीत हळूहळू पण निश्चित फरक पडत होता

तसे पाहिले तर जनतेची आणीबाणीविषयक प्रतिक्रिया प्रथमपासून फसवी होती,

इंदिरा गांधी यांनी कोर्टाला धुडकावून लावले आहे ही गोष्ट जनता कधीही विसरू शकत नव्हती.

' भारतीय जनतेचा हा एक विशेष आहे की न्यायाच्या प्रक्रियेबाबत कसलाही गोलमाल तिला चालत नाही. कोर्टाने ज्या व्यक्तीला दोषी ठरविले, त्या व्यक्तीला येथे कधीही माफ केले जाणार नाही फार काय, कोर्टात जाऊन ज्या व्यक्तीला आपली अब्रू साफ करून घ्यावी लागते त्याही व्यक्तीला येथे सामाजिक स्थान नाही. ही भावना विशेषत: ग्रामीण भागात फार आहे.

दुसरे म्हणजे आणीबाणीचा पसारा इंदिरा गांधींचे पतप्रधानपद सुरक्षित ठेवण्यासाठी मांडला आहे, ही गोष्टही सर्वांस कळून येत होती. हा उद्देश आणि त्याच्यासाठी देशभर चाललेले सरकारी जुलूम याच्यात काही मेळ बसत नव्हता एवढ्याशा गोष्टीसाठी देशाचा चेहरामोहराच बदलला. कोणाचे जीवितवित्त सुरक्षित राहिले नाही. व्यक्तीची प्रतिष्ठा राहिली नाही. हे चित्र सर्वसाधारण बुद्धीच्या माणसास देखील स्पष्ट दिसत होते. या जनतेची, इंदिरा गांधी नेहमीच्या मार्गांनी पतप्रधान राहण्यास हरकत नव्हती; त्यांच्या राजकीय डावपेचास हरकत नव्हती; पण सर्व देश बंधनात टाकून हे करण्यास तिची हरकत जरूर होती. सरकारचा रात्रदिवस प्रचार, रेडियोवरील गदारोळ याच्या माऱ्यानेदेखील न्यायाची गळचेपी व पंतप्रधानपदासाठीचा अट्टाहास या बाबी जनतेच्या मनातून गेल्या नाहीत.

भारत सरकारचे एक प्रकाशन आणीबाणीला एक वर्ष झाल्यावर म्हणजे जून ७६ मध्ये या साऱ्या खटाटोपाचे वर्णन भारदस्त भाषेत असे करते—

' वर्षापूर्वी देश एका धोक्याच्या वळणावर उभा होता. एक चुकीचे पाऊल पडले असते तर देश गर्तेत पडला असता. वर्षापूर्वी सामान्य माणूस एका पराभूत व असहाय मन.स्थितीत होता. हितसंबंधी व स्वार्थी राजकारणी यांच्या कारवाया लोकांचे मनोधैर्य खच्ची करीत होत्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग लोकशाही संपविण्यासाठी केला जात होता. लोकशाहीला अराजकाचा धोका होता. विरोधकांचे एकमेव उद्दिष्ट पंतप्रधानांना सत्तेवरून खाली खेचणे हे होते. गोंधळ व हिंसाचार यात काही संघटना व विरोधक यांचा हितसंबंध होता विरोधकांच्या कारवाया देशाचे हित व लोकांचे स्वास्थ्य धोक्यात आणीत होत्या. 'अर्थव्यवस्था व देशाचे स्वातंत्र्य यांना या लोकांपासून धोका होता.'

वगैरे वगैरे ! हे सर्व येथे उद्धृत करण्याचा हेतू असा की इंदिरा गांधी यांची भूमिका स्पष्ट व्हावी. हीच भूमिका सरकारी यंत्रणा मांडीत होती. मार्च ७७ मधील निवडणूकप्रचारात देखील हीच भूमिका आधारभूत होती.

एखादी गोष्ट वारंवार सांगणे व ती निरनिराळ्या शब्दांत लोकांसमोर ठेवणे हे तंत्र इंदिरा गांधींनी आणीबाणीत वापरले; पण या साऱ्या शब्दजंजाळात सामान्य लोकांना प्रश्न पडत.

पंतप्रधानांना दूर करणे यात लोकशाही विरोधी काय ?

विरोधक इंदिराविरोधी खरे; पण ते राष्ट्रविरोधी कसे ?

एवढे मोठमोठे मान्यवर पुढारी, देशाला खड्डयात टाकण्याचा प्रयत्न करतील हे कसे शक्य आहे ?

जनतेला ही भूमिका कधीही पटली नाही. आणीबाणीच्या १९ महिन्यानंतर जी अवस्था प्राप्त झाली तिचे वर्णन वरील प्रकाशनाच्या एका वाक्यानेच करणे शक्य आहे.

विरोधकांबद्दल हे प्रकाशन म्हणते, 'ह्या लोकांना स्वत.चाच आवाज ऐकण्याची व त्या आवाजालाच जनतेचा आवाज समजण्याची सवय लागली होती.' ( डी. ए. व्ही. पी या सरकारी खात्याच्या प्रकाशनात इतक्या उघडउघड राजकीय प्रचाराचा आढळ होण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. )

हे वाक्य अक्षरश: इंदिरा गांधींना लागू पडू लागले होते. स्वत.चाच आवाज, स्वत.चेच विचार असंख्य माध्यमातून त्या ऐकू लागल्या होत्या.

आणीबाणीबद्दलची प्रारंभिक प्रतिक्रिया व स्वत.च्या भूमिकेचे वरीलप्रमाणे सतत प्रसारण यामुळे इंदिरा गांधी आणीबाणीच्या संपूर्ण काळात असे मानीत होत्या की, सर्व जनतेचा त्यांना पूर्ण पाठिंबा आहे.

इंदिरा गांधींच्या सर्व राजकारणाचे वैशिष्ट्य या ठिकाणी पुन्हा नजरेत भरते.

लोकांचा पाठिंबा आपणास आहे अशी त्यांची जोपर्यंत समजूत असते, तोवर त्यांच्यावर कशाचाही परिणाम होत नाही.

१९६९ साली पक्षात विरोध होताच त्यांनी जनतेच्या पाठिंब्याचा हवाला दिला. त्याच्या आधारावर पक्षाला धाब्यावर बसविले.

१९७१ व ७२ साली लोकांचा पाठिंबा त्यांना दृश्य स्वरूपात ठोस प्रमाणात मिळाला.

१९७५ साली, हायकोर्टाच्या निर्णयाच्या मुकाबल्यात त्यांनी परत जनतेचा पाठिंबा उभा केला. या निर्णयाच्या संदर्भात, सरकारी प्रकाशन गंभीरपणे नमूद करते 'या निकालानंतर देशभरच्या कोट्यवधी लोकांनी उस्फूर्तपणे निदर्शने करून पंतप्रधानांवरचा आपला विश्वास व्यक्त केला.' ( जणू काही हा पाठिंबा हायकोर्टाचा निकाल फिरवू शकतो ! )

१९७६ सालात सर्व काळ इंदिरा गांधी आणीबाणीस लोकांचा पाठिंबा आहे हे घोकीत होत्या.

## सर्वोच्च तत्त्व

या साऱ्यावरून 'लोकांचा पाठिंबा' हे तत्त्व इंदिरा गांधी सर्वोच्च मानतात असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. हा पाठिंबा निवडणुकीतून व्यक्त झाला पाहिजे, पक्षाच्या मार्फतच स्पष्ट झाला पाहिजे, असे काही बंधन त्या मानीत नाहीत. ज्या ज्या वेळी जे जे स्वरूप त्यांना अनुकूल ठरेल ते ते स्वरूप त्या स्वीकारतात. आणीबाणीत त्या व त्यांचे पाठीराखे नेहमी म्हणत, 'निवडणुका, सभेत भाषणे करणे वा वृत्तपत्रात लेख लिहिणे म्हणजेच लोकशाही नव्हे !' हे घोषवाक्य रेडियोवरूनही सतत ऐकविण्यात येई.

'चुनाव नही, रोटी चाहिये !' ही घोषणाही या काळातीलच.

आणीबाणीच्या काळातील फसव्या लोकप्रतिक्रियांमुळे इंदिरा गांधींची अशी समजूत झाली की आपल्याला अद्याप जनतेचा पाठिंबा आहे.

या त्यांच्या समजुतीचे व लोकांच्या पाठिंब्याला त्या देत असलेल्या महत्त्वाचे भारतीय जनतेने ऋणी राहिले पाहिजे.

एका प्राथमिक, 'एलिमेंटल' अर्थाने इंदिरा गांधी या लोकशाहीवादी आहेत. लोकशाहीच्या कोणत्याही संस्थेस, संघटनेस, रचनेस त्या किंमत देत नसल्या तरी राज्य करण्यासाठी लोकांचा पाठिंबा आवश्यक आहे एवढे त्या मानतात.

तो आपल्याला आहेच या प्रगाढ विश्वासाने त्यांनी लोकसभा भंग करण्याचा व फेरनिवडणुकी घेण्याचा निर्णय घेतला. अन्यथा त्यांच्यावर कसलेही दृश्य दडपण नव्हते.

या ऐतिहासिक परिवर्तनाच्या क्षणी इंदिरा गांधी व जनता यांची एकमेकांबद्दल जी फसगत झाली ती चमत्कारिक वाटली तरी अशा काही गफलतींनीच इतिहासाची पाने भरलेली आहेत हे विसरता येत नाही.

१९७७ च्या सुरुवातीस इंदिरा गांधींना वाटले विरोधक लोकांच्या नजरेआड आहेत, निर्बल आहेत, त्यांच्यात एकजूट नाही, आपण आजवर अपयश घेतलेले नाही, लोक आणीबाणीतील शांततेवर, शिस्तीवर, खिरापतीवर खूष आहेत, मग ते आपणाशिवाय कोणास पाठिंबा देणार ?

जनतेला वाटत होते आता आणीबाणी कायम रहाणार, इंदिरा गांधी सर्वसत्ताधीश रहाणार, विरोधक कायमचे संपले ! मग कशाला कटकट करा ? या अवस्थेशी जुळवून घ्यावे हे बरे ! ही राजवट नकोशी असली तरी ती जाणे शक्यतेच्या कोटीतील नाही.

इंदिरा गांधी व जनता यांची मनःस्थिती या वर वर्णन केलेल्या टप्प्यावर जेव्हा आली तेव्हा आणि तेव्हाच दोघांचे अंदाज चुकीचे ठरण्याची संधी मिळण्याचा संभव होता. जनतेत थोडा जरी प्रतिकार शिल्लक आहे असे इंदिरा गांधींना वाटले असते तर त्यांनी निवडणुका घेतल्याच नसत्या !

इंदिरा गांधी थोड्या जरी उदार झाल्या आहेत अशी शंका जनतेस आली असती तर जनता इतकी थंड राहिलीच नसती !

दोघांच्या अपेक्षा सम व प्रतिरोधी ( ईक्वल अँड अपोझिट ) झाल्या आणि परिस्थितीला अभूतपूर्व कलाटणी मिळण्याची शक्यता निर्माण झाली.

पहिली संधी मिळताच या स्त्रीला, तिच्या पक्षासकट रजा द्यायची असा जनतेने जणु मूक निश्चय केला होता. या निश्चयास पूरक असा पर्याय जनतापक्षाने लोकांपुढे ठेवला. लोकांनी तो मानला. आपली इच्छा निस्संदिग्धपणे व्यक्त केली.

'लोकांची इच्छा' इतक्या प्रखरपणे, स्वच्छपणे व्यक्त झाली तेव्हाच इंदिरा गांधींनी ती शिरोधार्य मानली. इंदिरायुग संपुष्टात आले !

□

१९६९ नंतरचा घटनाप्रवाह अशा रीतीने न्याहाळला तर इंदिरा गांधी या शक्तीची अखेर अशीच होणे क्रमप्राप्त होते; दुसरे काही होऊच शकत नव्हते हे ध्यानात येते व इंदिरा गांधींच्या उदयास्ताला एखाद्या शेक्सपीरियन शोकांतिकेचे परिमाण प्राप्त होते.



'होय – लोकांच्या पाठिंब्यावरच मी परत येईन !'

इंदिरा गांधींच्या उदयातच त्यांच्या अस्ताची बीजे होती. त्यांचा पराभव स्वतः त्यांनीच घडवून आणला असाच निर्वाळा भावी इतिहास देईल अशी शक्यता आहे. राष्ट्रनेत्यांचा अस्त होतच असतो. कधी ना कधी त्यांची कारकीर्द संपतेच; पण इंदिरा गांधींची कारकीर्द फार वाईट रीतीने संपली ! त्यांची जनतेविषयी काही सद्भावना शिल्लक आहे याची खातरजमा लोकांना होईनाशी झाली. त्यामुळे इंदिरा गांधी व जनता यातील एक खास असा संबंध संपुष्टात आला. राजकीय नेत्याच्या अस्तानंतरही जनतेस त्याच्याबद्दल जे वाटते, ते इंदिरा गांधींबद्दल वाटेनासे झाले. आजसुद्धा जनतेस इंदिरा गांधींबद्दल जे कुतूहल आहे ते त्या परत येतील की काय या शंकेमुळे. या कुतूहलाव्यतिरिक्त कोणतीही भावना शिल्लक नाही.

## संजयचा वाटा

ही अशी परिस्थिती निर्माण होण्यात संजय-प्रकरणाचा फार मोठा वाटा आहे. हे सारे प्रकरण दुर्दैवी आहे. इंदिरा गांधी यांना संजयच्या रूपाने आपला दिशाहीन, दुर्लक्षित भूतकाळ सतत दिसतो. त्याला तरी काही स्वतंत्र करियर करता यावी ही त्यांची अपेक्षा अवास्तव म्हणता येणार नाही. मारुती–प्रकरण मुळात तसे विशेष आक्षेपार्ह नव्हते. इतर कोणत्याही उद्योगाप्रमाणे त्याची वाटचाल झाली असती तर काही प्रश्न नव्हता; पण त्या प्रकरणात सरकारी सवलतींची भ्रष्ट खैरात करण्यात आली. विरोधक यावर टीका करतील म्हणून इंदिरा गांधी आणखी हिरीरीने या प्रकरणाचे समर्थन करीत. संजय गांधींचे कर्तृत्व उद्योगक्षेत्रात शून्य ठरले तेव्हा त्यांच्या भवि-

तव्याची चिंता नव्याने उभी राहिली आणीबाणीत त्याला राजकारणात प्रवेश करण्यास सुरक्षित काळ आहे असे वाटून इंदिरा गांधींनी त्याला युवक कॉंग्रेसचे काम दिले, जरा जादा प्रसिद्धी दिली

इंदिरा गांधींच्या वर्तुळातील लोक संजय गांधीला अधिकाधिक पेपर करू लागले. त्याच्याकडून सूचना घेऊ लागले. त्यालाही ही नवीन व्यवस्था पसंत पडली. इतर कसलाही अडथळा नसल्याने या व्यवस्थेची व्याप्ती व तीव्रता वाढू लागली. पुढे काय झाले ते सर्वश्रुतच आहे.

इंदिरा गांधी एका अत्यंत जुलमी व नालायक अशा गटाशी संलग्न आहेत म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. या मार्गाने संजय राष्ट्रनेता बनणे अशक्य आहे याची जाणीव इंदिरा गांधींना नसेल असे म्हणता येत नाही; पण त्यांना आणीबाणीचा काळ या कामाच्या सुरुवातीला अनुकूल वाटला, एवढे खरे.

संजयचे प्रस्थ किती वाढले होते याची इंदिरा गांधींना पुरेशी कल्पना नसावी किंवा नेहमीप्रमाणे त्या वस्तुस्थिती नाकारीत असाव्यात डेव्हिड फ्रॉस्टला दिलेल्या मुलाखतीत त्या संजय गांधी कारभार पाहात होता, हुकूम देत होता, निर्णय घेत होता याचा ठासून इन्कार करतात. सतत दोन वर्षे त्यांनी हेच केले असे करण्यात आपण विरोधकांना धुडकावून लावीत आहोत असे त्या मानीत होत्या; पण प्रत्यक्षात त्या या पवित्र्याने लोकांपासून दुरावत होत्या. शहरी जनतेला या सर्व प्रकरणाची शिसारी आली. लोकशाहीचा उरलासुरला आभासही या संजय–प्रकरणाने नष्ट झाला.

नेहमीच्या राजकीय परिस्थितीत संजय राष्ट्रनेतेपदी आरूढ झालाही असता. ज्या कॉंग्रेसपक्षाने इंदिरा गांधींना केवळ नेहरू-कन्या म्हणून प्रथम उच्चपदी बसविले, त्या कॉंग्रेसने स्वतःच्या राजकीय हिशेबासाठी संजयलाही नेता म्हणून निवडले असते. एवढे कशाला, मधले हे सगळे रामायण घडले नसते व इंदिरा गांधींची राजवट नैसर्गिक कारणाने संपली असती तर कॉंग्रेसने संजयलाच नेता म्हणून पुढे आणले असते. ग्रामीण जनतेला नेहरूंनंतर इंदिरा, इंदिरेनंतर संजय हा आनुवांशिक क्रम फारसा खटकला नसता असे मानण्यास जागा आहे. तेव्हा इंदिरा गांधींचा आडाखा या प्रकरणी विशेष चूक नव्हता. केवळ आणीबाणीच्या कृत्रिम परिस्थितीने या प्रयासांना कारस्थानाचे स्वरूप आले. स्वतःचे स्थान सुरक्षित नसताना, ते सांभाळण्यासाठी एवढा आटापिटा चालू असताना इंदिरा गांधी यांनी संजयची राजकीय जबाबदारी स्वीकारली–त्याचे टायमिंग चुकले एवढेच म्हणता येईल. आणीबाणीच्या कृत्रिमतेमुळे व संजयच्या उदयाच्या फसलेल्या कारस्थानामुळे इंदिरा गांधींच्या अस्ताला अत्यंत अनैसर्गिक अशी अवकळा आली हीच संजय–प्रकरणाची फलश्रुती !

□

संजय गेला–इंदिरा गांधीही गेल्या ! पुढे काय ? हा प्रश्न सर्वांच्या मनात घोळत आहे.

पराभवानंतर एका वार्ताहराने इंदिरा गांधींना विचारले,

'आपण परत येणार काय ?' (वुइल यू कम बॅक ?)

इंदिरा गांधींनी उत्तर दिले, 'होय–लोकांच्या पाठिंब्यावरच मी परत येईन !' (येस्, थ्रू द पीपल् !)

या आता केविलवाण्या वाटणाऱ्या उत्तरातच इंदिरा गांधींच्या करिश्म्य.चे, धुवाधार लोकप्रियतेचे, अंतर्यामीच्या अचल धैर्याचे सारे रंग झळाळून उठतात. त्यांची मूळची ताकद 'लोकांचा पाठिंबा' ही होती, ती परत मिळाल्याखेरीज आपणास भवितव्य नाही हे त्या मनोमन मानतात त्यासाठी सारा प्रवास नव्याने करण्याची त्यांची तयारी आहे ही गोष्ट एक राजकारणी म्हणून त्यांना अनुकूल ठरण्याची शक्यता आहे. आता हा सारा प्रवास त्या कशा करतात, परिस्थिती त्यांना कशी साथ देते यावर बरेचसे काही अवलंबून आहे.

याबाबत भविष्ये वर्तविण्यात पत्रकार, धंदेवाईक ज्योतिषी यांची चढाओढ लागली आहे. या लोकांना त्यांचे काम करू देऊन काही गणितातल्या ताळ्याप्रमाणे त्यांच्या भवितव्याचा वेध घेता येतो का पाहू.

इंदिरा गांधी परत येणार की नाही या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या अस्ताने या देशाने काय गमावले या प्रश्नाच्या उत्तरात आहे.

याचे उत्तर असे आहे की, देशाने या अस्तामुळे, उद्रेकाचे व्यवस्थापन (क्रायसिस मॅनेजमेंट) करण्याचे अद्वितीय कौशल्य असलेले एक व्यक्तिमत्त्व गमावले. हे कौशल्य फार थोड्या नेत्यामध्ये असते. विद्यमान नेत्यांपैकी कोणाहीजवळ ते असल्याचा पुरावा नाही. उद्रेकाचे व्यवस्थापन करण्यासाठी विलक्षण धैर्य, हिशेब न मांडता पुढे जाण्याची अंतःप्रवृत्ती, तात्त्विक गुंतागुंतीने न वाकलेले स्वच्छ, स्पष्ट आणि सळसळते मन या गोष्टी आवश्यक असतात. इंदिरा गांधींना या गोष्टी दैवाने वहाल केलेल्या आहेत. आणीबाणीपर्वात त्यांच्यातील हे विशेष, त्यांच्याच मनोवृत्तीतील वेगळ्या दोषामुळे झाकळून गेले होते म्हणून त्यांच्या प्रतिक्रिया पराभूत ठरल्या.

उद्रेकाचे व्यवस्थापन करण्याचे आपले कौशल्य हेच आपले बलस्थान आहे ही गोष्ट इंदिरा गांधी विसरल्या नाहीत. तेव्हाही विसरल्या नव्हत्या; पण फरक असा होता की, मागचे उद्रेक परिस्थितीतून उद्भवले होते तर जून १९७५ मध्ये आपली गरज देशाला सतत भासावी या उद्देशाने इंदिरा गांधींनी उद्रेकसदृश परिस्थिती तयार (मॅन्युफॅक्चर) केली. ही कृत्रिमता देशामधील जनतेने अंतःप्रेरणेने जाणली व इंदिरा गांधींच्या 'गुणांना' वाव देण्यासाठी कायम त्यांच्याकडे ओलीस राहण्याचे नाकारले.

भारतासारख्या दरिद्री, विस्कळित, विविधतेने भरलेल्या देशात यापुढेही स्वाभाविक उद्रेकांना भरपूर वाव आहे. स्वतः इंदिरा गांधीही प्रथम पक्षात व नंतर देशात स्वतःची अपरिहार्यता सिद्ध करण्यासाठी, एखादा उद्रेक निर्माण करणारच नाहीत असे नाही.

म्हणून त्यांची सध्याची कठीण, हतबल अवस्था ध्यानी घेऊनही, इंदिरा गांधी देशाला परत हव्याशा वाटण्याची शक्यता आहे.

एक स्व–घोषित इंदिरा-प्रेमी असूनही मला मात्र असे वाटते की, त्यांचे पुनरागमन पुढे–मागे देशाला पुन्हा एकदा उद्रेकांच्या भोवऱ्यात नेऊन सोडील. हे होऊ नये म्हणून देशापुढील छोटे–मोठे प्रश्न, अडचणी लोकशाही मार्गांनी सोडविण्याची प्रक्रिया सुरू झाली पाहिजे.

□

# प्रतिक्रिया



# प्रतिक्रिया

इंदुताई टिळक
विद्या बाळ
सुचित्रा राजुरकर
रेहाना पठाण

संकलन
सतीश कामत

'काय म्हनता. बाई पुना राज्य करू म्हनत्येय ? कश्शाला त्ये ? जालं येवडं वाटुळं काय कमी जालं ?'

'अहो, राज्य करायचं नाही म्हणत. त्यांचा विचार जनतेची पुन्हा सेवा करण्याचा आहे ..'

'बस् जाली म्हनावं तुजी शेवा !'

इंदिराजींच्या राजकारणातील पुनर्प्रवेशाबद्दल काही स्त्रियांच्या प्रतिक्रियांचा अंदाज घेत असताना काशीवाडीच्या झोपडपट्टीतून आलेला हा एक जळजळीत टोला. इंदिराजींचा हा प्रवेश भारतीय राजकारणाच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून निश्चितच महत्त्वाचा आहे. त्याबद्दल राज्यशास्त्रातील विद्वान किंवा राजकीय निरीक्षकांची ठरीव साच्याची मतं आपण नेहमीच वाचत किंवा ऐकत असतो; पण समाजाच्या विविध स्तरांमध्ये वावरणाऱ्या, काम करणाऱ्या स्त्रियांची या विषयावरील मतं घराच्या (खरं म्हणजे स्वयंपाकघराच्या) चार भिंतींतच राहतात आणि बऱ्याच वेळा असा अनुभव येतो की, हीच मतं अधिक प्रामाणिक असतात, सर्वसामान्यांच्या विचारांचं खरंखुरं प्रतिनिधित्व करणारी असतात. म्हणूनच या ठिकाणी इंदुताई टिळक, विद्या बाळ, सुचित्रा राजूरकर, रेहाना पठाण, तसंच शिक्षणशास्त्राच्या एक प्राध्यापिका आणि इतरही काही विविध स्तरांतील स्त्रियांची या 'पुनःप्रवेशा'बद्दलची मतं देत आहे.

'इंदिराजींचा पराभव झाल्याचं ऐकल्यावर सर्वप्रथम काय वाटलं ?' याचं उत्तर निरपवादपणे 'कुठं तरी वाईट नक्कीच वाटलं' असं होतं. कारण व्यक्ती म्हणून आणि त्यातही एक स्त्री म्हणून इंदिराजीं-

बद्दल एक प्रकारची सहानुभूती या सर्वच स्त्रियांच्या मनात होती. अर्थात याचबरोबर हळूहळू विचार करायला लागल्यानतर विशेषत: आणीबाणीतील अतिरेकाची वृत्तं बाहेर यायला लागल्यानतर मात्र 'बाईंबद्दल वाटणारी ही सहानुभूती आता जवळजवळ नष्टच झाली आहे' असंच बहुतेक जणीनी सागितलं.

इदिराजीच्या राजकारणातील पुन:प्रवेशा-बाबत मात्र फारच निरनिराळ्या प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसल्या. इदुताई टिळकांच्या मते कोणतीच राजकारणी माणस एकदा राजकारणात पडल्यानतर त्यातून बाहेर पडूच शकत नाहीत. त्यामुळे इदिराजीचा हा प्रवेश अपरिहार्यच होता. विद्या बाळ यांना मात्र असा प्रश्न पडलाय् की, 'आता जनतेच्या दृष्टीने, देशाच्या दृष्टीने एवढी अहितकारक, अन्याय्य कृत्यं केल्यानंतर पुन्हा त्या क्षेत्रात बाईंना यावसच कस वाटत?' राजकारणातील चढ–उताराना त्याचा विरोध नाही. ते त्या ठिकाणी अपरिहार्यच असतात. न्यायाकरता किंवा काही तरी तत्त्वाकरता लढणं आपण समजू शकतो; परतु अशा तऱ्हेचं काहीही शिल्लक राहिलं नसताना किंबहुना काळिमाच अधिक लागला असताना इदिराजी परत येऊच कशा शकतात? विद्याताईंच्या मते, 'अशा तऱ्हेची 'लढाऊ वृत्ती' हा राजकारणी माणसाचा खास अलौकिक गुण असावा!' तरुण मडळीच प्रतिनिधित्व करणारी सुचित्रा राजूरकर मात्र या विषयाकडे थोड्या निराळ्याच दृष्टिकोनातून बघते. तिच म्हणण–'इंदिराजी आता फक्त दोनच ठिकाणी राहू शकतात. Either in jail or in politics.' अर्थात यात चित्राच वैयक्तिक मत अस आहे की, बाईंना बहुधा जेलच घडणार; पण तस जर घडल नाही तर मात्र 'She deserves to be in politics.' कारण एवढी सगळी काळी कृत्यं करूनही न्यायदेवतेच्या तडाख्यातून बाई सुटल्या तर त्यात बाईंचं 'कर्तृत्व' आणि 'जनता'वाल्यांचं 'नाकर्तेपण'च सिद्ध होणार आहे. मग अशा 'कर्तृत्ववान' बाईने राजकारण खेळू नये तर काय भांड्या – बोळक्यांचा संसार करावा? याच सदर्भात चित्राने आणखी एक मुद्दा माडला तो असा की, सध्या इंदिराजी कोणत्याच अधिकारावर नसल्यामुळे कॉंग्रेस-मध्ये बाजारबुणग्यानाही जो भाव आलाय् तो कमी झालाच पाहिजे आणि त्यावर एवढा एकच उपाय आहे–बाईंनीच पुन्हा कॉंग्रेसची सूत्रे हातात घेणे. कारण राज-कारणामध्ये नीतिमान सज्जनपणापेक्षा धाडसी कावेबाजपणाच अधिक महत्त्वाचा. लेडी हवाबाई हायस्कूल या कँपमधील शाळे-मध्ये शिक्षिका म्हणून काम करणाऱ्या रेहाना पठाण यांचा मात्र इदिराजीच्या या पुनरागमनाला कडक विरोध आहे. याचं पहिल कारण त्यानी अस दिल की, आणी-बाणीतील अत्याचारांबद्दल आता ज्या अनेक चौकशी–समित्या काम करीत आहेत त्याच्या या तपासामध्ये इदिराजी स्वत:च गुन्हेगार म्हणून गोवल्या जाण्याची शक्यता भरपूर आहे. तेव्हा मग अशा गुन्हेगार ठरणाऱ्या व्यक्तीने राजकारणात स्थान मागावच्न कशासाठी? पठाणबाईंचा दुसरा मुद्दा असा की, इदिराजीबद्दल पूर्वी जो आदर होता तो आता जवळजवळ नष्टच झालेला आहे. त्या केवळ एक स्त्री आहेत म्हणून जी सहानुभूती वाटते तेवढीच.

### स्वागतांमागील रहस्य

एके काळी जी प्रचंड लोकप्रियता इदिरा-जीनी उपभोगली तशी लोकप्रियता त्या काही कालावधीनंतर पुन्हा मिळवू शकतील का? या प्रश्नावरही मजेदार प्रतिक्रिया आल्या. इदुताईंच्या मते, राजकीय क्षेत्रामध्ये कोणत्याही आणि कितीही प्रकारच्या लाटा आल्या आणि गेल्या तरी अशी जी प्रचड व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची माणसं असतात त्याचा एक विशिष्ट गट त्याच्याशी तितकाच प्रामाणिक आणि एकनिष्ठ राहतो. अर्थात इदिराजीच्याही पाठीशी असा एक फार मोठा गट आहेच. तेव्हा या गटाच्या आधाराने त्या पुन्हा पुढे येऊ शकतील एका प्राध्यापिकाबाईंचही हेच मत पडलं. त्याचं कारण त्यानी अस दिल; की अजूनही आप-ल्याकडे अंधश्रद्धा आणि व्यक्तिमाहात्म्य फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे इंदिरा-जींच्या व्यक्तिमत्त्वाने भारून जाणारी माणसं भारतात कमी नाहीत. म्हणून त्या जर पुन्हा राजकारणात यशस्वीपणे येऊ शकल्या तर त्या निश्चितच लोकप्रिय होतील. विद्या बाळ यांचं मात्र याबाबतीत थोडं निराळं मत आहे. त्याना अस वाटतं की, इदिराजीच्या नैतिक प्रतिमेला जो जबरदस्त धक्का निवड-णुकीनंतरच्या काळात बसला आहे त्यातून त्याना सावरणं कठिण जाईल. तसच त्याना सध्या पक्षातर्गतही फार मोठा विरोध आहे. तो विरोध आणि बाहेरून जनतापक्ष आणि इतर मंडळी याचा विरोध अशा या दुहेरी विरोधातून वर येऊन पूर्वीची प्रतिमा परत निर्माण करणं फार अवघड आहे अर्थात हे अशक्य नाही; पण कठीण मात्र पुष्कळच आहे. इदिराजीचं बेलची किंवा विनोबा–भेटीत जागोजागी जे स्वागत झालं त्याचही विद्याताई निराळ्याच प्रकारे स्पष्टीकरण देतात. त्याच म्हणणं असं की, यामध्ये मन:-पूर्वकतेपेक्षाही आपल्या भारतीयाची 'स्वागत –वृत्ती' जी आहे तीच अधिक असावी पंतप्रधान येवोत नाही तर मोटारशर्यतीच्या गाड्या येवोत आपण भारतीय मडळी सार-ख्याच उत्साहाने (आणि वेगाने) धावतो इदिराजीची ही जी 'प्रचड स्वागत' झाली त्यात खऱ्या भावनेपेक्षा हा (अति) उत्सा-हाचाच भाग अधिक असावा असं त्याना वाटत. चित्राच्या मते मात्र, बाईंमध्ये अजू-नही ती लोकप्रियता परत प्राप्त करण्याची capacity आहे. बाईंच्या व्यक्तिमत्त्वाचाही यामध्ये फार महत्त्वाचा वाटा आहे. लोकाची नस पकडायची किमया त्याच्याजवळ आहे. अर्थात बाईंच्या या पुनरागमनाने जनता-पक्षामध्येही अधिक एकजूट निर्माण होऊन चागला परिणाम घडेल. कारण बाईविष-यीच्या तीव्र विरोधातूनच ही सारी मडळी एकत्र आली आहेत रेहाना पठाणनीही इदिराजीच्या व्यक्तिमत्त्वाला जे एक 'ग्लॅमर' आहे ते त्याना या कामी उपयोगी पडेल असं सागितलं.

इदिराजीच्या या प्रवेशामुळे त्यांच्या राजकीय कारभारातील अनुभवाचा देशाला काही उपयोग होईल असं वाटतं का?

यावर आलेली उत्तरही अशीच समिश्र स्वरूपाची आहेत. इदुताई टिळक, सुचित्रा राजूरकर, रेहाना पठाण यांची या प्रश्नाला पूर्णपणे होकारार्थी उत्तर आहेत, पण विद्या बाळ याना मात्र अस वाटत की, स्वार्थ तर कोणालाच सुटलेला नाही; पण देशहिताची जी किमान भावना अपेक्षित असते, तीही इंदिरा-

जीजवळ दिसत नाही शिवाय त्याची जनमानसातील प्रतिमा आता इतकी खराब झालेली आहे की त्यांच्या एखाद्या चांगल्या सल्ल्याकडेही सशयास्पदपणेच पाहिलं जाईल.

एका प्राध्यापिकाबाईंच्या मतेही, इंदिराजींचा जर एकूण पिंड लक्षात घेतला तर आता त्यांचा देशाला काही फारसा उपयोग होईल असं वाटत नाही.

कसंही करून इंदिराजी जर राजकारणात यशस्वीपणे आल्याच तर तुम्ही त्याचं स्वागत कराल का?

–या प्रश्नाचं उत्तर रेहाना पठाण यांनी होकारार्थी दिलं. त्याचं कारण त्यांनी असं सांगितलं की 'इंदिराजींच्या कारकीर्दीत त्यांच्यासारख्या अल्पसंख्याकांना संरक्षणाची फार मोठी भावना होती. इंदिराजींच्या आत्मविश्वासपूर्ण बोलण्याचाही तो परिणाम असेल. अर्थात आता तशी भावना वाटत नाही असं नाही; पण इंदिराजी आल्या तर ती अधिक वाढू लागेल. या संदर्भात आणीबाणीच्या काळात घडलेल्या 'टर्कमनगेट' प्रकाराचं उदाहरण दिल्यानंतर पठाणबाईंनी असं सांगितलं की तो प्रकार काही विशिष्ट जात–जमात मनात धरूनच केला गेला असेल असं त्यांना वाटत नाही आणीबाणीत जे विविध प्रकारचे आणि विविध ठिकाणी अत्याचार घडले त्यापैकीच हा एक; त्यामुळे इंदिराजींबद्दल वाटणारी आपुलकी आणि सहानुभूती अजूनही काही अंशी शिल्लक आहेच. सुचित्रा राजूरकरलाही असं वाटतं की, बाई जर गुन्हेगार म्हणून शाबीत होऊ शकल्या नाहीत तर त्यांनी राजकारणात यावंच. विद्या बाळ यांना मात्र इंदिराजींच्या या 'जिद्दी'चं साश्चर्य कौतुक वाटतं. बाईंच्या कर्तृत्वाबद्दल विद्याताईंना वाटणारा आदरही बराच कमी झाला आहे. कारण बाईंमध्ये पराकोटीचा निगरगट्टपणा, निर्ढावलेपणा आहे, की जो विद्याताई समजूच शकत नाहीत. त्या तर असं म्हणाल्या की, 'माझा मुलगा जर अशा तऱ्हेने इतक्या लोकांवर अन्याय होण्यास कारणीभूत झाला असता तर मला कमालीची खंत वाटली असती आणि त्याला अशा तऱ्हेने पाठीशी घालण्यापेक्षा publicly disown करणंच मी अधिक पसंत केलं असतं.'

तर अशा या प्रतिक्रिया–विविध स्तरातील स्त्रियांच्या आणि तितक्याच विविध स्वरूपांच्या; पण एक गोष्ट मात्र या प्रतिक्रिया अजमावताना प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे, स्त्रियांना एकूणच राजकारणात रस कमी असावा. खरं म्हणजे इंदिराजींविषयी बोलताना या स्त्रिया काही तरी कळकळीने, हिरीरीने मुद्दे मांडतील असं वाटलं होतं. पण त्या मानानं निराशाच झाली. काही स्त्रियांना तर गेल्या तीस वर्षांतील राजकीय इतिहासच फारसा माहीत नाही. एका प्राध्यापिकाबाईंनीच असं सांगितलं की, मी राजकीय विषयावरील बातम्या निवडणुकीच्या काळातच प्रथम वाचायला लागले. तेव्हा इंदिराजींची ही राजकीय कृती या स्त्रियांच्या दृष्टिकोनातून फारशी महत्त्वाची नाही कारण तिचा यांच्या वैयक्तिक जीवनाशी काहीच संबंध नाही. हा दृष्टिकोन शक्य तितक्या लवकर बदलला जाणं आवश्यक आहे. किमान सुशिक्षित स्त्रियांकडून तरी ही अपेक्षा आहे. ◘

---

# बाईंनी अंमळ घाईच केली!

## उमा वासुदेव

---

याच विषयाच्या संदर्भात 'Two Faces of Indira Gandhi' या सध्या गाजत असलेल्या पुस्तकाच्या लेखिका उमा वासुदेव यांची भेट झाली. इंदिराजींच्या पराभवाची बातमी ऐकल्यानंतर तुमची पहिली प्रतिक्रिया काय होती?

यावर त्यांनी सांगितलं की, एका प्रचंड ability असणाऱ्या बाईचा अशा तऱ्हेने पराभव व्हावा याबद्दल निश्चितच वाईट वाटलं!

इंदिराजींच्या राजकारणातील पुनःप्रवेशाबद्दल बोलताना उमा वासुदेव म्हणाल्या की, त्यांना वैयक्तिकपणे मात्र असं वाटतं की बाईंनी अजूनही दोन–तीन महिने थांबायला हवं होतं. त्याचं कारण असं की अजूनही काँग्रेसपक्ष काय, जनतापक्ष काय, दोन्हीही पक्षांमधील ढवळलं गेलेलं वातावरण पूर्णपणे निवळलेलं नाही. अजूनही त्यामध्ये काही महत्त्वाच्या हालचाली किंवा काही महत्त्वाचे बदल घडून येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी बाईंनी जरा सबुरीने घेऊन या हालचालींचा किंवा बदलाचा पूर्ण अंदाज घेऊन मगच हे पाऊल टाकायला हवं होतं. शिवाय त्या अजून थोडं थांबल्या असत्या तर त्यांच्या मनामध्ये नक्की 'काय शिजत आहे' याचा फारसा अंदाज या दोन्ही पक्षांतील धुरंधरांना आला नसता. बाईंनी आपल्या हेतूची अशा तऱ्हेने जाणीव करून दिल्यामुळे आता काँग्रेस आणि जनतापक्ष या दोन्ही पक्षांतील बुजुर्ग मंडळी सावध होऊन बाईंच्या शक्तीला आणि सत्तेला वेळीच वेसण घालण्याचा प्रयत्न करतील. इंदिराजींनी जर थोडी वाट पाहिली असती तर हे धोके त्यांना टाळता आले असते. *शिवाय यामुळे निर्माण होणाऱ्या रहस्यमय* वातावरणाचाही फायदा त्यांना उठवता आला असता.

आता इंदिराजींनी आपली हालचालींची दिशा निश्चित दाखविल्यामुळे पुढील तीन–चार महिने भारतीय राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत crucial असतील असं उमा वासुदेव यांना वाटतं हा काळ म्हणजे एक Battle of wits च असेल कारण आपली डागाळलेली प्रतिमा धुऊन काढून, जुने वर्चस्व पुन्हा वेगाने प्रस्थापित करण्याचा प्रयत्न इंदिराजी करतील तर त्यांची प्रतिमा अधिकाधिक खराब करण्याचा, शक्यतो नष्टच करण्याचा प्रयत्न त्यांचे विरोधक करतील. या स्पर्धेत कोण यशस्वी होईल हे केवळ काळच ठरवू शकेल.

इंदिराजींना पक्षांतर्गतच असा जो फार मोठा विरोध आहे तो इंदिराजी कसा मोडून काढू शकतील या प्रश्नाचं उत्तर देताना उमा वासुदेव यांनी सांगितलं की यासाठी सर्वप्रथम इंदिराजी आपल्याला जनतेचा अजूनही प्रचंड पाठिंबा आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतील आणि त्याचाच दबाव काँग्रेसमधल्या श्रेष्ठींवर आणून आपलं जुनं स्थान पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतील. कारण इंदिराजी नेहमी अशा तऱ्हेच्या 'जनतेच्या पाठिंब्याच्या' आधारेच (किमान तसा तो आहे असं दाखवीत) आपलं वर्चस्व राखीत आल्या आहेत. आणीबाणीपूर्वी किंवा आणीबाणीच्या काळात त्यांच्या घरासमोर जे मेळावे जमायचे (किंवा जमविले जायचे) ते याच उद्देशाने.

हे जर शक्य झालं नाही तर इंदिराजी एक नवाच पक्ष काढण्याची शक्यता कितपत वाटते?

यावर उमा वासुदेव यांनी सांगितले की, त्यांना जर आवश्यक तेवढा किंवा पुरेसा पाठिंबा मिळाला तर असं काही करण्यासही इंदिराजी कचरणार नाहीत असं वाटतं; पण तितक्या मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मात्र मिळाला पाहिजे. अशा स्वरूपाचा पाठिंबा मिळत असेल तर इंदिराजी पक्षाचे तुकडे पाडण्यासही मागेपुढे पहाणार नाहीत. याचा अनुभव १९६९ साली आला आहेच. फक्त त्यांना तसा विश्वास वाटला पाहिजे.

इंदिराजी पूर्वीची लोकप्रियता कितपत मिळवू शकतील यावर उमा वासुदेव यांचं असं मत पडलं की एकदा जर जनतेचा विश्वास गमावला तर तो परत मिळविणं अत्यंत कठिण, जवळजवळ अशक्यच असतं. उमा वासुदेव यांनी स्वतः निवडणुकीनंतर रायबरेली मतदारसंघाला एक भेट दिली. त्या वेळी त्यांना असं आढळून आलं की खेड्यापाड्यातील लोकही आता पुरेसे बिथरली आहेत आणि इंदिराजींविषयी कडवा विरोध व्यक्त करीत आहेत. अर्थात दक्षिण भारतात मात्र याच्या अगदी उलट अनुभव आल्याचंही त्यांनी सांगितलं; पण एकूण बाईंचं भवितव्य मात्र जरा कठिणच आहे याबद्दल दुमत नाही. ◘



# इंदिराजींकी वापसी

शरद कृष्णन्

निवडणुकीमधील सणसणीत पराभवानंतर तीनचार महिने गप्प असलेल्या इंदिराजी बी. बी. सी. च्या डेव्हिड फ्रॉस्टबरोबर प्रथमच बातचीत करणार होत्या. बाई अशी मुलाखत देणार असल्याच्या वार्ताही प्रसिद्ध झाल्या होत्या. ठरल्याप्रमाणे मुलाखत झाली आणि देशामधील लक्षावधी लोकांच्या आणि विशेषत: राजकारणाची खेळी खेळणाऱ्या क्रियाशील राजकारण्यांच्या मनामध्ये डोकावणारा तो प्रश्न डेव्हिड फ्रॉस्टने विचारला. प्रश्न अगदी सरळसोट होता. 'बाईजी, आपण पुढे काय करणार ? आपणाला पुन्हा राजकारणामध्ये स्थान मिळेल असे आपल्याला वाटते का ?' आणि बाईंनी उत्तर दिले. 'राजकारणाची व्याख्या आपण कशी करता, यावर ते अवलंबून आहे. राजकारण म्हणजे सतत सत्तास्थानी असणे अथवा पूर्ण वेळेचा व्यवसाय असल्याप्रमाणे राजकीय पटावरील प्यादी सरकविण्यात सतत गढून असणे असा जर तुमचा दृष्टिकोन असेल, तर या असल्या राजकारणामध्ये मला कधीच फार गोडी नव्हती; परंतु भारतीय जनतेच्या भवितव्याबरोबर माझे अतूट नाते असून त्यापासून दूर जाणे मात्र मला कदापि शक्य होणार नाही !'

भारतीय जनतेशी अतूट नाते म्हणजे नेमके काय ? भारतीय जनतेच्या भवितव्यापासून बाईंना दूर जाता येणार नाही असे त्या म्हणतात; पण हे नाते असे एकतर्फी बनले जात नाही. कारण या नात्यातील भारतीय जनता ही एक पार्टी आहे आणि म्हणून जनतेला इंदिराजींबद्दल काय वाटते ही गोष्टही अतिशय महत्त्वाची आहे. जनमानसाची नाडी मोठी विचित्र असते. संताप आणि गौरव याबाबत जनतेच्या प्रतिक्रिया नेहमीच टोकाच्या असतात. दोन्हींचा प्रसाद बाईंना मिळालाच आहे ! या देशात कोणाच्याही वाट्याला आली नाही अशी अफाट लोकप्रियता मिळविलेल्या या बाईने जनतेचा संताप ही काय चीज असते याची झलकही अनुभविली आहे. अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय बाईंनी झिडकारला तेव्हाच त्यांच्या लोकप्रियतेला पहिला तडाखा बसला ! त्यानंतरही बाई तोंडाने मी सत्तेवर राहते की नाही हे महत्त्वाचे नाही असे म्हणतच होत्या; पण या फुकाच्या शब्दांचे मोल जनतेने अचूक जोखले. कारण त्यानंतरचे त्यांचे सारे राजकारण, घटना-दुरुस्ती प्रकरण आणि आणीबाणीचे काळेकुट्ट पर्व यामुळे एक 'सत्तापिपासू राजकारणी' अशीच बाईंची

प्रतिमा तयार झाली आणि लोकशाहीची वकवास करीत हुकुमशाहीचे नागर फिरविणाऱ्या या बाईविरुद्ध वातावरण तापत गेले. निवडणुका आल्या आणि सतापी मतदान ही काय चीज असते याचे रुद्रदर्शन बाईना झाले. मग तीन-चार महिन्यांचे मौन आले. ज्या काही थोडचाफार हालचाली झाल्या त्या पडद्यामागे, उदाहरणार्थ, विधानसभा-निवडणुकीच्या वेळी बाईंनी आपल्या मनाने केलेले फेरफार, के ब्रह्मानंद रेड्डी याना कॉंग्रेस अध्यक्षपदी वसविण्यात मिळविलेले यश, या गोष्टीचा निर्देश करता येईल या पडद्यामागील हालचाली अशाच काही काळ चालू राहिल्या असत्या, पण सजीव रेड्डी याच्या नावाला मान्यता देताना आपला साधा विचारही घेतला गेला नाही ही गोष्ट बाईंच्या जिव्हारी लागली काल-परवापर्यंत पायातल्या पायपुसण्या-प्रमाणे असणारे नेते आपल्या स्वतत्र अस्तित्वाची दखल दाखवू लागले होते. हे असेच चालू राहिले तर आपला पूर्ण पराभव आणि निवृत्ती या गोष्टी डोळयांसमोर स्पष्ट दिसू लागल्या आणीबाणीच्या काळात आणि नंतरही ज्यानी ढम्म शातपणा दाखविला ते यशवंतरावजी स्वतंत्र विचार देऊ लागले. गृहखात्याची नामधारी खुर्ची साभाळून ज्यानी ओम मेहता आणि सजय गांधी याचा धुडगूस चालू दिला ते ब्रह्मानद रेड्डी आस्ते आस्ते बाईंपासून बाजूला जाऊ लागले. अगदी अलीकडेच एका मुलाखतीमध्ये त्याना विचारले की, 'कॉंग्रेस पक्ष आणि इदिराजी याचे आता नेमके नाते काय ?' रेड्डीजी म्हणाले— 'बाई कॉंग्रेसशी सर्वसामान्य संपर्क ठेवून आहेत, परंतु त्याना कोणतेही विशेष स्थान नाही !'

दुसरा प्रश्न विचारला गेला की 'पक्षाच्या विविध प्रश्नाबाबत तुम्ही त्याच्याशी सतत सपर्क ठेवून आहात काय ?' प्रश्न नाजूक होता आणि दिलेले उत्तर बाईंपर्यंत पोचण्याची शक्यता होती तरीही रेड्डीजी म्हणाले, 'नाही, मी त्याच्याशी सपर्क ठेवून नाही अजून एक प्रश्न आला 'म्हणजे तुम्ही त्याचा अजिबात विचारच घेत नाही ?' रेड्डीजी अस्वस्थ झाले. म्हणाले, 'सगळ्या बाबतीत विचार घेत नाही, परतु काही बाबतीत...' साधारणपणे कॉंग्रेस अध्यक्षाची बऱ्यापैकी भवेरी उडवून दिल्यावर, अध्यक्षाना कोडीत पकडणारा आणखी एक प्रश्न आला. 'क्रियाशील राजकारणामध्ये बाईंनी प्रवेश केला तर त्यामुळे कॉंग्रेसचा फायदा होईल काय ?' प्रश्नानतर काही क्षण एक भयाण शातता...चालू टेप तसाच गरगरत होता प्रश्नाचे काही तरी उत्तर देणे तर भागच होते.... काही तरी सापडल्याचा आव चेहऱ्यावर आणून रेड्डी म्हणाले : 'मी काही ज्योतिषी नाही ... आता माझ्या पक्षाचे व्यवस्थापन सुधारण्यावर मी लक्ष केंद्रित केले आहे.' आता विचारण्यात आलेला प्रश्न आणि दिले गेलेले उत्तर याचा काही ताळमेळ बसतो का ते पहा उत्तर केवळ पोकळच नाही तर ते भेकड स्वरूपाचेही आहे इदर मल्होत्राने अलीकडेच यशवत बळवत चव्हाण याना दूरदर्शनवर पेश केले. त्यानेही बाईसबधी प्रश्न विचारलाच आणि साहेबानी उत्तर दिले की, 'आजही त्या कॉंग्रेसच्या नेत्या आहेत कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सदस्या आहेत पक्षातून बाईंना काढून टाकण्याची कल्पना तर त्यांनी मागेच फेटाळून लावली आहे म्हणजेच— बाईचे कॉंग्रेसमधील क्रियाशील अस्तित्व त्याना मान्य आहे. निदान जाहीर वक्तव्यामध्ये तरी ते तशी स्पष्ट कबुली देतात. वघा— म्हणजे बाईंच्या भावी वाटचालीमधील पक्षयत्रणा हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा. बाई, जनता, कॉंग्रेस असे तीन कगोरे असलेल्या या प्रश्नाचे चौथे टोक आहे सत्ताधारी जनतापक्ष ! बाईंचे पुनरागमन या चार घटकाच्या क्रिया-प्रतिक्रियावर अवलबून आहे आणि काळजीपूर्वक विश्लेषण केले तर एक गोष्ट दिसते की बाईंचा अपवाद सोडून जे तीन घटक उरतात त्यापैकी एकही बाईविरुद्ध टिच्चून उभा नाही ! तुम्ही म्हणाल काय मूर्खासारखे विधान आहे जनतापक्ष बाईंच्या विरुद्ध चारही बाजूनी मोर्चेबदी करतो आहे धवन गेले, कपूर कटले, चव्हाण-रेड्डी बाजूला हटले आणि जनतापक्षामधील चरणसिंग, राजनारायण, अटलजी यासारखे कडवे बाईंच्या विरुद्ध वातावरण सतत तापत ठेवीत आहेत बाईंच्या विरुद्ध हवा निर्माण करणाऱ्या बातम्या, वार्तापत्रे प्रसिद्ध होत आहेत मूळ इग्रजी पुस्तके आणि त्याच्या भाषातरित आवृत्त्या .. इदिरेच्या पापकृत्याचा पाढा वाचीत आहेत. सारा पुस्तक-बाजार या चकमकत्या पुस्तकानी गजबजून गेला आहे ! सजयभोवती कायद्याचे फास बऱ्यापैकी आवळले गेले आहेत आणि शहा कमिशनसमोर आलेल्या चाळीस हजार तक्रार-अर्जांपैकी शे-दोनशे जरी उभे राहिले तरी बाईंना कायदेशीर प्रकरणात गोवणे शक्य आहे हे चौधरी चरणसिंग ओळखून आहेत कॉंग्रेस-निवडणूक-फडाचे प्रकरणही झिरपत झिरपत शेवटी १२, विलिंग्डन क्रिसेटपर्यंत पोचणार आहे असा त्याचा कयास आहे अशा परिस्थितीमध्ये सुखाची निवृत्तीही नजरेच्या टप्प्यात नसताना उभी हयात आक्रमक घणाघाती राजकारण खेळणारी, फ्रँक मोरिसने जिचे वर्णन एकमेव 'पुरुषमत्री' असे केले होते अशी ही बाई— आपल्या भोवती असा फास आवळला जात असताना मेहरुलीच्या शेतामधील घरामध्ये जाऊन गुलाब फुलवीत बसेल, अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे आहे ! बाई दम खाऊन बाहेर पडत आहेत .. त्याची सारी भिस्त जनतेवर आहे जनमानसामध्ये विशेषत मागासवर्गामध्ये आणि अल्पसंख्याकांमध्ये आपल्याला विशेष स्थान आहे हे त्या ओळखून आहेत बाईभोवती हे जे सतत तप्त वातावरण ठेवले जात आहे त्याच्या धाग्यातूनच सहानुभूतीचे कोश विणले जात आहेत बाईचा छळ होतो आहे अशी भावना जर जनमानसामध्ये रुजू लागली तर या भावनेला फुकर घालून जनसामर्थ्यातून स्वत:चे नेतृत्व उभे करण्यासाठी लागणारे कौशल्य आणि पूर्वपुण्याई बाईजवळ आहे सहानुभूतीची ही भावना हळूहळू निश्चितपणे आकार घेत आहे सर्वसाधारण कामगार, सर्वसाधारण शेतमजूर याला अजूनही बाईंचे अप्रूप वाटते आणि आजही परिस्थिती अशी आहे की एक केरळचा अपवाद वगळता सारा दक्षिण भारत उत्तरेमधील कोणा एका नेत्याला मानीत असेल तर ते फक्त इदिरा गाधी यानाच ! उत्तरेमधील अन्य कोणत्याही नेत्याला दक्षिणेमध्ये अजिबात फुटिंग नाही आणि बाईंच्या लोकप्रियतेवर मात करू शकेल असा नेता दक्षिणेत नाही ! कर्नाटकाचे मुख्य मत्री देवराज-अरस एवढे रामायण झाल्यावरही बाईंच्या सल्ल्याने राजकारण करतात आणि चव्हाण व रेड्डी याना अजिबात धूप घालीत नाहीत याचे रहस्यही बाईंच्या दक्षिणेमधील लोकप्रियतेमध्ये दडलेले आहे आपल्या पुनरागमनाच्या डावामध्ये बाईंची सारी मदार जनतेवर आहे. कर्नाटक आणि आध्रप्रदेश येथे येऊ घातलेल्या निवडणुका आणि बाईंचे पुनरागमन याचे मोठे साटेलोटे आहे. या निवडणुकापूर्वी पक्षीय यत्रणेवर ताबा मिळ-

विण्याचा बाई जोरदार प्रयत्न करतील. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशामधील निवडणुकाच्या निमित्ताने बाई जनतेशी हितगुज करतील. दक्षिणेमधील या दोन राज्यामधील विधानसभाच्या निवडणुका, त्यामधील बाईंचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग आणि निवडणुकामध्ये बाईंच्या राजकारणाला मिळणारे यश...यातून ही पुनरागमनाची वाट जाते. जनतेच्या बाजूने बाईंना कितपत प्रतिसाद मिळेल ? आज तरी वातावरण अनुकूल नाही. बाईंना हुकमी पाठिंबा देणाऱ्या मंडळीपैकी– नागरी मध्यमवर्गीय, सरकारी नोकर– नव्या दमाचा तरुण मतदार बाईंच्या मागे जाणार नाही; परंतु बाया-बापड्याना, ग्रामीण भागामधील जनतेला अजूनही इंदिराजीचे आकर्षण आहे. ना. यशवंतराव मोहिते यानी 'गतिमान'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये असे स्पष्टपणे सांगितले आहे की ही बाई भ्रष्टाचारी आहे यावर बहुजनसमाजाचा कधीही विश्वास बसणार नाही. चार बुद्धिवाद्यानी कितीही प्रयत्न केले तरी बहुजनसमाजाच्या मनात रुजलेल्या बाईंच्या प्रतिमेला छेद जाणे कठीण ! ज्या मतदारसंघातून बाई निवडून येतात तो रायबरेली मतदारसंघ काही नागरी मतदारसंघ नव्हे; पण त्या मतदारसंघामध्येही बहुजनसमाजानेच बाईंचा पराभव केला ना ? असा युक्तिवाद यावर करता येईल; परतु त्यावर असेही उत्तर दिले जाते की, तो सारा राग–संताप आणीबाणीतील अत्याचाराविरुद्ध होता. हे उत्तरही अगदीच डावलून पुढे जाता येणार नाही कारण याच रायबरेलीने विधानसभानिवडणुकीच्या वेळी बाईंच्या पसंतीचे पाच उमेदवार उत्तरप्रदेश विधानसभेमध्ये पाठविले आहेत. हे आणि तेही लोकसभानिवडणुकीनंतर केवळ तीन महिन्यांत हे विसरता येणार नाही. सध्याच्या केंद्रशासनाने चौकशी-सत्राचा जो धडाका लावला आहे त्यामध्ये सूडाच्या राजकारणाचा भाग नाहीच असे कसे म्हणता येईल ? आणि ही भावना जसजशी बळावत जाईल तसतशी बाईला शक्ती प्राप्त होईल आणि राजकीय सामर्थ्य आणि जनतेचे पाठबळ असलेल्या नेत्याला कायदेकानूच्या चौकटीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न केला तर तो जास्तच सामर्थ्यशाली होतो असा अनुभव आहे अर्थात अन्यायाने लादलेला तुरुंगवास आणि पुराव्याचे माप शिगोशीग पदरात घालून, बचावाची पूर्ण संधी देऊन, गुन्हे निर्विवादपणे सिद्ध झाल्यावर येणारा तुरुंगवास यामध्ये फरक जरूर आहे आणि तरीही बाईंच्या बाबतीत टोकाचे पाऊल उचलले गेले तर त्याचे तरंग उठल्यावाचून रहाणार नाहीत आणि सहानुभूतीची एक प्रचंड लाट बाईंना इच्छित मार्गावर चार पावले पुढे घेऊनच जाईल ! आपले नेतृत्व उभे राहिले तर ते जनसामान्यांच्या पाठिंब्यावर उभे राहील हे ओळखून असल्यानेच बाईंनी डेव्हिड फ्रॉस्टजवळ काँग्रेसपक्षासंबंधी एक शब्द न काढता भारतीय जनतेच्या भवितव्याशी आपले नाते निगडित असल्याचे सांगितले असावे आणि हे नाते जर पुन्हा प्रस्थापित झाले तर पक्ष नाक मुठीत धरून आपल्यामागे येईल अशी त्याची खात्री असावी. बाई प्रथम रायबरेलीमध्ये आणि मग इतरत्र दौरा करणार आहेत. जनतेला सहानुभूती देणे आणि जनतेची सहानुभूती मिळविणे हेच त्यांचे सध्याचे धोरण आहे बेलछीला जाऊन हरिजनाचे अश्रू पुसताना त्यानी हीच देवाण-घेवाण केली. खेरीज या घाई-गर्दीच्या दौऱ्यामध्ये त्यानी चव्हाणाच्यापूर्वी जाऊन राजकीय बाजी मारली आणि जेपीशीही संपर्क साधला. 'आधी रोटी खाएँगे फिर बुमको लाएँगे' यासारख्या घोषणा आणि हरिजनाना त्यांच्याबद्दल वाटणारा विश्वास या भेटीमध्ये पुन्हा एकदा दिसून आला. आता रायबरेलीमध्ये पदयात्रा आहेत. जनसपर्काचे काम बाईंनी जोमात सुरू केले आहे. हाती सत्ता नाही, नाव पूर्ण बदनाम झालेले आणि तरीही नागपूरसारख्या ठिकाणी पाच-सात हजाराचा जमाव बाईंसाठी जमतो हे एक अपूर्वच मानावे लागेल ! आपल्या नावाची जादू अजूनही चालू शकते याचा विश्वास या पहिल्याच जमावाने बाईंना दिला आणि मग त्यानी पक्ष आणि पक्षवाले याना गुंडाळून ठेवून जनतासंपर्काचे हे पर्व चालू ठेवले. अगदी आजही त्याना भेटायला येणाऱ्याची रीघ लागलेली असते. आणि येणाऱ्या मंडळीना त्या भेट देतात. संजय म्हणतो, 'आजही त्या देशामधील सर्वांत लोकप्रिय नेत्या आहेत !' त्याच्या या विधानातील आगाऊपणाचा भाग सोडला तरी खाली खूप काही शिल्लक राहते आणि ही श्रीशिल्लकच चव्हाणाची झोप उडवते ! रेड्डीना अस्वस्थ करते आणि चरणसिंगाना जास्त आक्रमक बनविते !

## आणीबाणी अपरिहार्य होती

आणीबाणीसंबंधी काहीही विचारले तरी बाई त्याचे समर्थन करतात. आणीबाणी त्या परिस्थितीमध्ये अपरिहार्य होती असे आग्रहाने त्या सागतात, त्यामध्ये खोटारडेपणा जरूर आहे; पण राजकीय बचावासाठी त्यानी हा पवित्रा स्वीकारला आहे. परवा पाटण्यात त्यानी जेपींना स्पष्टच सांगितले की, 'मीच आणलेल्या आणीबाणीसंबंधी टोकाची प्रतिकूल भूमिका मला कशी घेता येईल ? तशी मी घेतली तर ती अपरिपक्वता ठरेल !' आणीबाणीसंबंधीच्या बाईंच्या याच धोरणाचा 'मानसिक विकृती' असाही उल्लेख केला जातो. जागतिक पातळीवर मान्यता पावलेली, आतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रतिष्ठा मिळविलेली आणि राष्ट्रीय पातळीवर आजवर या देशात कोणालाही कधीही मिळाले नाही असे असाधारण स्थान संपादन केलेली ही बाई मतानी शिगोशीग भरलेल्या पेट्या उघडल्या जाताच धुळीत फेकली गेली, तर त्याचे व्यक्तिगत पातळीवर आणि मानसिक तणावाचे दृष्टीने काहीच परिणाम होणार नाहीत असे कसे म्हणता येईल ? पण भल्याभल्याना धूळ चारणारी ही बाई आणीबाणीच्या संदर्भात आज जी भूमिका घेते त्यामागील विचार लक्षात न घेता त्याला मानसिक विकृती म्हणणे, घाई करून निर्णयाप्रत पोचणे ठरेल असे मला वाटते बाई आणीबाणीतील अत्याचाराबाबत मनमोकळी माफी मागत नाही किंवा आणीबाणी आणली त्याचा पाठपुरावा करते ही गोष्ट जनतेला रुचणारी नाही; परतु या भूमिकेमागे निदान एक विचार तरी दिसतो; परतु संजयची भलावण आणि त्याला वाचविण्यासाठी चाललेली तिची खटपट मात्र समजू शकत नाही. प्रखर राजकीय महत्त्वाकांक्षा असलेली ही ही बाई आई-मुलाच्या नात्यापोटी इतकी फरफटत जाईल हे पटत नाही ! कदाचित या गोष्टीला फार तर एक अजब विकृती म्हणता येईल; पण आपल्या या बचावात्मक धोरणाचा पाठपुरावा करून बाई जनसपर्काचे नवीन धोरण हिरीरीने अंमलात आणीत आहेत

## कॉंग्रेसपक्षाची प्रचंड फरफट

निवडणुकीमधील दारुण पराभवानंतर कॉंग्रेसपक्षाची प्रचंड फरफटच चालू आहे. ज्याला कस आहे, जनतेमध्ये स्थान आहे असा नेता या पक्षाजवळ नाही. चव्हाणांची महाराष्ट्रातही पहिली पत नाही आणि राष्ट्रीय पातळीवर तर त्यांच्या पक्षाचे सुभेदारही त्यांना धूप घालीत नाहीत. खबीर नेता केंद्रस्थानी असता तर कर्नाटकामध्ये पाटील–देवराज यांची जी साठमारी चालू आहे ती तशीच चालू राहिली असती काय? स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास असता तर केवळ बाई जाऊन आल्या म्हणून चव्हाणांनी वेल्छीचा दौरा रद्द केला नसता, राष्ट्रीय पातळीवर उभे राहण्यासाठी आजही त्यांना महाराष्ट्राचा टेकू लागतो आणि महाराष्ट्रात तर निवडणुकांची रणधुमाळी येऊ घातली आहे. तेव्हा त्यांचेही आक्रमक वगैरे काय जे धोरण आहे ते त्यांना महाराष्ट्रातच अवलंबावे लागणार आहे जनता, समाजवादी कॉंग्रेस आणि शेकाप यांनी अनुक्रमे शहरी भाग, मराठवाडा आणि पश्चिम महाष्ट्राचा ग्रामीण भाग पादाक्रांत केला तर विदर्भातील डगमगत्या सामर्थ्यावर महाराष्ट्राची गादी पुन्हा मिळणे कठीण. त्यामुळे या सगळयांचा बीमोड करण्यासाठी त्यांना महाराष्ट्रातच खच्चून काम करावे लागणार आहे. महाराष्ट्र हातून गेला की त्यांच्या दिल्लीच्या खुर्चीचा पाय मोडलाच म्हणून समजावे.. महाराष्ट्रामधील बुद्धिजीवी वर्गाला चव्हाणाबद्दल जी एक आत्मीयता वाटत होती ती पूर्वीच पातळ झाली आहे. मते ओढण्याचे त्यांचे सामर्थ्य आज आटलेले आहे आणि पक्षाला तर मते आणि पैसे असणाराच नेता लागतो. आज कॉंग्रेसजवळ असा नेता आहे कुठे? ब्रह्मानंद रेड्डींना ऐकायला पुणे, कोल्हापूर, सातान्यात हजार-पाचशे लोक मिळणेही मुश्किल. चव्हाण एक तर घरचेच आणि त्यांचे ऐकूनही खूप झाले आहे मग मतांची खेच असणारा नेता कोण स्वर्णसिंग का बारुआ? सिद्धार्थ शंकर रे का विद्याचरण शुक्ला? कमलापति त्रिपाठी का विठ्ठल नरहर गाडगीळ? आता या मंडळीजवळ सांगण्यासारखे काही नाहीच असे नाही; पण आणीबाणीमधील लागूलचालनाचे पाप इतके जबर की ज्याला तेज आहे असा नेताच कॉंग्रेसजवळ नाही! म्हणजे नेत्याच्या शोधात निघालेल्या कॉंग्रेसला पुन्हा इंदिराजीच हव्यात आणि जमल्यास सत्तेकडे नेणारी संघटना म्हणून इंदिराजींनाही पुन्हा कॉंग्रेसचेच व्यापीसठ हवे. कॉंग्रेसच्या आजच्या बड्या नेत्यांची मोठी विचित्र कोंडी झाली आहे. इंदिरेविरुद्ध काही करावे तर पक्ष आणखी फुटेल आणि तिला धरून चालावे, तर कधी काळी खुर्ची आलीच तर ती आपल्याला मिळणे कठीण, असा हा बिचित्र प्रकार आहे. अनुयायामध्ये–नव्हे प्रथम रांगेत असलेल्या नेत्यांच्या पाठोपाठ जी फळी आहे त्यांची वैचारिक वर्गवारीही अभ्यासण्यासारखी आहे इंदिरेला पक्षातून हाकलून द्यावे, इंदिरेला संयुक्त नेतृत्वात स्थान द्यावे आणि पक्ष जगवायचा असेल तर तिच्या सर्व लहरींसह तिला सभाळून घ्यावे असे म्हणणारे, असे तीन गट आहेत. संघटनात्मक पातळीवर आज दिल्लीमध्ये तिच्या विरोधकांची संख्या मोठी आहे आज संसदीय कॉंग्रेसपक्षाच्या यादीवर ३०४ सदस्य आहेत. त्यापैकी बहुसंख्य तिच्या विरोधामध्ये आहेत आणि त्यांचे बाईंच्या बाबतीतील धोरण पुरेसं स्पष्टपणे व्यक्त झाले आहे. कॉंग्रेस संसदीय पक्षातर्फे अखिल भारतीय कॉंग्रेससमितीवर जे सदस्य निवडले जातात त्यामध्ये बाईंचे खंदे पुरस्कर्ते वसंत साठे निवडून आले खरे; परंतु अकराव्या फेरीपर्यंत त्यांची दमछाक झाली. कर्नाटकभवनामध्ये–अन्नात मिसळलेल्या राजकारणाचा डाव खेळला गेला. इंदिराजींच्या समर्थनासाठी हा भोजनाचा घाट घालण्यात आला होता; स्वतः इंदिराजीही या भोजन–सोहोळयास उपस्थित होत्या; परंतु तरीही विद्यमान खासदारांची संख्या फारच थोडी होती. संसदीय कॉंग्रेसपक्ष म्हणजे कॉंग्रेसपक्षाची नाडी पक्षामध्ये कोणता मतप्रवाह वाहत आहे याची झलक येथे दिसते पक्षाच्या एकंदर धोरणावरही संसदीय कॉंग्रेसपक्षाचे दाडगे वर्चस्व असते. मात्र या वेळी हे सूत्र लागू पडत नाही. कारण इंदिराजींना मानणारा एक मोठा गट राज्यपातळीवर मजबूतपणे उभा आहे येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये इंदिराजींच्या नावाचा फायदा मिळेल असे वाटत असल्यानेच चौधरी चरणसिंगांपेक्षाही टर्रेबाज असलेला देवराज अरस यांच्यासारखा नेता बाईंच्या सल्ल्याने काम करतो आहे 'आंध्र प्रदेशामध्ये आज जरी बाईजी गेल्या तरी इंदिरा आया म्हणून त्यांच्या पायावर डोके ठेवणारांची संख्या काही कमी नाही. कोणत्याच राष्ट्रीय पक्षाची डाळ तामिळनाडूमध्ये शिजत नसली तरी आजही इंदिराजींना मानणारांची संख्या तेथे भरपूर आहे. बाई महाराष्ट्रात आल्या तर आजही पुण्या–मुंबईतसुद्धा त्या सणसणीत मोठी सभा घेऊ शकतील आणि अन्य कोणत्याही कॉंग्रेसनेत्यापेक्षा ही सभा खचितच मोठी असेल! लोकशाही पद्धतीने ज्यांना सत्ता सोडावी लागली अशा त्या देशामधील एकमेव पंतप्रधान असल्याने त्यांना पहाण्यासाठी किंवा सहानुभूती दाखविण्यासाठी जमाव जमेलही; परंतु असा जमाव कॉंग्रेसच्या झोळीत विशेषतः इंदिराजी परत आल्या तर मत टाकणे कठीण, असा एक विचार आहे. अर्थात अशा सभा सुरू झाल्यावर अशा सभा प्रत्यक्ष पाहूनच त्यावर भाष्य करणे सयुक्तिक आहे. भाषणाला होणारी गर्दी मतांचे हिशेब सांगत नसली तरी भाषणाला जो प्रतिसाद मिळतो तो मतांचे हिशेब जरूर सांगतो मते मिळविण्याच्या आपल्या शक्तीचा प्रत्यय बाईंनी आणून दिला तर कॉंग्रेसमधील कोणताही गट अथवा नेता त्यांची वाटचाल रोखू शकणार नाही आणि जनतेने दिलेल्या विश्वासातून असे सामर्थ्य त्यांना पुन्हा पैदा झाले तर आता दूर असणारे नेतेही बाईंच्या मागील रांगेतील खुर्च्यांवर मुकाट जाऊन बसतील. म्हणजेच या प्रश्नाची खरी किल्ली जनतेच्या हातात आहे. बाईंना क्रियाशील राजकारणात यायचे आहे की नाही, कॉंग्रेसने त्यांचे नेतृत्व पुन्हा स्वीकारायचे की नाही. या प्रश्नाचे उत्तर जनतेच्या हाती आहे आणि आपले उत्तर देण्यापूर्वी जनता जनतापक्षाच्या हालचालींची मोद घेणार आहे. जनतापक्षाला आणीबाणीतील अत्याचारांच्या भांडवलाचे नकारात्मक राजकारण दीर्घकाळ खेळता येणार नाही आर्थिक प्रश्नांची कोंडी जनतापक्षाचे सरकार कशी फोडते, बेकारीच्या प्रश्नावर काय तोड काढते, अल्पसंख्याकांचा आणि हरिजनांचा विश्वास कसा आणि कितपत संपादन करते यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत.

## पक्षांतर्गत राजकारण

पक्षांतर्गत राजकारण आणि बाईंचे पुनरागमन यांचाही जवळचा संबंध आहे अगदी आजही इंदिराजींबद्दल आपुलकी असणारी मंडळी जनतापक्षामध्ये आहेत बाह्यात्कारी तरी जनतापक्ष एक असल्यासारखा दिसतो; पण अंतर्गत खदखद वेळोवेळी, विशेषतः निवडणुका आल्या की हमखास उफाळून वर येते. कोणी सांगावे, जनसंघ बी. एल्. डी.च्या आक्रमक वृत्तीची तिडीक आली तर संवेदनाक्षम समाजवादी काय करतील हे सांगता येणार नाही.

बाईंच्या पुनरागमनामधील एक मोठा अडथळा म्हणजे बाई हवीच असा हेका असणारी लॉबी मोडून पडली आहे. काही मडळी बाईंना पक्षामध्ये प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या पाठी आहेत, पण पक्षाची सूत्रे आज ज्याच्या हाती आहेत त्याना बाई नको आहेत. त्यामुळे पक्षामध्ये बाईंना स्थान मिळाले तरी सत्तेच्या सर्वोच्च पदापर्यंत त्याची वाटचाल सध्याच्या परिस्थितीत तरी सभवनीय दिसत नाही. चौकशीमडळीच्या कामकाजाची गती पाहता लोकसभेच्या ८२ साली होणाऱ्या निवडणुकापर्यंत बाईंना बरोबर गुतवता येईल आणि निवडणुका तोडावर आल्या की हुकमी डाव खेळता येईल अशा पद्धतीने सारे कामकाज चालू आहे. जनतापक्ष, कॉंग्रेस, डावे कम्युनिस्ट, अकाली... इतके कशाला उजवे कम्युनिस्ट आणि तामिळनाडूमधील प्रादेशिक पक्षानाही इदिरा गाधी या नावाची ॲलर्जी आहे. पक्षीय अथवा व्यक्तिगत स्वार्थासाठी काहीही फाटाफुटी झाल्या तरी त्यामध्ये इदिराजींना अनुकूल दान पडणे कठीण आहे. सत्तास्पर्धेच्या राजकारणामध्ये आपण काहीही करू शकतो हे बाईंनी पूर्वी दाखवून दिले आहे 'किस्सा कुर्सीका' या चित्रपटामुळे प्रकाशझोतामध्ये आलेले अमृत नाहट एके काळी बाईंचे चाहाते होते. एका विशिष्ट प्रकरणामध्ये बाईंनी घेतलेला निर्णय त्याना धक्कादायक वाटला त्यानी एकदा सहज बाईजवळ तो विषय काढला. बाई म्हणाल्या, 'नाहटाजी' राजकारणामध्ये चागले–वाईट असे काही नसते, ज्यामुळे आपले स्थान मजबूत होईल ते नेहमी चागलेच असते. देशाच्या पतप्रधानाचे हे धक्कादायक विचार ऐकून ते चागलेच हादरले. त्यानतर आणीबाणी आली आणि नाहटाजीचे 'किस्सा कुर्सीका' हे चित्रही आले.

## चव्हाण–इंदिराजी शीतयुद्ध

बाईंचे पुनरागमन कॉंग्रेसपक्षामध्ये मोठी फूटही घडवून आणू शकेल. यशवंतरावजी जाहीर मुलाखतीमधून काहीही सागत असले तरी एक गोष्ट निश्चित की, ते बाईंना कठोर विरोध करतील. बाईंच्याबरोबरील हा संघर्ष नजीकच्या भविष्यकाळात संभवत नाही. कारण बाई संसदेमध्ये जोपर्यंत प्रवेश करीत नाहीत, तोपर्यंत चव्हाणांचे धोरण नरम राहील आणि आज तरी ससदेत जाण्यासाठी बाई मोठ्या उत्सुक नाहीत. मनात आणले तर त्यांना लोकसभेत प्रवेश करणे अवघड नाही. एखाद्या हुकमी मतदार सघातून निवडून येणे त्यांना सहज शक्य आहे; परतु आज त्यांनाच ते नको असावे. अलाहाबाद न्यायालयाचा निर्णय पायदळी तुडवल्याने उमटलेल्या प्रखर प्रतिक्रियेचे प्रायश्चित्त त्यांना मिळाले आहे. तेव्हा एकदा लोकानी नाकारल्यावर तशीच अपरिहार्य परिस्थिती निर्माण झाल्याखेरीज लोकसभेमध्ये प्रवेश करण्याचा आततायीपणा त्या करतील असे वाटत नाही आणि त्यानी पाच वर्षांचे पूर्ण प्रायश्चित्त घेतले तर आपल्याच मतदारसघातून त्या लोकसभेवर निवडून येतील; निदान तशी शक्यता नाकारता येणार नाही. दरम्यानचा काळ हा चव्हाण–इंदिराजी शीतयुद्धाचा काळ आहे. महाराष्ट्रातील निवडणुका जिंकून त्याना आपले स्थान मजबूत करावे लागेल चव्हाणाची वाढती ताकदही बाईंची डोकेदुखी होऊन बसेल महाराष्ट्रातून प्रत्यक्ष त्याच्याशी सपर्क साधणारा गट त्या निर्माण करतील. शकरराव चव्हाण हे नेमके तसेच होते. त्यामुळेच बाईंच्या पराभवानतर त्यानी सत्ताभ्रष्ट होणे अपरिहार्य होते. ज्या विक्षिप्त पद्धतीने यशवंतरावांना डावलून बाईंनी शंकररावाना महाराष्ट्र बहाल केला त्यापेक्षा विक्षिप्त पद्धतीने यशवंतरावांनी त्याची हकालपट्टी केली. कॉंग्रेसपक्ष सोडू नका असे बाई शंकररावांना कळकळीने सांगत होत्या. कारण वेळ येईल तेव्हा प्रत्यक्ष सपर्क साधता येईल असा आपल्या मनाप्रमाणे वागणारा हुकमी सुभेदार त्याना हवा होता. वसतराव नाईक, वसंतदादा ही मडळी तशी घट्ट असली तरी त्यानाही ठोकरण्याचा प्रयत्न होईल. यशवंतराव मोहित्याना चुचकारले जाईल. अर्थात हे सारे बाईंना उभे राहण्यास जनतापक्षाच्या केद्रसरकारने सवड दिली तर...कपूर धवन आत गेल्यापासून बाईंचे धोरण पुन्हा नरम आले आहे बाईंनी उभे राहण्याचा प्रयत्न केला की, गृहखाते एखादा नवीन कोलदाडा घालणार ही दिसती गोष्ट आहे आणि बाईंवर काही आरोप शाबित झाले तर रीतसर खटला वगैरेही आलेच. राजकीय उभारी घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या या चौकशी मडळाच्या टागत्या तलवारीने बाईंचे भवितव्य काळवंडून गेले आहे म्हणूनच हे चौकशी मडळाचे काम थाबवावे, निदान त्यापासून आपल्याला आणि सजयला त्रास होणार नाही असे सुस्पष्ट आश्वासन मिळावे यासाठी त्यानी झटून खटपट केली, विनवण्या केल्या, अश्रू ढाळले, जेपीनी काही तरी करावे म्हणून त्याची मनधरणी केली, मोरारजीभाईंना भेटून त्यांच्याकडून संरक्षण मागितले. हे असे सरक्षण देणे म्हणजे बाईंच्या पुनरागमनाचा रस्ता आपल्या हाताने तयार करण्यासारखे आहे ही गोष्ट दोन्ही नेते विसरू शकले नाहीत. जेपीनी इदिराजीची भेट घेतली त्यामागे व्यक्तिगत सबधाचा जास्त भाग होता म्हणूनच उज्ज्वल राजकीय भवितव्यासबधीचे जे वृत्त प्रसिद्ध झाले त्याचा त्यांनी लगोलग खुलासा केला. मोरारजीभाई तर काय चोख राजकारणीच ते असले काही आश्वासन देण्याची शक्यता नव्हतीच. फक्त आपण सूडबुद्धीने वागणार नाही एवढेच त्यानी सांगितले आणि चौकशी मडळाचे काम चालू राहिले. चौकशी मडळाच्या या टागत्या तलवारीमुळे बाईंच्या राजकीय महत्त्वाकांक्षाना अर्धांगाचा झटका आल्यासारखे झाले आहे. पक्षाची मदत घ्यावी तर तो पाठ फिरवून उभा जुन्या सहकाऱ्याकडे आशेने पाहावे तर त्यानी दारे लावून घेतलेली. अशा परिस्थितीमध्ये हुकुमशाही पद्धतीने राज्य करण्याची चटक लागलेली ही बाई जास्त क्रूर, आक्रमक, हिंस्र बनेल असे दिसते. आपली कोंडी केली जात आहे ही भावना तिला त्रासदायक वाटेल आणि परिपूर्ण आवेगाने अखेरचा प्रयत्न करण्यासाठी ती एकदा उभी राहिली की, त्यातून ज्याची चवीने दखल घेता येईल असे रामायण निश्चितच घडेल.

राजकीय विवेचनाबरोबरच ज्योतिषशास्त्र काय सागते याबाबतही थोडीफार उत्सुकता असतेच. अजता जैन यांच्या मते इदिराजींचे पुनरागमन सभवनीय नाही. विद्यमान सत्ताधाऱ्यांपैकी चरणसिंग आणि एच. एन. बहुगुणा ही त्याना सभाव्य नावे वाटतात; पण त्यांच्या मते इदिराजींचे पुनरागमन सभवनीय वाटत नाही. ज्योतिषशास्त्रविरोधात, राजकीय परिस्थिती पूर्ण प्रतिकूल, ज्या पक्षाचे नेतृत्व केले त्या पक्षाने नकारात्मक भूमिका स्वीकारलेली, कितीही नाही म्हटले तरी बाळ संजयच्या लीलामुळे घरामधील वातावरण तणावाचे, चौकशी मंडळामुळे मानसिक स्वास्थ्य हरवलेले, एकही दान अनुकूल नसताना ही बाई ज्या तोऱ्यात उभी आहे तो तोरा पाहिला की, तिच्या सामर्थ्याचे अप्रूप जरूर वाटते. बाईंच्या परिपूर्ण पराभवानतर एका महत्त्वाकांक्षी राजकीय नेत्याच्या कारकीर्दीचा शेवट होईल असे वाटले होते; पण नाही, बाई इथे थाबायलाच तयार नाहीत. या उभारीचा शेवट काय होईल याची त्याना भीती नाही. 'मी नाही तर तुम्हीही नाही' अशी आक्रमक भूमिका घेऊन बाई या नाटकाचा आणखी एक अंक घडवू इच्छितात. तो पाहणे हे आपले काम! ☐

पुस्तके

# काळे दिवस!

## परदेशीयांच्या नजरेतून आणीबाणी

गेल्या काही महिन्यामध्ये आणीबाणीतील 'कृष्णकृत्यां'वर प्रकाश टाकणारी अनेक पुस्तकं विविध भाषामध्ये प्रकाशित होत आहेत खरं काय घडलं ते जनतेसमोर यावं हा तर अशा प्रकारच्या लेखनाचा एक उद्देश आहेच; पण त्याचबरोबर गेली दोन वर्षं दडपल्या गेलेल्या लेखनस्वातंत्र्याला मुक्त वाट मिळविण्याचाही हेतू या लेखनामागे दिसतो.

अशाच पुस्तकांच्या मालिकेतील श्री. यशवंत कानिटकर यांनी लिहिलेले 'काळे दिवस' हे एक पुस्तक! साता समुद्रापलीकडे अमेरिकेत राहाणाऱ्या या 'काळ्या दिवसां' वर डोळस नजर ठेवणाऱ्या आणि त्याविषयी बरंच काही वाचणाऱ्या–ऐकणाऱ्या अशा एका व्यक्तीने हे पुस्तक लिहिले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभवणाऱ्याच्या लेखनात संभवणारा भावनाविवशतेचा धोका इथे परस्परच टळतो. शिवाय परदेशामधून ज्या काही आणीबाणी–विरोधी समित्या स्थापन झाल्या त्यापैकी रॉचेस्टर येथे 'Committee for Freedom and Human Rights in India' ही सस्था स्थापन करून तिचे धुरीणत्वही श्री. कानिटकर यांनी केले. वॉशिंग्टन येथील भारतीय वकिलातीवरील निदर्शनात प्रकृति अस्वस्थ असतानाही त्यांनी भाग घेतला. तसेच डॉ. सुब्रह्मण्यम्स्वामी-सारख्या परागंदा झालेल्या अनेक देशभक्ताना कानिटकरांनी अमेरिकेतील अनेक भारतीयाच्या सहकार्याने सर्वतोपरी सहाय्य केले. हे या ठिकाणी सागण्याची आवश्यकता अशी की त्यावरून लेखकाच्या सवेदनाक्षम मनाची कल्पना यावी.

भारतामध्ये आणीबाणी जाहीर झाल्यानतर जगाच्या राजकीय वर्तुळात आणि वृत्तपत्रक्षेत्रात त्यावर अनेक प्रतिक्रिया उमटल्या; या दोन वर्षांच्या काळात अनेक महत्त्वाचे प्रसग भारतामध्ये घडले. या घडामोडीचेही बाह्य जगतामध्ये काही ना काही पडसाद उमटत होतेच. या प्रतिक्रियांची, या पडसादाची एक ढोबळ कल्पना भारतीयांना देण्याचा प्रयत्न या पुस्तकामध्ये श्री. कानिटकर यानी केला आहे. त्या दृष्टीने पुस्तकात अनेक ठिकाणी निरनिराळ्या वृत्तपत्रामधील मजकूर आणि निरनिराळ्या वक्त्याची भाषणं जशीच्या तशी, अशत. उद्धृत करण्यात आली आहेत. 'परदेशी वार्ताहराना या काळात भारतामध्ये कशा तऱ्हेन वागविलं गेल याचीही वर्णनं पुस्तकात वाचावयास मिळतात. थोडक्यात, हे पुस्तक भारतातील 'काळ्या दिवसां'ची जगाच्या नकाशावर पडलेल्या सावलीची पुसट कल्पना देतं भारतातील आणीबाणीकडे आणि त्या काळातील घडामोडीकडे या पुस्तकात जगाच्या चष्म्यातून पाहिलेलं आहे. त्यामुळे हा 'बाहेरील' दृष्टिकोन जाणून घेण्यास उत्सुक असणाऱ्या वाचकाचं कुतूहल हे पुस्तक निश्चित शमवित

या पुस्तकाच आणखी एक वैशिष्टच म्हणजे अशा तऱ्हेचा एक निराळाच दृष्टिकोन घेऊन लिहिलेल मराठी भाषेतील तर हे एकमेव पुस्तक आहेच; पण इतरही भाषामध्ये आणीबाणीवर वक्तव्य करणारी जी पुस्तक प्रसिद्ध झाली आहेत त्यापैकी किती पुस्तकामध्ये अशी भारताबाहेरील प्रतिक्रियाची नोद घेतली गेली असेल याविषयी शंकाच आहे. त्या दृष्टीने या पुस्तकाचं वेगळेपण प्रभावी आहे. त्यामुळे आणीबाणीतील अत्याचारांचीच फक्त रसभरित वर्णनं करणाऱ्या सर्वसाधारण पुस्तकामध्ये हे पुस्तक ताबडतोब उठून दिसत; पण यापलीकडे 'काळे दिवस'कडून फार काही अपेक्षा पूर्ण होत नाहीत.

याच मुख्य कारण म्हणजे पुस्तकामध्ये ज्या काही bare facts माडलेल्या आहेत त्याच्या जोडीला जर लेखकाचे स्वतःचे काही चिंतन आणि त्यातून निर्माण झालेली मत असती तर पुस्तकाची 'खोली' निश्चितच वाढली असती. शिवाय 'आणीबाणीचे भारतीय दर्शन' या अत्यत अनावश्यक अशा परिशिष्टामध्ये तेच तेच, चावून चोथा झालेले राजकैद्याच्या हालाचे प्रसग नव्या उत्साहाने वर्णन केले आहेत. हे प्रकरण अनावश्यक होतं अशा दृष्टीने की, यातली बहुतेक सर्व वर्णन भारतातील वर्तमानपत्रामध्ये निवडणूक–प्रचाराचा भाग म्हणून देखील येऊन गेली आहेत. त्यामुळे त्यात विषयाचं नाविन्य काहीच नाही. शिवाय त्या अनुषगान काही प्रतिक्रियाही व्यक्त करण्याची संधी लेखकाने घेतलेली नाही. दुसरं अस की सबंध पुस्तकाचा जो tone आहे त्या tone शी हे सुसंगत नाही.

पुस्तकामध्ये निरनिराळ्या परदेशी वृत्तपत्रातील आणि साप्ताहिकांमधील जे इंग्रजी उतारे उद्धृत केले आहेत त्यातील बहुतेक ठिकाणी लगेच त्याचं मराठीमध्ये भाषातरही दिलेल आहे. खरं म्हणजे या ठिकाणी भाषातराची एवढी निकड नव्हती. कारण बहुतेक सर्व उतारे (क्वचित काही शब्द वगळता) अत्यंत साध्या आणि सोप्या इग्लिश भाषेत आहेत किंवा मग मूळ उतारा न देता त्याचं भाषातरच दिलं असतं तरी चाललं असतं. दोन–तीन ठिकाणी तस केलही आहे. (उदाहरणार्थ, तिसऱ्या प्रकरणात दिलेले जॉन रोश या स्तभलेखकाचे विचार) आणि त्यामुळे रसभगही होत नाही. याचा फायदा असा झाला असता की पुस्तकाची लाबी अकारण वाढली नसती.

आणीबाणीच्या काळात भारतात घडलेल्या काही महत्त्वाच्या घटना भारतीय वाचकाला पूर्णतः अपरिचित असण्याचा बराच संभव आहे. विशेषत. ज्या बातम्या leak होऊन किंवा भूमिगत कार्यकर्त्यांनी पाठविलेल्या पत्रकाद्वारा परदेशात पोचल्या त्या भारतीयांना माहीत होण्याचा काहीच मार्ग नव्हता. ते काम या पुस्तकाने चोख बजावल आहे.

हे पुस्तक म्हणजे 'साप्ताहिक सोबत' मधील लेखाचच एकत्रित पुनर्मुद्रण आहे. त्याच्या या नव्या स्वरूपातही पृथक्करण किंवा विश्लेषणाचा भाग कमीच आहे; पण वाचकाच कुतूहल मात्र 'काळे दिवस' निश्चितच शमवत. ◘

**काळे दिवस**

ले. यशवत कानिटकर

प्रकाशक : वरदा बुक्स, पुणे

पृष्ठे : १४०, मूल्य : १० रुपये

शंभर फुले उमलू द्यात ! : पृष्ठ ३ वरून

तत्सम संघटना हे असू शकते. जनतापक्षातील काही नेत्यांनी काढलेले विलिनीकरणाचे खूळ हा रा. स्व. संघाच्या तथाकथित धोक्याविरुद्ध उपाय ठरू शकत नाही विचारांचा सामना विचारानी व्हावा, सेवाभावी कार्याला प्रतिसेवाभावी कार्याने उत्तर दिले जावे. असे अनेक ताणबाण समाजात राहणे ही समाजाच्या जिवंतपणाची, प्रगतीची खूण समजली जावी. राजकीय पक्ष एक, दोन की अनेक यावर लोकशाहीचे भवितव्य अवलबून नाही. द्विपक्षीय लोकशाही हाही काही लोकशाहीचा मानदंड वगैरे मानण्याचे कारण नाही समाजात सत्ता विखुरलेली राहणे हे अधिक महत्त्वाचे व मूलभूत लोकशाहीचे लक्षण आहे या विखुरलेपणाची रूपेही निरनिराळ्या देशात निरनिराळ्या पद्धतीची असू शकतात. आपल्याकडे सत्ता सास्कृतिक, आर्थिक, राजकीय अशा तीन गटात भविष्यकाळात विखुरली जाण्याची शक्यता अधिक आहे. एक गट प्रबळ झाला तर दुसरे दोन एकत्र येऊन त्याचा पाडाव करतात हा इदिरापराभवाचा खरा अर्थ आहे तो नीट ध्यानात घेतला गेला व त्या दृष्टीने पुढची सघटनात्मक बाधणी केली गेली तर इदिरा गाधी पुन्हा आल्या, न आल्या, तरी भारतीय लोकशाहीला भय राहणार नाही ! केवळ राजकारण–सत्ताकारण माजले तर मात्र भय नेहमीच राहील. कारण मग राजकारण हा शुद्ध डावपेचाचा, चकवाचकवीचा खेळ राहील. त्यावर नियत्रण ठेवू शकणारी सघटित लोकशक्ती अस्तित्वात नसल्याने या खेळातून काहीच साध्य होणार नाही. जुने जातील. नवे येतील. देश बदलणार नाही. सप्तस्वातत्र्ये पुस्तकात राहतील. सरकारी कुडयातील काही 'फुले फुलतीलही; पण लोकजीवनाला बहर येणार नाही गाधीजीना असा 'सरकारी' समाज निश्चितच अभिप्रेत नव्हता. विलिनीकरणवाद्यानी गाधीजीची लोकसेवक सघाची कल्पना पुन्हा एकदा तपासून पहायला काय हरकत आहे ?

□

'समाजसंघटकाला रामदासांनी स्वतंत्र ठेवले ही वस्तुस्थिती त्याचे द्रष्टेपण सिद्ध करते. कोणत्याही सत्तेच्या आधिपत्याखाली नसलेला स्वतत्र कार्यकर्ता हाच सास्कृतिक व सामाजिक कार्य व्यवस्थितपणे पार पाडू शकतो हे सत्य रामदासानी हेरले होते महताना भिक्षेचा उपदेश करून रामदासानी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनविले आणि 'कार्यकर्ते होऊ नये। राजद्वारी' असा आदेश देऊन राजसत्तेच्या क्षेत्रापासून अलिप्त ठेवले. समर्थांची महंतसंघटना ही एक सास्कृतिक सघटना होती त्या सघटनेला स्वतंत्र व स्वयपूर्ण बनविण्यात समर्थांनी अपूर्व योजकता प्रकट केली समाजाच्या विकासात अशा स्वतंत्र, सांस्कृतिक संघटनाचे कार्य फार मोठे व महत्त्वाचे असते असा निर्वाळा मॅक् आयव्हर व पेज या समाजशास्त्रज्ञानी दिलेला आहे. 'Cultural activity attains its ends more fully when it is free to organize itself in associations that are not dependent on the organization of the political-economic complex...Thus the liberation of cultural association from the control of the political-economic organization is a very significant. aspect of social evolution' (Society : An introductory analysis. P. 486) सांस्कृतिक सघटनेमध्ये सास्कृतिक कार्य व सामाजिक कार्य या दोन्ही गोष्टी एकवटलेल्या असतात हे सत्यही वरील समाजशास्त्रज्ञानी उघड केले आहे. रामदासाच्या महतसघटनेचे उद्दिष्टही देवकारण-धर्मकारणापुरते मर्यादित नसून त्याच्यासह समाजसघटना करण्याएवढे विशाल होते

– सामर्थ्ययोगी रामदास
लेखक : प्रभाकर पुजारी
पृष्ठ : ५७ (समर्थांचे समाजचिंतन)

□


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर । पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

# मी आक्रमक धोरण स्वीकारणार !

**–श्री. यशवंतराव चव्हाण**

( नगर येथील काँग्रेस शिबिरातील घोषणा )



- ३५ वर्षे सतत बचावात्मक राजकारण खेळून सत्ता टिकवून धरणाऱ्या यशवंतरावांना 'आक्रमक' होणे शक्य आहे काय ?
- 'आक्रमक' होऊनही ते काँग्रेस वाचवू शकतील का ?
- का स्वभावतःच 'आक्रमक' असणाऱ्या इंदिराजींची मदत त्यांना घ्यावीशी वाटेल ?
- का 'मराठवाडा' दैनिकाचे संपादक श्री. अनंतराव भालेराव म्हणतात त्याप्रमाणे 'न जाणो, यशवंतरावांच्या मनात जनतापक्षात प्रवेश करण्याचेही येत असेल. जनतापक्षाने सावध असणे बरे–' असे काही घडेल ?

# माणूस

**रायबरेली विशेषांकानंतर यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेणारा विशेषांक.**

# कृष्णा-कोयना विशेषांक

तपशील पुढील अंकी